

## माझा घटस्फोट

## एक फुलबाग फुलवायची आहे

वासंतिक विशेषांक

मालिका : चार

किंमत : पाच रुपये

साप्ताहिक

# माणूस

¤

वर्ष : बाविसावे

अंक : बावन्नावा

[ वासंतिक विशेषांक मालिका अंक चौथा ]

¤

२८ मे १९८३

किमत : पाच रुपये

¤

संपादक

श्री. ग. माजगावकर

¤

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

¤

वार्षिक वर्गणी

पन्नास रुपये

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

¤

मुखपृष्ठ व आतील चित्रे :

संजय पवार

## चार वासंतिक विशेषांकानंतर येणारा यापुढील वर्षारंभ विशेषांक. या अंकात–

**मैत्री** – जी आपण सगळेच कोणाकोणाशी तरी करतो आणि करत नाही.

मुलं मुलांशी मैत्री करतात.

मुली मुलींशी मैत्री करतात.

मुलं आणि मुली एकमेकांशी मैत्री क्वचितच करतात.

हे असं का ?

स्त्री–पुरुषांची चांगली मैत्री अशी दुर्लभ का ?

मनातलेच अडसर की समाजानं जागोजागी लटकवलेल्या धोक्याच्या पाट्या ?

घरातल्या विश्वासक वातावरणात असे बंध तोडून स्त्री – पुरुषांच्या निखळ मैत्रीचा अनुभव घेतलेल्या मैत्रिणीचा ललित लेख–

## –त्यांची माझी मैत्री

□

## सावरकरांच्या साहित्यिक प्रेरणा

प्रा. स. शि. भावे

□

‘इतर लोक जेव्हा घरी परतायला लागत तेव्हा केशवराव कोठावळे फिरायला बाहेर पडत–

औदुंबर अळीपासून सारसबागेपर्यंत. या तासा–दीड तासाच्या स्वैर भ्रमंतीत अनेक विषय येत. इतर वेळी स्वत:संबंधी न बोलणारे केशवराव आपल्या वाटचालीसंबंधी बरेच काही सांगून जात’....

## औदुंबर अळीपासून सारसबागेपर्यंत

–वि. स. वाळिंबे

□

**‘गोंडा ते बीड’** (उत्तरार्ध)

माणूस प्रतिनिधी

□

**‘ब्लड कॅन्सर’** कादंबरीचा शेवटचा भाग.

□

**यापुढील अंक वर्षारंभ विशेषांक । किमत पाच रुपये**

# वासंतिक ते वर्षारंभ

माणूसच्या वासंतिक विशेषांक मालिकेतला हा शेवटचा अंक.

पुढच्या अंकापासून नव्या वर्षाची नवी सुरुवात.

माणूसच्या आत्तापर्यंतच्या बावीस वर्षांत वासंतिक अंक काढायचा असं या वर्षी प्रथमच ठरलं. त्या दृष्टीनं दोन–तीन नवीन विषय योजले. नानाजी देशमुखांचं गोंडा जिल्ह्यातलं प्रेरणादायक काम, त्यांच्याच प्रयत्नानं महाराष्ट्राच्या बीड जिल्ह्यातल्या दुष्काळी रखरखाटात होऊ पाहाणारा नवनिर्माणाचा आविष्कार, हा विषय माणूसच्या आत्तापर्यंतच्या विकासात्मक पत्रकारितेला साजेसाच आहे. या अंकातून एक नवीन विषयही मांडला आहे – 'पाया हादरलेली घरं.'

या घरातली मुखवटे लावून वावरणारी माणसं आणि मध्यमवर्गीय कुटुंबात मूळ धरू बघत असलेल्या विभक्त संस्कृतीचं या घरातून दिसणारं प्रतिबिंब असा हा विषय. विषयाची जवळीक आणि ताजेपणा लोकांना किती पटकन लिहायला तयार करतो आणि भरभरून लिहू देतो हे पुन्हा एकदा या विषयाची जुळवाजुळव करताना जाणवलं.

या अंकांचं वैशिष्टच असं की, पद्मजा फाटक, सुधा नरवणे, डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर, विद्या बाळ अशी काही नावं सोडली तर या वासंतिक विशेषांक मालिकेतले बहुतेक लेखक नवे आहेत. 'पाया हादरलेली घरं' सारख्या अवघड विषयावर ते लिहायला तयार झाले आणि अतिशय उत्स्फूर्त लेख आणि अनुभवकथनं लिहून गेले, ते या नवीन विषयाच्या जवळिकीमुळंच.

लेखकांच्या या प्रतिसादामुळं मजकुराच्या लाटेत एका वासंतिक अंकाची कल्पना पार वाहून गेली आणि माणूसची वासंतिक विशेषांक मालिका सुरू झाली.

प्रदूषणाविरुद्ध एकाकी झुंज देणाऱ्या एका शास्त्रज्ञाचा लढा चित्रित करणारी 'ब्लड कॅन्सर' ही कादंबरी हे या वासंतिक मालिकेचं आणखी एक वैशिष्टच. हा विषय कादंबरीच्या रूपात मराठीत प्रथमच आला आणि अपेक्षेप्रमाणे वाचकांनी त्याचं भरघोस स्वागत केलं.

१९८२–८३ या वर्षात माणूसमध्ये काही नवीन बदल झाले. मुखपृष्ठापासून अंतरंगापर्यंत हे बदल होते. अनेक नवीन विषय आणि लेखमाला या वर्षात माणूसने दिल्या. 'महात्मा आणि माणूस,' 'चिपको आंदोलन,' 'मराठी विनोद लेखमाला', 'लेक वालेसा' यांची नोंद जाणकारांनी घेतली. या लेखमालांची आता पुस्तकेही निघत आहेत. याशिवाय काही रचनात्मक व संघर्षात्मक चळवळींकडेही माणूसने आपल्या वार्तापत्रांतून विशेष लक्ष पुरवलं. अण्णा हजारे यांच्या कार्याचा परिचय, सांगली – मिरजेचे अपंग पुनर्वसन केंद्र, पिंपरी चिंचवडमधले दलित–पँथर्स, पेण–पनवेलकडचे रसायनी जवळचे पाण्याचे प्रदूषण या सारख्या विषयांवर याच वर्षात लिहून आलं.

येत्या नवीन वर्षाच्या अशाच काही योजना आहेत. प्रदूषणविरोधी एक स्वतंत्र 'पर्यावरण विशेषांक' ही त्यापैकी एक.

माणूसच्या या नव्या वासंतिक अंक योजनेला माणूसचे लेखक आणि जाहिरातदार कितपत प्रतिसाद देतात याबद्दल मनात किंचित शंका होती. पण मुद्दाम उल्लेख करण्यासारखी गोष्ट म्हणजे लेखक–जाहिरातदारांनी या योजनेला अतिशय उत्तम प्रतिसाद दिला. वाचकांनीही. या सर्वांच्या सहकार्यामुळेच ही मालिका यशस्वी करता आली.

–संपादक



**लग्नाच्या त्या पहिल्या वर्षात घटस्फोटाची कल्पनाही मनाला शिवली नाही. आपण जुळवून घेऊच... आज ना उद्या गाडी मार्गाला लागेल असे वाटत होते...**

# माझा घटस्फोट

●


**अरुणा साठे**

मी घटस्फोट घेऊन साधारण दोन वर्षे झाली. मी घटस्फोट का घेतला ? पती व्यसनी म्हणून ? त्याचे कोणते दुसरे लफडे म्हणून ? मारहाण करतो म्हणून ? नाही यापैकी काहीच नाही.

मध्यमवर्गीय ब्राह्मण कुटुंबातली मुलगी मी. लहानपण गेले चारचौघींसारखे. आई-वडिलांच्या छत्राखाली अगदी सुखात,आनंदात घरात रा. स्व. संघाचे वातावरण. संघाच्या लोकांची नेहमी वर्दळ. त्या गप्पा नेहमी कानावर पडत. शाळेत असताना मॉनिटर व्हायचे मुली जमवून काही तरी कार्यक्रम बसवायचे अशी धडपड अंगात होती. या धडपडीला आई-वडिलांचे प्रोत्साहनच होते. पुढे कॉलेज-मध्ये गेल्यावर या धडपडीला एक शिस्त आली. माझा एका सामाजिक संघटनेशी संबंध आला. मी या संघटनेची कार्यकर्ती झाले. संघटनेचे किती तरी कार्यक्रम वर्षभर चालत. या सगळ्यांची उसाभर करण्यात फार आनंद वाटायचा मन:पूर्वक उत्साह वाटायचा या सगळ्यातून हळूहळू विचारांना एक दिशा येत होती. व्यक्तिमत्त्व आकार घेत होते. भोवतालच्या परिस्थितीचे तणाव जाणवत होते. स्वत:चे आयुष्य कसे जगायचे हेही ठरत होते. अगदी पदवीधर झाल्याबरोबर लग्न करून लगेच एक-दोन वर्षात मुलाला जन्म देण्यात जीवनाची सार्थकता नाही असे अगदी ठाम मत बनले. आपण आपल्या कुवतीनुसार काही तरी करायचे अगदीच चारचौघींसारखे चूलमूल अधिक कारकुनी करीत जगायचे नाही हे मी पक्के ठरविले, एप्रिल१९७३ मध्ये मी B Sc झाले. लग्नाची घाई मला नव्हती. लेकीला उजविण्यासाठी आई-वडीलही उतावळे झालेले नव्हते. अभ्यास संपला होता एक वर्ष तरी अगदी मनमोकळे घालवायचे, कोणत्याही सभा-संमेलनांना जायचे, अभ्यासवर्ग, मोर्चे यातील पडेल ती जबाबदारी अंगावर घेऊन अथपासून इति-पर्यंत पार पाडायची असे मी ठरवले आणि त्याप्रमाणे कृतीही केली. ते वर्ष चांगले गेले. किती तरी अनुभव मिळाले. साध्या सहलीसाठी मुलींना घराबाहेर काढायला किती त्रास पडतो, त्यांच्या पालकांना कसे पटवावे लागते ते कळले. मोर्चामध्ये सामील होणे सोडाच; पण मोर्चा बघायला येण्याचीसुद्धा काही जणींना भीती वाटायची. अशा किती

तरी गोष्टी.

पदवीधर झाल्यानंतर साधारण एक वर्षानं मी नोकरीला लागले. तेथे माझी युनियनची कामे धडाक्यात सुरू झाली. सरक्युलर ड्राफ्ट करणे, त्याच्या प्रती काढणे, वाटणे, गेट मीटिंग्ज–सगळ्यात माझा सहभाग होता. शिपायांपासून ऑफिसरपर्यन्त सगळ्यांच्या ओळखी झाल्या. खूप मित्र-मैत्रिणी मिळाल्या. नोकरीत काही काळ घालवल्यावर विवाहाचा विषय सुरू झाला. माझ्या वडिलांनी मला प्रथम विचारले, 'अरुणा, तू तुझे कोठे जमवले आहेस का ? तू तुझे जमवले असलेस तर कोणत्याही जातीचा मुलगा असला तरी मला काही वाटणार नाही.' मी माझे लग्न ठरविले नव्हते. अर्थातच ती कामगिरी मी वडिलांवर सोपविली. त्यांच्या मताशी मी सहमत होते. मी फक्त एवढेच सांगितले, 'हुंडा घेणारा मुलगा मला नको. मीही मुलाच्या पैशाकडे पाहून लग्न करणार नाही. कोणतेही थाटमाट न करता रजिस्टर पद्धतीने लग्न केलेले बरे. मुख्य म्हणजे स्वयंपाकघरात बुडून जाणे मला जमणार नाही. माझी सार्वजनिक कामं चालूच राहिली पाहिजेत.' माझ्या या मतांना वडिलांचाही विरोध नव्हता. वडील जेव्हा कोणत्या मुलाकडे जात तेव्हा माझी माहिती, उंची, वय, रंग, शिक्षण, नोकरी हे सगळे सांगताना एक गोष्ट आवर्जून सांगत, 'माझ्या मुलीला सार्वजनिक कामाची आवड आहे. घरातली कामे तिला येतात. घरात पाहुणे यायचे आहेत. ती सगळं व्यवस्थित करेल; पण तिला जर त्याच दिवशी मीटिंग असेल तर पाहुण्यांची वेळ मागेपुढे करून मीटिंगला जायचे ते ती जाईलच !' यामुळे असेल किंवा काहीही असेल बघायला लागल्यावर लगेच काही माझे लग्न झाले नाही. नंतर आणीबाणी आली. विवाहाचा विचार मग मी बाजूलाच टाकला. माझ्या संघटनेच्या अनेक कार्यकर्त्यांबरोबर मी तुरुंगात गेले. तीन–चार महिन्यांनी सुटून आले. नंतर निवडणुकीची एकच धमाल उडवून दिली. एका लोकसभा मतदारसंघात मी युवा गटाची प्रमुख होते. ते दिवस बेहोषीत गेले. विवाहाचा विचार एका बाजूला सुरूच होता. एके दिवशी वडील एक मुलगा पाहून आले. पहाण्याचा समारंभ करण्याची त्याची इच्छा नव्हती म्हणून हॉटेलमध्ये भेटण्याचे ठरले. मला ते बरेच वाटले मी, माझे वडील आणि तो मुलगा हॉटेलमध्ये गेलो गप्पा झाल्या– राजकारण, संगीत वगैरेबद्दल. तो मुलगा कम्युनिस्ट विचारसरणीचा होता. केवळ विचारसरणीचा नाही तर कम्युनिस्टपक्षाचा कडवा कृतिशील कार्यकर्ता. तो मला म्हणाला 'तुम्ही संघ विचाराच्या आहात. संघाची माणसे ऑर्थाडॉक्स. माझे त्यांच्याशी कधीच पटणा नाही. म्हणून आपण पुढे जाण्यात अ नाही.' मी म्हटले, 'असा ग्रह का ? म संघाची असले तरी प्रतिगामी, कर्मठ आ असे मला वाटत नाही. स्त्रीने केवळ चूलमू पहावे असे माझे विचार नाहीत. उल थोडे तरी वेगळे जगायचा प्रयत्न कराव असा माझा अट्टाहास आहे. मला किती तर मित्र–मैत्रिणी आहेत. पहाण्याच्या समारंभा ऐवजी हॉटेलमध्ये केवळ गप्पा मारणेहे मला अधिक बरे वाटले म्हणूनच मी आले मला ऑर्थाडॉक्स का म्हणता ?' परंतु त पुन्हा म्हणाला, 'मी काही कम्युनिस्ट पक्षाच केवळ मतदार नाही. मी ॲक्टिव आहे. तुमच्या संघटनेच्या कार्यात तुम्हीही ॲक्टिव आहात या दोन पक्षांचे कधीच जमणार नाही. तेव्हा काही अर्थ नाही !' मला काही ते पटले नाही; पण तो विषय तिथेच संपला.



यानंतर लवकरच माझे लग्न ठरले. मुलगा माझ्याएवढाच शिकलेला. चांगली नोकरी. त्यांना हुंडा नको होता. माझ्या सार्वजनिक कामाआडही ते लोक येणार नव्हते. मी निवडणुकीच्या प्रचारात गेट मीटिंग्ज घेतल्या होत्या, भाषणे केली होती, याचे मुलाच्या वडिलांना कौतुक वाटले. मुलाच्या वडिलांनी माझ्या आवडीनिवडींची आस्थेने चौकशी केली. मला बरे वाटले. कारण आतापर्यंत कोणीच अशी चौकशी केली नव्हती. मुलाची आई कीर्तने करणारी होती. म्हणजे तिच्याही आयुष्याला थोडी सार्वजनिक बाजू होती. मुलगा स्वतः विशेष बोलला नाही; पण जुजबी बोलला. त्या सगळ्यांनी आमचे घर बघितले. आमच्या घरातला देव्हारा बेडरूममध्ये होता. त्या वेळी 'देव इथे ?' असे जरासे पुटपुटला. मुलाने खांदे उडवले असे भावाने सांगितले; पण ते कोणीच एवढ्या गंभीरपणे घेतले नाही. मुलामध्ये नाही म्हणण्यासारखे काही नव्हते. मी होकार दिला. लग्न ठरले. मात्र धार्मिक विधिपूर्वक लग्न करण्याची मुलाची आणि त्याच्या घरच्या माणसांचीही इच्छा होती. आई म्हणाली, 'अरुणा, केवळ रजिस्टर लग्नासाठी अडून बसू नकोस !' मीही या विषयावर फार ताणून धरले नाही.

मी त्यांच्या मताप्रमाणे लग्न करण्यास रुकार दिला. लग्न ठरल्यानंतर सहा महिन्यांनी होणार होते. या काळात मी आणि रमेश अनेकदा फिरायला गेलो. माझ्या मैत्रिणी-मित्र सगळ्यांबद्दल मी त्यांना भरपूर सांगत असे. आणीबाणी, निवडणुका याबद्दलही उत्साहाने बोलत असे. रमेशनी स्वतःहून काही विचारले नाही; पण मला वाटायचे, नसतो बोलण्याचा स्वभाव एकेकाचा! रस्त्याने माझ्या ओळखीची बरीचजणं भेटत. रमेशच्या ओळखीचे फारसे कोणी भेटत नसे. तो काही माझ्यासारखा चौफेर फिरणारा नव्हता. त्यामुळं मी ते गृहीतच धरले होते. कधी मला कोणी मित्र भेटला तर त्याच्याशी बोलतच मी रमेशच्या घरा-पर्यंत जात असे. रमेशचाही त्यावर आक्षेप असल्याचे मला जाणवले नाही.

आमचे लग्न झाले. ऑफिसतर्फे रमेशना जागा मिळणार होती. त्याला दीड दोन महिने अवकाश होता. माझ्या दिरांच्या वन-रूम किचनच्या जागेतच आम्ही आलो. एक अविवाहित धाकटा दीरही तथेच होता. माझे नवे आयुष्य सुरू झाले. घरात हिशोब लिहि-ण्याची पद्धत होती. अगदी एवढीशी कोथिंबीर आणली तरी त्याचा हिशोब लिहा-यचा. सगळ्यांनी तो खर्च वाटून घ्यायचा. माझ्या माहेरी अशी पद्धत नव्हती; पण एका कुटुंबातून दुसऱ्या कुटुंबात आल्यावर एवढासा बदल जाणून त्याच्याशी रुळून जायलाच हवे होते. त्यात मोठेसे काय? मी ही पद्धत अंगवळणी पाडून घेतली. कटकटी टाळण्याच्या दृष्टीने ही पद्धत चांगलीच होती याबद्दल प्रश्नच नाही. एके दिवशी, मला वाटतं लग्नानंतर पंधरा दिवसांची ही गोष्ट असेल! मी बाथरूममध्ये स्नानाला गेले होते. घरात वाद सुरू झाला. मला आत सगळे ऐकू येत होते. माझ्या सासूबाई गावी परत जाताना माझ्या जाऊबाईंना सांगून गेल्या होत्या की, आमच्या लग्नानिमित्त मोलकरणीला पाच रुपये दे. जाऊबाईंनी मोलकरणीला पाच रुपये दिले व ते हिशोब-वहीत लिहून ठेवले. दिराने म्हटले, 'पाच रुपये दिलेच का? मी ते भरायला मुळीच तयार नाही 'जाऊ काही तरी बोलली. धाकटा दीरही चिडून वाद घालू लागला. त्या पाच रुपयांवरून रण माजले. कोणाचा वाटा किती त्याचा पंचनामा सुरू झाला. रमेशही बोलू लागले. पाच रुपये देण्यापूर्वी इतरांना विचारायला नको होतं का असा कीस काढणे सुरू झाले. मला वाटले रमेशने म्हणावे, 'माझ्या लग्नाप्रीत्यर्थ ते पाच रुपये दिले आहेत ना मी ते देऊन टाकतो!' पण रमेश तसे बोलले नाहीत. मला आत्यंतिक चीड आली. संध्याकाळी मी रमेशना म्हटले, 'तुम्ही ते पाच रुपये देऊन का टाकले नाहीत? आपल्याच तर लग्नानिमित्त मोलकरणीला दिले आहेत!' रमेश थंडपणे म्हणाले, 'मी कशाला देऊ? माझ्या वाट्याला हिशोबा-प्रमाणे एकच रुपया येतो तेवढा मी देईन. मी काही मोलकरणीला लग्नाचे पाच रुपये द्या म्हणून म्हटले नव्हते.' मला संताप आला आणि वाटले, किती हा माणूस क्षुद्र! माझ्या माहेरी नेहमी कामाला मोलकरीण नव्हतीच. लग्नापुरतीच एक मोलकरीण आली होती. तिला सुद्धा आईने पातळ घेऊन दिले होते. रमेशना म्हटले, 'तुम्ही नका देऊ; पण मीच ते पाच रुपये देऊन टाकते.' त्यांना ते मुळीच पटले नाही. मी माझा संताप गिळला. रमेशच्या नकळत पाच रुपये दिले. दीडदोन महिन्यातच आम्ही स्वतःच्या जागेत आलो. रमेशच्या ऑफिसवीच कॉलनी होती. माझ्या ओळखीची एक मुलगीही तेथे होती. आधीच मी जास्त बोलकी. त्यात त्या मैत्रिणीमुळे माझ्या सगळीकडे भराभर ओळखी झाल्या. रस्त्याने जाता-येता माणसे माझ्याशी थांबून बोलू लागली. ते रमेशच्या ऑफिसचे लोक होते; पण रमेशची कोणाशी मैत्री नव्हती. हळूहळू मला ते जाणवू लागले. ऑफिस-मध्येही त्यांना मित्र नव्हते. तुसडे असाच त्यांचा लौकिक होता, असेही ऐकू येऊ लागले; पण मला त्यात त्या वेळी गंभीर काही वाटले नाही. हळूहळू मी कोणाशी बोललेली त्यांना आवडत नाही असेही जाणवू लागले. मी संघाच्या विचारसरणीची! माणूस चुकतो, बदलतो, सुधारतो, चांगला होतो— यावर माझा पूर्ण विश्वास. भांडणे, तडजोडी या वाटेने माझा संसार सुखाचा होत राहील असेच मला वाटले. मी गावाहून सासू-सासऱ्यांना बोलावून घेतले. मी दीर-नणंदानाही घरी बोलवत असे. दीर-नणंदांच्या या गोतात सख्खे-सावत्र असे जरा होते. मी तिकडे लक्षच दिले नाही. ते सख्खे-सावत्रपण माझ्या वाटेत कुठे आलं नाही. भावंडांचेही कोणाचे रमेशशी पटत नसे, असे नणंदांच्या



बोलण्यावरून कळू लागले.


एके दिवशी ऑफिसमधून मी घरी आले. माझ्या नावे एक पत्र होते ते माझ्या डिपार्टमेंटमधील बंगलोरला बदलून गेलेल्या माणसाचे पत्र होते. माझ्यापेक्षा वयाने बराच मोठा, अमराठी, अविवाहित माणूस होता तो. आमची मैत्री होती. पत्र इंग्लिशमध्ये होते. पत्रात त्याने माझी विचारपूस केली होती. लग्नानंतर मी पत्र पाठवीन असे त्याला वाटले होते; पण मी पत्र न पाठवल्यामुळे माझ्या आईकडे पत्र पाठवून पत्ता मिळविल्याचे त्याने लिहिले होते. बंगलोरच्या ऑफिसमध्ये मुंबईसारखा ग्रुप नाही. मी इकडे रमत नाही, शरीराने बंगलोरला असलो तरी मनाने मुंबईलाच असतो. तुमची सगळ्यांची आठवण होते वगैरे मजकूर होता. पत्राची भाषा खरोखरच सुंदर होती. मी पत्र वाचले. नंतर रमेशला दिले. रमेश म्हणाले, 'त्यात काय वाचायचंय ! तुमच्यावाचून त्यांना करमत नाही हेच ना !' मी म्हटले, 'अहो, पत्र वाचा. मग कळेल काय आहे त्यात !' रमेशनी आधीच ते पत्र वाफेवर धरून किंवा कोणत्या तरी मार्गाने ते उघडले होते आणि वाचून परत चिकटवून ठेवले होते हे मला रमेशच्याच बोलण्यावरून कळले. त्यांच्या या संशयाची चीड आली. माझे पत्र फोड ल्याचा मला मुळीच राग आला नाही; प ते असे वाममार्गाने फोडून पुन्हा बंद करू ठेवण्याचा मला राग आला. मी रमेशन म्हटले, 'मी पत्र सरळ तुम्हाला वाचायल दिले. यात तुम्ही काय ते समजून घ्या. मल जर चोरटा पत्रव्यवहार करायचा असत तर मी ऑफिसच्या पत्त्यावर पत्र मागवू घेऊ शकत नाही का ?' ते तिसरेच काह तरी बोलत राहिले. त्यांच्या संशयाने मल दुःख झाले आणि तीव्र संतापही आला. लग्न ठरल्यापासून सहा महिन्यात माझ्या स्वभा वाची त्यांना ओळखच झाली नव्हती का ? मं तर स्वतःबद्दल त्यांच्याजवळ चिकार बोलले होते. उधळायचे असते तर मला संधं नव्हती असे थोडेच होते ? पण हे पटेल तर विसाव्या शतकात पत्नीचा मित्र ही कल्पना न स्वीकाणारा हा माणूस विचारांनी कोता वृत्तीने संकुचित आहे अशी एक गाठ माझ्य मनात बसली. नंतर या विषयावर त्यांच्याशी बोलण्याचा मी खूप प्रयत्न केला; पण संवादच ( communication ) शक्य होत नव्हता आमल्या स्वभावात मुळातच

आमच्या स्वभावात मुळातच खूप फरक होता. त्यामुळे एकसारख्या ठिणग्या उड़ लागल्या. मी आधुनिक विचारसरणीची, स्त्री–पुरुष समानता मानणारी. ते तसे पारंपारिक. त्यांच्या आधुनिकतेची मजल स्त्रीने पैसा मिळविण्यासाठी नोकरी करावी इतकीच होती. यापलीकडे स्वतःच्या हौसेसाठी, विकासासाठी, समाजासाठी पत्नीने काही केले तर ते त्यांना मानवत नव्हते. मला देवपूजा, व्रतेवैकल्ये या गोष्टीत रस नव्हता. किंबहुना कंटाळाच होता. रमेश याबाबत आस्तिक होते. मला माणसे हवीत, त्यांना मुळीच नकोत. ते अगदी चिक्कू. मी देण्याघेण्याच्या बाबतीत हाताला सढळ. संघर्षाचे अनेक लहान–मोठे प्रसंग येऊ लागले. एक सांगायला पाहिजे, सासरे आणि सासूबाई दोघांशी माझे चांगले पटत असे. त्यांच्याशी कधी झगडे झाले नाहीत; पण त्या जुन्या पिढीतल्या माणसांचा समंजसपणा रमेशमध्ये नव्हता. एकदा माझे सासरे आजारी होते. त्यांचे करण्यात माझा बराच वेळ जायचा. ऑफिसला जाण्याची घाई तर असायचीच. त्या दिवशी बाहेरच्या गाद्या–




अंथरुणे आवरायला मला वेळच झाला नव्हता. माझी स्वाभाविक अपेक्षा अशी होती की, रमेशने गाद्या आवराव्यात. ते काही झाले नव्हते. मी स्वयंपाकघरात काम करीत होते. रमेशनी येऊन मला सांगितले, 'आज अजून गाद्या आवरायच्या राहिल्या आहेत.' मी म्हटले, मला आता वेळ नाही, आज जरा तुम्ही ते काम करा!' रमेशनी आवाज चढवून पुन्हा तेच सांगितले. मीही चिडले. म्हटले, 'गाद्या तुम्ही आवरा. माझा अजून स्वयंपाक व्हायचा आहे आणि मलाही ऑफिसची घाई आहे.' रमेशने चिडून सांगितले, 'हे काम पुरुषांचे नाही, मी ते काम करणार नाही!' मग मात्र मी फारच तडकून म्हटले, 'तुम्हाला नाही आवरायच्या तर पडू देत गाद्या रात्रीपर्यंत! रात्री पुन्हा अंथरायला लागतातच आणि मी तुम्हाला सांगून ठेवते, हे काम रोजच तुम्ही करायला पाहिजे. आजपासून रोजची भाजीही तुम्हीच आणत जा. ह्यापुढे ही कामे मी करणार नाही.' हे म्हटल्यावर एकच भडका उडाला. सासूबाई मला आर्जवाने म्हणाल्या, 'तू त्याला समजून घे. सगळेच पुरुष असे असतात.' मी म्हटले, 'ते कुठे मला समजून घेतात?' सासूबाई गप्प बसल्या. बहुतेक त्यांच्या संस्कारांना माझे म्हणणे पटले नसावे; पण बुद्धीला पडले असावे, असे मला एकंदर वाटले. मला सासूबाईंचा मुळीच राग आला नाही. त्या जुन्या पिढीच्या होत्या, म्हणून त्यांचे विचार जुने असणे स्वाभाविक होते. शिवाय आई मुलाचीच बाजू घेणार, तिला मुलाचीच बाजू पटणार हेही स्वाभाविक होते; पण मलाही माझी बाजू होती. दोघांनी ऑफिसला बाहेर पडायचे तर एकमेकांना मदत नको का करायला? मी पोळ्या लाटल्या तर तुम्ही भाजायला उभे रहा अशी अतिरेकी मदतीची अपेक्षा मी करीत नव्हते; पण गाद्या आवरण्यासारखी वा बाहेरच्या बाहेर होण्यासारखी काही कामे त्यांनी स्वत: समजून करावीत अशी माझी अपेक्षा होती. स्वत:ला नाही सुचले तर निदान दुसऱ्यांनी सांगितल्यावर तरी करावे, तेही नाही! पुरुषी अहंकाराच्या मुजोरीने बोलू तरी नये. ह्या मुजोरीची प्रतिक्रिया म्हणूनच काही कामे तुम्ही केलीच पाहिजेत, असे मी ठासून सांगितले.

असे खटके उडत होते; पण मी माझ्या परीने तडजोडीच्या प्रयत्नात होते. एकदा मी रमेशला विचारले, 'जहांगीर आर्ट गॅलरीतले प्रदर्शन बघायला जाऊ या का? तुम्ही माझ्या ऑफिसला या, मग आपण जाऊ.' रमेशने सरळ उत्तर द्यावे ना? पण ते कुजकेपणाने म्हणाले, 'ही तुमच्या हायर मिडल क्लासची फॅडस् आहेत. मला त्यात इंटरेस्ट नाही.' मी हसत म्हटले, 'मला सगळी चित्रे कळतात असे मी कुठे म्हणते? पण समजून घ्यायचा प्रयत्न करावासा वाटतो. भोवताली जे आहे, जे घडते ते पहावे, जाणून घ्यावे असे नाही का तुम्हाला कधी वाटत?' त्यांना काही माझे पटले नाही. ते माझ्याबरोबर आले नाहीत. कोणाला वाटेल नाही गेले जहांगिरला किंवा आणखीही कोठे तर काय बिघडले? न जाण्याने खरंच काही बिघडत नाही. वेळ नसल्याने ते आले नसते तर मला काही वाटले नसते; पण ती जीवनदृष्टीच नाही व ज्यांना ती आहे त्यांच्याबद्दल हेटाळणी करायची. ते मला ठसठसायचे. चालायचेच म्हणून मी ते सोडून दिले आणि आपल्याला जे आवडते त्याचा आनंद आपल्या मित्रमैत्रिणींबरोबर मिळवायचा असे मी ठरवून टाकले; पण त्यांना तेही आवडायचे नाही. एकदा किशोरी आमोणकरच्या गाण्याला जाण्यावरून वाद झाला आणि मी हे न आल्यामुळे माझ्या भावाबरोबर गाण्याला निघून गेले. घरी आले तेव्हा रमेश बिघडलेले होते. हे आले नसताही मी अशा कार्यक्रमाला गेले ही त्यांची घोर अवज्ञा झाली होती. मोठा अपमान झाला. आता ह्यात अपमानाचा प्रश्नच कुठे होता? मला माझ्या स्वत:च्या आवडीनिवडी नव्हत्या का? माझ्या माहेरी कोणी एकमेकांच्या मार्गात येत नसे. एकमेकांच्या आवडी–निवडीवर कोणी आक्रमण करीत नसे. वडील देवपूजा, व्रतवैकल्ये यांच्या व्यापात नसत; पण आई नित्यनेमाने देवपूजा करी. वडिलांनी कधीच तिला नको म्हटले नाही वा तुच्छ लेखले नाही. आवडीनिवडीच्या बाबतीतही आम्हाला स्वातंत्र्य होते. अशा वातावरणात वाढलेली मी. नवऱ्याच्या प्रत्येक लहरीवर नाचणे मला शक्यच नव्हते. नवऱ्याकडून कोणतीही अपेक्षा न करता आपण आपल्याला आवडेल




ते करायचे, नवऱ्याबद्दल कडू भाव मनात ठेवायचा नाही एवढे मला सहजपणे जमू शकत होते.


सूर जुळत नव्हते. आंतरिक ओढ वाटत नव्हती असा आमचा कोरडा संसार सुरू होता. दिवस चालले होते. आमच्यातल्या संघर्षाची मी आईवडिलांना जराही कल्पना दिली नाही. कारण त्यांना दु:ख होईल असे बोलणे नको वाटे. भाऊ मात्र पुष्कळदा घरी येत असल्याने त्याला थोडीफार कल्पना होती. असे जरी सगळे होते तरी लग्नाच्या त्या पहिल्या वर्षात घटस्फोटाची कल्पनाही मनाला शिवली नाही. आपण जुळवून घेऊच. आज नाही उद्या गाडी मार्गाला लागेल अशी मला आशा किंवा दृढ विश्वासच होता असे म्हणायला हरकत नाही. रमेशचा तिरसटपणा वाढतच चालला होता. रस्त्यात कोणी थांबून माझ्याशी बोलू लागले की ते तरातरा पुढे निघून जात, नाही तर ढिम्म चेहरा करून उभे रहात. हरतऱ्हेने आपल्या वागण्याने त्या माणसाचा अपमान करीत. पक्की संघवाली मी. माणसेच ना आम्ही क्वचित कलि शिरायचा!

माणसेच ना आम्ही क्वचित् कलि शिरायचा।
ठेवूनी विवेक सर्व कलह आवरायचा ॥

या ओळी मनात अगदी कोरलेल्या. मी विचारपूर्वक माझ्या वागण्यात बदल केले. रमेशना आवडत नाही तर भोवताली बोलणे-मिसळणे (विशेषत: पुरुषांमध्ये) बरेच कमी केले. ऑफिसच्या युनियनची कामे मात्र मुळीच कमी केली नाहीत. कारण इतरांमध्ये कमी बोलणे, बसणे म्हणजे सवय बदलणे एवढेच वाटते. युनियनचे काम बंद करणे म्हणजे जीवनमृत्यच इरेला पडल्यासारखे वाटले. एके दिवशी माझे चुलत सासरे ऑफिसमध्ये आले होते. आमचे ऑफिस खूपच मोठे. त्यांनी गेटवरच्या दरवानाला माझे डिपार्टमेंट कोठे आहे ते विचारले. दरवानाने डिपार्टमेंट कोठे ते सांगितले आणि कोणाला भेटायचे आहे तेही त्यांना विचारले. सासऱ्यांनी माझे नाव सांगताच दरवानाने म्हटले, 'चलो हम आपको वहाँ तक पहुँचा देंगे।' सासरे नको म्हणाले; पण दरवानाने त्यांना म्हटले, 'वो बहेनजी तो हमारे लिये कितना काम करती है। उनके मेहमानोंके लिये हमे इतना तो करने दीजिये।' माझ्या सासऱ्यांना यामुळे माझे अगदी कौतुकच वाटले. त्यांनी ते मला बोलून दाखविलेच; पण जेव्हा ते घरी आले तेव्हा ही गोष्ट आवर्जून घरातल्या सगळ्यांना तशीच कौतुकाने सांगितली. रमेश तेव्हा बोलले नाहीत.




नंतर माझ्यावर चिडले. तिरसटून म्हणाले, 'ऑफिसच्या गेटपासून तुमच्या नावाचे झेंडे मिरवायला लागलेले दिसताहेत!' मी वाद वाढविलाच नाही; पण एवढ्याने निभत नव्हते. एके दिवशी रमेशनी मला विचारले, 'एवढे पैसे तुझ्या पर्समध्ये कोठून आले?' खरं म्हणजे दोन–तीनशे रुपयेच तर असतील. माझ्या माघारी पर्स उघडली त्याचे मला काही नाही. तो त्यांचा अधिकारच होता; पण ज्या संशयाने त्यांनी विचारले ते चीड आणणारे होते. तरीही मी खरी गोष्ट सांगितली, 'ते पैसे माझ्या मावशीचे आहेत. मावशी तिचे पैसे साठवायला नेहमीच माझ्याकडे देते. नंतर एकदम तिला त्याचे काही तरी घ्यायचे आहे!' रमेशचे समाधान झाले नाही. त्यांनी विचारले, 'मावशी तुझ्याकडे पैसे देते हे तू मला का सांगितले नाहीस?' 'मला आठवण नाही. बोलण्याच्या ओघात कधी विषय निघाला नाही. खरं म्हणजे इतकी फालतू गोष्ट आहे की तुम्ही एवढी चौकशी का करावी कळत नाही. मी नोकरी करते. समजा मी तुम्हाला मावशींनी पैसे दिले हे सांगितलंच नसतं तर? माझ्याजवळ काय वेळेला एवढे पैसे असू शकत नाहीत?' रमेश तेव्हा गप्प बसले. नंतर चार–पाच दिवसांनी मला मावशीकडून कळले, रमेश तिच्या घरी डोंबिवलीला गेले. ती केव्हा, कशासाठी किती पैसे अरुणाकडे देते वगैरे चौकशी केली. मावशीलाही आश्चर्य वाटले. कधी घरी न आलेला जावई आणि पहिल्यांदाच आल्या आल्या या चौकशा! तिला विचित्र वाटले; पण ती काही खोलात शिरली नाही. तिने खरे ते सांगितले. माझ्या मावशीच्या घरी जाऊन आल्याचेसुद्धा हा गृहस्थ मला बोलला नाही आणि माझी मात्र प्रत्येक गोष्ट याला माहिती असायला पाहिजे ही मुजोरी, हा अविश्वास असह्य होऊ लागला. पुढे पुढे हे वारंवार घडू लागले. शेजारी, नात्याच्या लोकांमध्ये कोठेही मी जाऊन आले की, रमेश माझ्यापाठोपाठ जात. मी कशासाठी आले होते याची चौकशी करीत. रमेशबद्दल काही बोलले का हे आवर्जून विचारीत. मला मात्र काही सांगत नसत. मला ते लोकांकडून कळे. प्रत्येक गोष्ट बिनसतच चालली. आरशापुढे उभी राहून मी पावडर लावीत होते. माझ्याकडे पहात रमेश



तुमडेपणाने म्हणाले, ' कितीही पावडर लावलीस तरी फरक पडणार नाही !' टोचले तरी मी सोडून दिले. आता तशी सवयच झाली होती; पण मग हे वारंवार घडू लागले. ' तू दिसायला चांगली नाहीस. मला मॅच नाहीस !' हे रमेशचे टुमणे चालू झाले. त्यांच्या दृष्टीने ते गोरे, घारे म्हणजे देखणे, चितळे आडनावाला साजेसे होते–इतकी'काही तरी दिसतेस ! कसं तुझ्या मित्रांना तुझ्याशी बोलायला आवडतं कोणास ठाऊक ?' रमेश एकदा बोलले. मी तडकून प्रत्युत्तर केले, ' माझं रूप चांगलं नाही; पण ठरल्यानंतर चांगलं सहा महिन्यांनी लग्न झालं तेव्हा हे कळलं नाही ? तेव्हाच नको म्हणायचं होतंत! माझ्या वडिलांनी काही एक मुलगी दाखवून दुसरीशी तुमचं लग्न नाही लावलं. आम्ही काही तुमच्या मागे हात धुऊन लागलो नव्हतो माझ्याशी लग्न कराच म्हणून !' माझ्या उत्तरावर नेहमीची कटकट, धुसफुस, तिरसटणे !

माझे मानसिक अस्वास्थ्य वाढू लागले. आपण जमवून घेऊच हा आत्मविश्वासही डळमळू लागला. ब्लडप्रेशर लो जाऊ लागले. तरीही आई-वडिलांना सांगण्याचा धीर होत नव्हता. आई-वडील समंजस असूनही वाटायचे, नको. ऐकून त्यांना त्रासच होईल.आपण आपले निभावू. भावाला मात्र आता सगळ्या गोष्टींची कल्पना आली होती; पण उघड वाच्यता आम्ही कोणीच केली नव्हती. कारण मी कितीही उड्या मारायला बघितल्या, आई-वडील पुरोगामी असले तरी चुलीतले लाकूड चुलीतच जळले पाहिजे, असे सांगणारी परंपरा, संस्कृती भोवती खडी होती. मनाचा गोंधळ होऊ लागला. काय करावे ते समजेनासे झाले. या असल्या ताणांनीच मी आजारी झाले. विश्रांतीसाठी माहेरी आले. दहा दिवस आराम केला. बरे वाटले. नंतर घरी जाणारच होते. आधी दोन दिवस रमेशना तसे कळविले. जाण्याच्या आदल्या दिवशी घराजवळच्या एका ठिकाणी मी व्याख्यान ऐकायला आईबरोबर गेले. नेमके त्याच दिवशी रमेश घरी आले. घरी माझी मामी आलेली होती. मी घरात नाही,व्याख्यानाला गेले आहे म्हटल्याबरोबर रमेश जोरात उसळले, ' आजारी म्हणून इथं येते आणि व्याख्यानाला बरं जाता येतं?'भाऊही चिडला. त्याने आवाज चढवून म्हटले, ' आधी आत या!' रमेश आत आल्यावर भावाने सुनावले, ' पाहुण्यांच्या समोर तमाशा करण्याची जरूर नाही. उद्या अरुणा तुमच्याकडे येणार तर आज ती अंथरुणावर पडून रहाण्याइतकी आजारी असेल असं तुम्ही गृहीत धरता का? भावाच्या बोलण्याने ते मुकाट झाले; पण मी जेव्हा घरी आले तेव्हा त्यांनी मला सांगितले, ' तुझ्या भावाने माझा अपमान केला. तो माझ्या घरी येता कामा नाही.' भाऊ यायचा बंद झाला. मला हे स्वीकारायलाच लागले. लग्नानंतर पहिल्या वर्षी मूल नकोच असे मी योजलेले होते. आता पक्के ठरविले. या घरात आपण निश्चित रहाणार किंवा नाही ते ठरविल्याशिवाय मूल नकोच. कारण मूल जन्माला आल्यावर सगळेच प्रश्न फार वेगळे होतात.

वटसावित्रीचा दिवस होता. मी पूजा, उपास केला नाही. सासूबाईंनी विचारले तेव्हा मी म्हटले, मला हे असले उपासतापास आवडत नाहीत. माझा विश्वास नाही.त्यातून तुमच्या म्हणण्याप्रमाणे विश्वास ठेवायचाच तर सात जन्मी हाच नवरा मागायचा म्हणजे साती जन्म स्त्रीचेच मागून घ्यायचे. का म्हणून प्रत्येक जन्मी मीच स्त्री व्हावं ?' सासूबाई हसल्या आणि त्यांनी सोडून दिलं; पण रमेशनी मात्र सोडलं नाही. ते भडकून म्हणाले, ' मला दीर्घायुष्य मिळावं असं तुला वाटतच नाही म्हणून तू उपास करत नाहीस. ' असल्या भाकडकथांवर माझा विश्वास नाही.' मी चोख सांगितलं. आधीची एक वटसावित्री मी उपास न करताही तशी जरा बिनबोभाटच पार पडली होती; पण नंतरच्या वटसावित्रीनंतर मात्र वेगळं सत्र सुरू झाले. ' तू रोज पूजा केली पाहिजेस.' रमेश सांगते झाले.' मी मुळीच पूजा करणार नाही' मी बोलती झाले. रमेश चिडले हे सांगायला नकोच. या वेळी चिडून बोलण्यात नवा मुद्दा आला. ' तुला कसली आली आहे देवाधर्माची चाड ? तुझ्या घरात आई वडिलांनी देव्हारा चक्क बडरूममध्ये ठेवून दिला आहे. ही काय देवाची जागा झाली ?' मी संतापून म्हटले, तुम्ही मला काय वाटेल ते म्हणा. माझ्या आईवडिलांना काही बोललेलं मी ऐकून घेणार नाही.' पूजेचा मला कंटाळा असला तरी वैर नव्हते. एरवी मी केलीही असती; पण ज्या चढेल उद्धटपणे त्यांनी ते सांगितले त्याचा राग येऊन मी नाही म्हटले.

असे दिवस चाललेले होते. निर्णय होत नव्हता. तरी एकीकडे आम्ही ओनरशिपची जागा घेण्याचा विचार करीत होतो. त्यासाठी मी सगळा संसारखर्च माझ्या पगारात चालवायचा आणि रमेशने त्याचा सगळा पगार शिल्लक टाकायचा अशी आखणी झाली होती आणि ती अंमलातही आली होती. जागेसाठी मला आईने दहा हजार रुपये दिले. नंतर रमेशने तीन हजार रुपये दिले. काळ चालला होता. रमेश कटकटी करण्याची नवी कारणे शोधून काढीत होते. आता लग्नानंतर दीड–पावणेदोन वर्षांनी त्यांनी हुकूम काढला, ' पायात जोडवी घाल ! ' मला जोडवी घालायला आवडत नाहीत; पण मी त्यांना म्हटले, ' ठीक आहे. मी जोडवी घालते; पण तुम्हीही भिकबाळी करून घ्या. रोज भिकबाळी घालून ऑफिसला जा ! ' माझे बोलणे ऐकून सासूबाईंना हसू लोटले; पण हसू आवरून त्या म्हणाल्या, ' अग, तो म्हणतो तर घाल ना जोडवी. तो काही तुला नऊवारी नेसायला सांगत नाही.' मी सासूबाईंना म्हटले, ' मी तरी कुठे त्यांना धोतर नेसा म्हणते. फक्त भिकबाळी ' घाला एवढंच तर म्हणते. ' रमेश म्हणाले; ' मग मंगळसूत्र तरी तू का घालतेस ?' मी

उत्तर दिले, 'केवळ संस्कार म्हणून. सवय म्हणून. लग्नाआधी गळ्यात चेन घालायची सवय होती. तसं नंतर मंगळसूत्र.' माझ्या बोलण्यावर थयथयाट केला. मी पुढे म्हटले, 'नवऱ्याला अरेतुरे म्हणणंच मला आवडतं; तुम्हाला ते पटत नाही म्हणून मी तुम्हाला आहोजाहो म्हणते.' रमेश ताड्ताड् निघाले ते माझ्या माहेरी गेले आईकडून माझी जोडवी मागून घेतली. (मंगळसूत्र, बांगड्या-खेरीज दागिने मी अंगावर घालीत नव्हते. माझे सासू-सासरे खूपच वयस्कर. दागिने घरात ठेवण्याचे त्यांना भय वाटे म्हणून लॉकर मिळण्याआधी दागिने माहेरी ठेवायला सासऱ्यांनीच सांगितले होते.) दुकानात जाऊन विकली आणि घरी आले.

आता सासरी जे चालले होते ते माहेरी व्यवस्थित कळले. माझ्या भावाने आईला सांगून टाकले, 'या चक्रम माणसाबरोबर अरुणाचं काही खरं नाही. तिनं सरळ घरी परत यावं!' दोन्ही घरी मधूनमधून काही तरी बोलणी-चर्चा सुरू झाली. मी इतके दिवस सगळं लपवून ठेवलं याचं माझ्या आईवडिलांना फार फार वाईट वाटलं. त्यांनी ही गोष्ट मनाला फारच लावून घेतली. अजूनही पटत नाही हे जरी नक्की झालं तरी घरातून बाहेर पडायचं हे नक्की झालं नव्हतं.

माझ्या वडिलांनी कार घेतली. कार घरी येण्याच्या वेळी मी गेलेच होते. कार आली त्या दिवशी आम्ही पेढे आणले होते. पेढे घेऊन मी घरी आले. घरात सगळ्यांना दिले. शेजारचे कोणी तरी घरात आले होते त्यांनाही दिले. 'कसचे पेढे?' विचारल्यावर अर्थातच 'वडिलांच्या कारचे.' असे सांगितले. रमेश लगेच म्हणाले, 'हिच्या वडिलांनी कार घेतली आहे; पण हिच्या भावांची काही ती सांभाळण्याची ताकद नाही बरं का!' माझ्या तळपायाची आग मस्तकाला गेली. काय कारण असं वाकडं बोलण्याचं?

खटके उडतच होते. माझे रूप, माझे वागणे प्रत्येक गोष्टीवर रमेश घाव घालत होते. मी काही मुके मेंढरू नव्हते. मी उलटे आघात करीतच होते. एके दिवशी सासरे माझ्या माहेरी गेले. ते वडिलांना म्हणाले, 'मी कबूल करतो, माझा मुलगा चक्रम आहे. तो आधीपासून तसाच आहे लग्नामुळे सुधारेल असं वाटायचं म्हणून आम्ही त्याचं लग्न केलं; पण तसं काही झालं नाही. आता नाइलाज!' माझा भाऊ उसळून म्हणाला, 'दुसऱ्याची मुलगी रॉ मटेरिअल वाटली का तुम्हाला – स्वतःच्या मुलाला सुधारण्याचे प्रयोग करायला?' सासरे अधिक काही बोलले नाहीत.

माझ्या धाकट्या दिरांना चांगली नोकरी मिळाली. चार हजार रुपये पगाराची. दिरांचे रमेशशी चांगले नव्हते; पण माझ्याशी चांगले होते. दीर नोकरीची बातमी सांगण्यासाठी आले. रमेश नेहमीच्या तुसड्या स्वरात म्हणाले 'अरे, तुझ्या लायकीपेक्षा खूप चांगली नोकरी मिळाली तुला!' माझ्या माहेरचा उत्कर्ष सहन होत नाहीच; पण स्वतःच्या भावाचा उत्कर्षही सहन न होण्याचा घाणेरडा स्वभाव!

एव्हाना लग्नाला दोन अडीच वर्षं होऊन गेली होती. घटस्फोटाचा विचार डोक्यात नाचू लागला होता. फक्त अगदी पक्का झाला नव्हता एवढंच. सासूबाईंना वाटायचे मूल झाले म्हणजे रमेशच्या स्वभावात फरक पडेल. त्या माझ्या मागे लागल्या. मुलासाठी तुम्ही डॉक्टरकडे जाऊन या!' त्यांना सत्य सांगणे मला भाग पडले. मी सांगून टाकले. 'मी काही या घरात राहीन असं नाही. म्हणून मला मूल नकोच आहे.' त्यांचे आपले म्हणणे 'मूल झालं की त्याच्यात फरक पडेल!' मी विचारले, 'याची काय खात्री? उलट मी पक्की बांधली जाईन, त्यांची थेरे आणखी वाढतील'

माझ्या दिरांचे लग्न ठरले. मुलगी महाराष्ट्रीय ब्राह्मणच; पण अमेरिकेत वाढलेली. अर्थात् रहाणी आधुनिक आणि टापटिपीची. दीर एकदा तिला घरी घेऊन आले होते. नंतर रमेशनी माझे अगदी डोके उठवले. 'ती बघ कशी चांगली दिसत होती! तू अशी दिसत नाहीस!' एक ना दोन. असलेच बोलणे. तू मला मॅच नाहीस...वगैरे. मी सांगून टाकले. 'मी ही आहे अशी आहे. नसेन तुम्हाला मॅच तर माझा इलाज नाही!'

मग घरातील कटकटी वाढू लागल्या. असह्य झाल्या. एकही जेवण वादविवाद, भांडण ह्यांच्याशिवाय होईनासे झाले माझ्या वडिलांना वाटू लागले, आपले काही चुकले का? या मुलाची चौकशी करण्यात आपण कमी पडलो की काय? मी त्यांना म्हटले, 'करायची ती सगळी चौकशी तुम्ही केली होती. आणखी चौकशी करून काही साधले नसते. ते काही व्यसनी, जुगारी नव्हेत. असे काही असले तर ते स्थळ अयोग्य असे म्हणतात. बाकी स्वभाव विचित्र असला तरी तो फार महत्त्वाचा मुद्दा आहे असे कोणाला वाटत नाही तेव्हा तुम्ही काही वाटून घेऊ


*With Best Compliments From–*

# Swastik Tractors

AUTHORISED SPARE PARTS STOCKISTS
MAHINDRA & MAHINDRA LTD.
INTERNATIONAL TRACTOR DIVISION

Opp. Octroi Naka, Pune Satara Road, Swargate PUNE–411 009. Tel. : 441419

नका. एक मात्र मला वाटते, माझ्या स्वभावाची, सार्वजनिक कामांच्या आवडीची माझ्या वडिलांनी अगदी स्पष्ट शब्दात कल्पना दिली होती. अशी चार ठिकाणी हिंडणारी मुलगी आपल्याला परवडणार नाही हे रमेशला आणि त्याच्या आई–वडिलांना कळलेच नाही का ? की माझ्या वडिलांच्या बोलण्याचा त्यांना बोधच झाला नाही ?

माझे सासरे वारले. जेमतेम तेरा दिवस झाले. मग मात्र रमेशनी अगदीच ताल सोडला. त्यांच्यावरचा दाब नाहीसा झाला. एकदा सकाळीच भूपाळी सुरू झाली 'काही मला सुचत नाही. तू मला मॅच नाहीस.' माझी सहनशक्ती संपली. अखेरचा निर्णय घेतला गेला. त्या दिवशी मी रमेशचे घर कायमचे सोडून माहेरी आले ! आज नाही उद्या हे घडणारच होते. आई–वडिलांची मनाची तयारी झाली होती. मी कायमची माहेरी निघून आले. त्यानंतर बहुतेक पंधरावीस दिवसांनी असेल – रमेशनी मला घटस्फोटाची नोटीस पाठविली. आमचा दोन वर्षं संबंध नाही असे त्यात लिहिले होते मी माझ्या ओळखीच्या वकिलांचा सल्ला घेतला. दोन वर्षं संबंध नाही हे खोटं आहे असं सांगून मी त्यांना अडवू शकत होते; पण माझ्या वकिलांनी सल्ला दिला : 'तुला जर घटस्फोट घ्यायचा निश्चित असेल तर उगीच कशाला अडवणूक करायची ?' मी ते मानले. संमति देऊन टाकायची ठरवले दरम्यान रमेशने मला घरासाठी दिलेले रु ३०००/–परत मागितले. या कंजूष माणसाला ते मुळीच परत द्यायचे नाहीत, असे मी ठरवले. आई एकसारखी म्हणू लागली, 'आता सगळं सुटलं आहे. कशासाठी तीन हजार रुपयाला ओशाळं रहायचं ? तुझ्याजवळ नसले तर मी देऊन टाकते!' मी म्हटले प्रश्न तीन हजार रुपयांचा नाही. त्यांच्या क्षुद्र मनोवृत्तीचा आहे. सगळा खर्च मी माझ्या पगारात करीत होते. तेवढ्यात तीन हजार रुपये कसेही फिटले असतील. नंतर रमेशचे त्या तीन हजार रुपयांसाठी रोज पत्र येऊ लागले. एके दिवशी मी त्यांना लिहिले ! माझेही पैसे तुमच्याकडे येणे आहेत. तुमच्या आईवडिलांचे पैसे मी मागत नाही. कारण जसे माझे आईवडील तसेच तेही; पण तीन वर्षं कुटुंबाचा सगळा खर्च मी चालवत होते. त्यात रमेश चितळे या



माणसासाठी खर्च झालेला प्रत्येक पैसा मला परत पाहिजे आहे.' माझ्या या पत्राला आईचा विरोधच होता. मी ऐकले नाही. पत्र पाठवून दिले; पण माझे सामान चितळेंचांकडेच राहिले होते. त्या दृष्टीने वकिलांचे म्हणणे पडले मी रु. ३०००/– त्यांना देऊन टाकावेत. या बाबतीत माघार घेऊन मी त्यांना तीन हजार रुपयांचा धनादेश पाठवला. पाठोपाठ माझ्या वकिलांनी नोटीस पाठविली. माझे अशील येऊन अमुक दिवशी, अमुक वाजता आपले सामान घेऊन जातील. तुमचे वकील हजर ठेवा ! माझे लोखंडी कपाट, सगळ्या साड्या आणखी काही वस्तू आणायच्या होत्या. आईला काळजी वाटत होती. मी जाऊ शकेन की नाही ? मला काही होईल का ? ब्लडप्रेशर लो वगैरे जाईल

का ? मी दोन्ही भावांना, नात्यातल्या आणखी एका मुलाला घेऊन चितळ्यांच्या घरी गेले रमेश आणि त्यांचे वकील हजरच होते. प्रसंग खरोखरच नाट्यमय होता; भविष्याची स्वप्ने पहात ज्या घरात मी आले होते त्या स्वप्नांचा चूर होऊन अशी परत जात होते; पण मी कमालीची शांत होते. आज आठवले की याचे आश्चर्य वाटते; पण खरेच सांगते, माझ्या छातीत धडधडले नाही, हातापायांना कंप सुटला नाही. डोळे भरले नाहीत काही काही झाले नाही. आम्ही जाण्यापूर्वीच आमचा टेंपोवाला पोचला होता. त्याने कपाट उचलून टेंपोत नेऊनही टाकले होते. मी शांतपणे साड्यांच्या घड्या घातल्या. माझी भांडी–वस्तू घेतल्या आणि आम्ही बाहेर पडलो. सामान टेंपोतून घरी गेले. आम्ही चहासाठी हॉटेलमध्ये शिरलो. पुढे समाजाला तोंड द्यायला लागणार आहे याची जाणीव होती; पण तत्क्षणी अगदी मोकळे, हलके वाटत होते. चहा घेत आम्ही खूप बोललो. खूप हसलो. आता घरी गेल्यावर कोणी मला विचारणार नव्हते, 'अशी हसलीस का तशी बोललीस का ?'

माझ्या वकिलांना जे पाहिजे ते वकीलपत्र मी देऊन टाकले. मग पुढचे सगळे वकिलांनी केले. मला एकदाही न्यायालयाची पायरी चढावी लागली नाही. घटस्फोट मिळाला.

माझ्या घटस्फोटाची बातमी हळूहळू सगळीकडे पसरली. आमच्या शेजारच्या कोणी तरी गाडीत कोणाला तरी सांगून गाडीतून ती बातमी ऑफिसपर्यंत आली. ऑफिसमधल्या माझ्या अगदी जवळच्या माणसांना मी सांगितले होते; पण इतरत्र बोलले नव्हते. तरी अशी बातमी पसरायला वेळ लागत नाही. मला प्रत्यक्ष कोणी काही बोललं नाही; पण दूर दूर बोललेलं काही माझ्या कानांवर आलं माझ्या अगदी जवळच्या मैत्रिणीने ऑफिसमधला स्त्रीवर्ग काय बोलतो ते सांगितलं ! एकदा लग्न झाल्यावर कसचं ग युनियन आणि बिनिअन पुरुषांना नाहीच आवडत. हिचं आपलं काही तरीच.' हिला वेगळं वेगळं म्हणजे अगदी काय करायचं आहे ? स्वतःला मोठी समजते का ?' 'नवरा काय दारू पिऊन मारहाण करीत नाही ना ! ही जादा शहाणी आहे.' असल्या प्रतिक्रियांची मला अपेक्षा होतीच. त्यामुळे


त्याचे काही वाटले नाही. युनिअन नसेल तर स्त्रिया किती असुरक्षित होतील हे या बायकांना कसे कळेल ?

एका वऱ्याच वरच्या अधिकाऱ्याने माझ्या मित्राला विचारलं, 'आपण हिच्या नवऱ्याला भेटून हिच्या चांगुलपणाची खात्री देऊ या का ? ही घटस्फोट घेणार म्हणून कळलं. ते काही बरं वाटत नाही. ही मुलगी फार चांगली वाटते.' त्या अधिकाऱ्यांनी केबिनमधे बोलावून माझ्याशी बोलणे केले. त्यांच्या सदिच्छेबद्दल मी मनःपूर्वक आभार मानले आणि सांगितले, 'मी काही भावनावेगाने ही गोष्ट केली नाही. नीट विचाराअंती निर्णय घेतला आहे.आता त्यात बदल होणार नाही!

आणखी इतरही प्रतिक्रिया आहेतच.आता हिच्या भावांचो लग्ने होणं जड आहे. नवऱ्याचे घर तेच मुलीचे घर. वडिलांचे घर ते मुलीचे घर नाही. वडिलांच्या घरात मुलगा आयता राहिला तर चालेल ते घर त्याचेच असते. मुलगी राहिली तर चालणार नाही. या पारंपारिक विचारातून आलेली ही प्रतिक्रिया. मी परंपरा सोडलीच होती. मला ही संभावना गिळूनच पुढे जायला पाहिजे होते.कोणी तरी हे वार सोसते तेव्हाच समाज सुधारत जातो. अगदी पूर्वी नवरा दारूबाज, लफडेबाज, मारहाण करणारा असला तरी पत्नीने ते सारे मुकाट्याने सहन करावे अशी अपेक्षा होती. त्या काळात सुरुवातीला ज्यांनी घटस्फोट घेतले असतील त्यानाही वार सहन करावे लागले असतीलच. त्यामुळेच आज व्यसनी, मारहाण करणाऱ्या नवऱ्यापासून घटस्फोट घेतला तर समाज ते गैर मानत नाही. आणखी काही वर्षांनी माझेही म्हणणे पटेल. मी काही मोठी सामाजिक नेती नाही. मी अगदी काट्याकुट्यांच्या वाटेवर, निखाऱ्यांवर चालणाऱ्या ध्येयवाद्यांपैकी आहे असाही माझा दावा नाही; पण स्वतःचे सगळे आनंद, इच्छा मारून स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाला फुटणारे धुमारे छाटून टाकून एखाद्या सामान्य व्यक्तीच्या पायाशी आपले आयुष्य वाहायचे, निव्वळ ती व्यक्ती आपला नवरा आहे म्हणून हे मला मंजूर नाही. नवऱ्याला सोडून जगता येतं. अगदी आनंदानं जगता येतं. चित्रकला, संगीत, समाजकार्य या सगळ्या ठिकाणी आनंदच आनंद पसरला आहे; पण आपल्याला तो टिपण्याची शक्ती पाहिजे. सुदैवाने माझ्या घरातल्या संस्कारांनी ती शक्ती मला दिली आहे आताचा समाज पूर्वीइतका कर्मठ राहिला नाही. कोणी समोरासमोर बोलत नाही हीच केवढी सुधारणा— ज्याचे त्याचे व्यक्तिस्वातंत्र्य माणसे मान्य करू लागली आहेत, याचीच ही खूण म्हणायला हरकत नाही. आजकालच्या मुली हजार हजार रुपये मिळवतात. कशाला ऐकून घेतील ? अशीच नाकं ठेचायला हवीत पुरुषांची. आम्ही मेल्या खुळ्या होतो, अशी एका म्हाताऱ्या बाईंची प्रतिक्रिया खूप सुखावह वाटली. ज्याचा त्याचा वैयक्तिक प्रश्न आहे. कोणीही झालं तरी असह्य झाल्याशिवाय घटस्फोट घेत नाही. 'असह्य हे व्यक्तीगणिक वेगळं रहाणारच.' हे रिमार्कही आशादायी वाटतात

अगदी जवळची माणसं एक प्रश्न विचारतात, 'पुन्हा लग्न करणार का ?' मी म्हणते हो. करणार. संसारसुख मला नकोच असं नाही; पण एक सांगते अगदी मनःपूर्वक कोणी आवडला तरच करणार. नाही तर अशीच रहाणार! मन कळले तरच सुख मिळेल. आपल्या समाजात तशी संधी नाही हे खरंच. आपण लग्न ठरवताना माणसांच्या शरीराची उंची, शरीराचा रंग आपण पहातो; पण उंची, मनाचा रंग यांचा आपण विचारच करत नाही. संसारात मनच खरं म्हणजे महत्त्वाचं! ते नाही जुळलं तर ? तर काय ? मला समजून घेणारी मैत्रीण विचारते, 'अरुणा आठव.अगदी निःपक्षपातीपणे आठव. तुझ्या तीन वर्षांच्या वैवाहिक आयुष्यातले सुंदर, सुखद क्षण कोणते ? असे क्षण यावेत हे अगदी नैसर्गिक आहे !'

मी तिला उत्तर देते, 'नाही ग नाही, खरंच नाही. ज्याची सुगंधी स्मृती जपून ठेवावी असा एकही क्षण माझ्याजवळ नाही!



# देणगी

**देणगीची आशा केव्हाच विलयाला गेली, पण चकचकीत नाण्याची दुसरी बाजू त्यांना पेलवेना.**

o

## सुधा नरवणे

मोठ्या मुष्किलीनं केळकरांनी गाडी गाठली. सभा संपायला भलताच वेळ लागला म्हणून ही तारांबळ. सार्वजनिक कामं करायची म्हणजे हे असंच होणार. बायको तर नेहमी म्हणते, 'लष्करच्या भाकरी भाजणं-पुरे आता–' ते म्हणत, 'अग, समाजऋण म्हणजे काय आहे माहिती आहे का तुला ?' असले मोठमोठे शब्द ऐकून ती साधी बाई चक्रावून जाई; पण आपलं म्हणणं सोडायची नाही. बायकोची तीच तीच तक्रार ऐकून केळकर म्हणायचे, 'माझं हे व्यसन आहे समज विडीकाडीच्या,बाईबाटलीच्या व्यसनापेक्षा बरं ना–' यावर त्यांच्याजवळ उत्तर नसे. त्या आपल्या ओचेपदर झटकून पुढच्या कामाला लागायच्या. त्यांना समाजऋण म्हणजे काय, पुढारी म्हणजे काय, नेते म्हणजे काय ? काही कळत नव्हत. आपला संसार हेच त्या स्त्रीचं जग होतं– क्षितिज होतं.

केळकर मात्र नित्य नव्या योजना आखण्यात गुंतलेले. सध्या डोक्यात घोळत होती सरोजिनीबाईंच्या स्मारकाची कल्पना. बाईंना जाऊन आता पुढच्या वर्षी पंचवीस वर्ष होतील. पंचविसाव्या स्मृतिदिनाच्या निमित्तानं स्मारक उभारायचं.

सरोजिनीबाईंनी गावासाठी काय नाही केलं ? चाळीस वर्षांपूर्वी लग्न करून या गावढ्या गावात त्या आल्या. तेव्हा गाव कसं होतं ? श्रीमंताची लेक आणखी श्रीमंत जहागिरदाराच्या घरात पडली. दोन्ही घरी गजान्तलक्ष्मी झुलत होती. गाद्यागिरद्यांवर लोळण्याचं, मखमली पायघड्यांवरून चालण्याचं त्यांचं नशीब. लक्ष्मीनं आणि सरस्वतीनं दोघींनी मस्तकावर वरदहस्त ठेवलेला; पण कुठून कशा त्या महात्मा गांधींच्या चळवळीत शिरल्या. त्या झंझावातानं त्यांना पूर्णपणे झपाटून टाकलं. आपले सोन्या-मोत्याचे दागिने देशकार्यासाठी म्हणून बापूजींच्या चरणी अर्पण केले. त्या महापुरुषाने लाखो लोकांच्या मनांत देशप्रीतीचा स्फुलिंग चेतवला. बाईही त्यापैकी एक-घरादाराची, जमीनजुमल्याची चिंता न करता बाईंनी स्वातंत्र्यचळवळीत स्वतःला झोकून दिलं. भारतमातेच्या पारतंत्र्याच्या शृंखला तोडायला धाव घेतली. असला असामान्य त्याग आजकाल औषधालाही मिळणार नाही.

अशा या तेजस्विनीचं स्मारक तिच्याच गावात नाही म्हणजे काय ? त्यांचं स्मारक झालंच पाहिजे. या कल्पनेने केळकरांना झपाटून टाकलं होतं. ही कल्पना मनात जसजशी मूळ धरू लागली तसं त्यांना काही सुचेना. पहिली गोष्ट म्हणजे पैसा हवा पैसा ! ज्यांच्या ज्यांच्याजवळ केळकरांनी स्मारकाची कल्पना बोलून दाखविली ते विचारत, स्मारकाचं स्वरूप सांगा-महिलाश्रम, अनाथाश्रम काढायचा का वाचनालय, व्याख्यानमाला का एखादी शिष्यवृत्ती ठेवायचीय ?

या प्रश्नांना केळकरांजवळ उत्तर नव्हतं. ते म्हणत– 'आधी पैसा तर जमू दे. किती रक्कम जमेल त्यानुसार स्मारकाचं ठरवू.'

'बरं बघू.' 'पुनः या' असं काही बोलून लोक त्यांना वाटेला लावीत. केळकरांच्या अंगात चिकाटी दांडगी– निधी जमवायला ते एकांड्या शिलेदारासारखे बाहेर पडले.

पैसा जमवायचा म्हणजे भिक्षां देही आली. कुणापाशी काही मागणं किंवा कसली तरी याचना करणं त्यांच्या स्वभावात नव्हतं; पण आता या स्मारकाच्या कल्पनेनं त्यांना झपाटून टाकलं. बाईंवरची त्यांची भक्ती त्यांना स्वस्थ बसून देत नव्हती–

पुढच्या पिढीला कळणार कसं ?' बाईंचं बहुमोल कार्य विस्मृतीच्या सागरात तळाशी जाणार की काय ? नाही...नाही हे असं होता कामा नये. स्मारक झालंच पाहिजे.

स्मारकासाठी देणग्या अशा ठिकाणी मागायच्या की जिथं नकार मिळणारच नाही. बाईंनी घडवलेली, जोडलेली एकेक माणसं आठवली आणि केळकरांना हुशारी वाटायला लागली. त्यांच्यासारख्या अनेक सामान्यांचं जीवन बाईंनीच बदलून टाकलं होतं. केळकर प्रथम खेडेगावच्या एका प्राथमिक शाळेत शिक्षक होते. आपणच गुरुजी होऊन मुलांना श्रीगणेशा शिकवायचा आणि आपणच चपरासी होऊन तास संपल्याची घंटा द्यायची. झाडलोट करणारी बाई आली नाही म्हणजे आपणच झाडू हातात घ्यायचा. असली ही दळभद्री नोकरी अन् कसलं ते कुग्राम ! कुटुंबात कुणाचा आधार नाही. अडीअडचणीच्या वेळी कुणाची मदत नाही की सहानुभूतीची फुंकर नाही. मार्ग दाखवायला कुणी नाही. भविष्यकाळ सगळा अंधारमय होता. कुठं कसली रुपेरी सोनेरी किनार नव्हती.

अशा परिस्थितीत सरोजिनीबाईंचे पाय शाळेला लागले...प्राथमिक शाळेचं मिडल् स्कूल कसं झालं अन् पुढं हायस्कूल कसं झालं– कसा स्फूर्तिदायक इतिहास होता तो. शाळेचे मुख्याध्यापक म्हणून केळकर प्रथम खुर्चीवर बसले तेव्हा त्यांनी बाईंच्या पायांवर लोटांगणच घालायचं काय ते बाकी ठेवलं होतं. ते बाईंचे एकनिष्ठ भक्त बनले. स्वातंत्र्यचळवळीच्या वेळची बाईंची भाषणं ऐकणं म्हणणे केळकरांना एक अपूर्व योग वाटे.

...काय ती तेजस्वी मूर्ती ! ओजस्वी वाणी, भारून टाकणारं व्यक्तिमत्त्व! श्रोत्यांना आणि स्वतःलाही वाहवून टाकणारा तो वक्तृत्वाचा धबधबा...सरोजिनीबाईंची भाषणं ऐकताना तरुण वयातले केळकर थरारून गेले होते.

साक्षात् देवांगना ती हीच असं त्यांना वाटे. बाईंचा जास्त–जास्त परिचय वाढत गेला तेव्हा भक्तिभाव अधिकच दाट होत गेला....

... त्या जुन्या आठवणींनी केळकर आता गाडीत बसल्या–बसल्यासुद्धा सुखावले.

... देशासाठी काही तरी करावं असं त्यांना सुद्धा वाटे; पण नेमकं काय ते कळत नव्हतं. सत्याग्रहात उडी घ्यायला धीर होत नव्हता. संसारी पुरुषाच्या व्यथा चिंता केळकरांनाही होत्या. कायदेभंग–तुरुंगवास असल्या गोष्टी करायला लागणारा त्यांचा मनोपिंड नव्हता. बाईंच्या कार्याच्या सतत जवळ असावं असं त्यांना वाटे. बाईंच्या सहवासाची सुप्त इच्छाही त्यात बेमालूम मिसळली होती. बाईंनी त्यांना एक हरकाम्या मनुष्य म्हणून हाती धरलं होतं. याच्याकडून कुठलं फार जबाबदारीचं काम होणार नाही हे त्या चाणाक्ष स्त्रीनं केव्हाच ओळखलं होतं. याचा निरोप त्याला पोचव, त्याचा याला असं काम, निरोपसुद्धा अशा पोचट भाषेतले की, पोलिसांना संशयसुद्धा आला नसता. बाईंनी हाक मारताच केळकर हुरळून जात.

नंतर मात्र केव्हा तरी काही भूमिगत कार्यकर्त्यांना केळकरांनी आश्रय दिला होता. हे लोक क्रांतिकारक आहेत नि पोलिसांच्या पाठलागापासून स्वत:ला वाचवताहेत ते त्यांना माहीत नव्हतं. मुंडासेवाले दोघं एका रात्री आले. आम्ही घरगुती कामासाठी गावाला चाललो आहोत...बाईंनी एक रात्र तुमच्याकडे राहयला सांगितलंय एवढंच त्यांनी केळकरांना सांगितलं आणि आपली पथारी पसरली. दुसरे दिवशी उजाडायच्या आत दोघं निघूनही गेले ! केळकरांची फार निराशा झाली होती बाईंचं स्तुतिस्तोत्र गाण्याची आणि ऐकण्याची अगदीच संधी मिळाली नाही. ते पाहुणे भलतेच अबोल–


पुढं केव्हा तरी कळलं ते प्रसिद्ध क्रांतिकारक होते ! पोलिसांच्या हातावर तुरी देऊन पळाले होते. भूमिगत राहून जनतेला चेतवत होते. ब्रिटिश सत्तेला हादरवून टाकलं ते अशाच लोकांनी.. अशाच लोकांनी एक रात्र आपल्याकडे घालवली.. आपल्या चंद्रमौळी झोपडीनं त्यांचं कळिकाळापासून रक्षण केलं !

... स्वातंत्र्ययुद्धात आपणही इवलासा अगदी खारीच्या वाटयाहून लहान असा वाटा उचलला...त्या आठवणीनं केळकरांची छाती अभिमानानं फुगून येते–ती रोमांचकारी हकिकत पुढे शेजाऱ्या–पाजाऱ्यांना, विद्यार्थ्यांना, मुलानातवंडांना सांगायला उपयोगी पडत गेली क्षणकाल का होईना लोकांना केळकरांबद्दल आदर वाटे. ... हे सारे अविस्मरणीय क्षण बाईंमुळं लाभले–

... स्वातंत्र्ययुद्ध संपलं–देश स्वतंत्र झाला तरी बाईंनी समाजकार्य सोडलं नाही– 'चिंता करतो विश्वाची' असं आईला सांगणाऱ्या रामदासांच्या जातकुळीतली जी माणसं असतात त्यापैकीच बाई होत्या. नंतर नंतर लोक त्यांना माताजी म्हणू लागले...स्वतःच्या संसाराकडे पाठ फिरवून त्यांनी समष्टीचा संसार केला. केळकरांसारख्या कितीकांचे संसार त्यांनी उभारून दिले. कोणाला जीवनाचा नवा मार्ग दाखवून दिला. कुणाला दारिद्र्याच्या गर्तेतून बाहेर काढलं. दीनदुबळ्यांना, रंगल्या-गांजलेल्यांना त्यांचा मोठा आधार वाटे. किती तरी स्वयंसेवी संस्थांच्या त्या जनक आणि प्रेरकशक्ती होत्या–किती आश्रम केवळ त्यांच्या प्रयत्नांनी उभे राहिले.

अशा देवसदृश महिलेचं अजूनपर्यंत स्मारक झालं नाही याचंच त्यांना आश्चर्य वाटे इतके दिवस कसं कुणाला सुचलं नाही ? की सुचून कुणी मन घातलं नाही ? बरं, जाऊ दे–कदाचित आपल्या हातून हे कार्य व्हायचं असेल म्हणूनच इतके दिवस हे काम थांबलं असेल–

आत्ता ते चाललेत अनंताकडे–अनंताकडे बाईंचा मानसपुत्र. तो नक्कीच घवघवीत देणगी देईल. मुळीच आढेवेढे घ्यायचा नाही. एके काळी आडगावत एका छापखान्यात झाडलोट करणारा हा मुलगा... कालान्तरानं छापखान्याचा मालक होतो– ही काय साधी गोष्ट आहे ? याच कारखान्यात बाईंच्या एका संस्थेची पत्रकं छापली जात. त्यांनी अनंताला हाताशी धरला. त्याचं शिक्षण केलं. त्या वेळी अगदी डबघाईला आलेला तो कारखाना कवडी किंमतीनं विकला जात होता. बाईंची दूरदृष्टी दांडगी ! त्यांनी अनंताला तो कारखाना विकत घ्यायला प्रवृत्त केलं. त्याच्याजवळ तेवढेही पैसे नव्हते. बाई त्याच्या पाठीशी उभ्या राहिल्या... नाही



व्याज लावलं की नाही तारण मागितलं...

आज त्या मोडक्या-तोडक्या छापखान्याचं मोठं प्रकाशनगृह झालंय... कुठला वेल गगनावर पोचलाय !

स्टेशनवर अनंता त्यांना उतरवून घ्यायला आला होता. त्याचे उंची कपडे, हातातील ती ऐटबाज बॅग आणि ती स्टेशनबाहेर उभी राहिलेली त्याची छानदार गाडी ! केळकरांना उगीचच कृतकृत्य झाल्यासारखं वाटलं अनंताचं स्टेशनवर येणं त्यांना शुभशकुनच वाटला—

त्याच्या घरून केळकर परतले ते भलत्याच खुषीत— दारात शिरताच बायकोला म्हणाले, " तू सदा माझ्या कामात मोडते घालत असतेस—! बघ या खेपेला अगदी फत्ते करून आलोय! अनंता म्हणजे राजा माणूस! मुळीच हो नाही केलं नाही. अगदी हसत पाच हजारांचा चेक माझ्या स्वाधीन केलाय... बघ बघ... आहेस कुठं ?" " मी आहे. तिथंच आहे ! मला काय करायचाय् तो चेक बघून ? पाच हजार असोत की दहा हजार मला काय त्यातल्या चार सहा रुपड्या मिळायच्यात का ?"

आधी हे पत्र बघा— सुलीला जावईबापू बाळंतपणाला इकडे पाठवायचं म्हणताहेत"

केळकरांचा प्रपंच मोठा— त्यातून सुली हे त्यांचं उशीरा झालेलं अपत्य— अजून तिचे सणवार, बाळंतपणे करावी लागत होती—

बायकोनं त्यांच्या आनंदावर अगदीच पाणी ओतलं. प्रपंचातल्या अडचणी नेहमीच्याच, त्याबद्दल सारखं काय बोलायचं ? तिचं करकरीत बोलणं ऐकून, ते हिरमुसले. प्रत्येक वेळी ही आपल्या हुरूपाचं खोबरं करते. बायको आहे का कोण आहे ? नवऱ्याच्या कामात मदत तर नाहीच; पण चार कौतुकाचे शब्दही नाहीत. माणूस जगतो कशावर ? धीराच्या अन् कौतुकाच्या शब्दांवरच ना ? घरची माणसं ही असली निरुत्साही आणि पाय ओढणारी असल्यावर बाहेरच्यांचं बघायलाच नको— बाहेरचे लोक आहेतच टिंगल-टवाली करणारे !

तो ५ हजार रु. चा चेक मुठीत ठेवून केळकर आता घरोघरी फिरू लागले. त्यांचा दिनक्रम ठरून गेला. सकाळी उठायचं— चहा घेऊन शबनम खांद्यावर अडकवून जे बाहेर जायचं ते दुपारी जेवायला यायचं. फाटक्या चपला आणखी झिजवायच्या. कुणी त्यांच्या वयाचा मान ठेवून ' या बसा' करत— चहा-सरबत विचारीत. तर कुणी त्यांना दारातून चक्क बाहेर घालवीत !

महागाई कोण झालीय अन् म्हणे फंडाला पैसे द्या !

खरंच हे पैसे स्मारकाला जायचेत का होतील मधल्या मधेच गडप... अहो केळकर, तुम्ही एवीतेवी निधी गोळा करायला हिंडताच आहात तर आणखी एक निधी आमच्यासाठी गोळा करा ना... आमचा निधी ना ? हाच आपला वाण्याचं बिल— निधी हा: हा: हा..."

लोकांच्या मतामतांचा गलबला, टिंगल, टवाली, विनोद, केव्हा तरी होणारा अपमान केळकर सगळ्या गोष्टी हसण्यावारी घालवायला शिकले. सार्वजनिक काम हाती घेतलं म्हणजे हे सगळं गिळायला शिकलंच पाहिजे. मानापमान, सुखदुःख, मित्रशत्रू सगळे समान मानावे लागतात.

मुलं अधूनमधून हवा बदलायला येत. एकजात सगळी म्हणत... बाबांनी हे काय नवं खूळ काढलंय...?


**एल. डी. भावे अँड सन्स**

६२९ ए, शिवाजीनगर, जंगलीमहाराज रोड,

**पुणे ४११ ००४**

**अधिकृत वितरक**

**१. भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि.**
" भारत गॅस "

**२. पायको इलेक्ट्रॉनिक्स अँड इलेक्ट्रिकल्स लि.** ( फिलिप्स )
लॅम्प्स, ट्यूब्ज, रेडिओज, ट्रॅन्झिस्टर्स आणि स्टिरिओज.

**३. सँडविक एशिया लि.**
टंगस्टन कार्बाइड कटिंग टूल्स

**याजकडून शुभेच्छा !**

**लग्नाच्या बस्त्याकरिता पुण्यात**
**भव्य दोन एअर कंडिशन्स**
**सिल्क साड्यांचे शोरूम !**

* बनारसी शालु * कांजीवरम सिल्क * पटोला
* नारायण पेठ * व्यंकटगिरी * चंदेरी

**पुणेरी आणि सर्व प्रकारच्या**
**९ वारी साड्यांकरिता भेट द्या !**

**' अनुराधा '**

**कुंटे चौक, पुणे**

फोन— ४४५४११

मूलं तरी काय ? आईचंच बत्थड डोकं घेऊन जन्माला आलेली. आईच्याच शिकवणुकीनं बोथट मनाची बनलेली !

काही धूर्त गोडबोले लोक त्यांना गप्पात गुंगवून ठेवीत. स्वत: काही द्यायचे नाहीत; पण दुसऱ्या व्यक्तीकडे अंगुलिनिर्देश करीत. त्यांच्याकडून बातम्या काढून घेत-कुणी किती दिलं ते-केळकरांचा स्मारकनिधी थेंबाथेंबानं वाढत होता–

असंच एका ठिकाणी त्यांना कळलं की ते नवे कलेक्टर आलेत ते बाईंचे जावई ! –

केळकर दोन फूट उंच उडाले. आपल्या जिल्ह्याचे कलेक्टर बाईंचे जावई ? आणखी एक शुभयोग–आता लाख–दोन लाख चुटकीसरसे जमतील. स्वत: साहेबच घसघशीत देणगी देतील... अगदी अनंताचा चेकसुद्धा फिका पडेल त्यांच्यापुढं .. नाही नाही...तो चेक फिका मानून चालणार नाही. शुभारंभाची देणगी ती–ती कितीही जास्त किंवा कमी असली तरी तिचं मोल करता येणार नाही. शक्य असतं तर केळकरांनी तो चेक भिंतीवर फ्रेम करून टांगला असता...

आज केळकर अगदी कसोशीनं दाढी करत होते. बायकोचं त्यांच्याकडे फारसं लक्ष नसायचंच. तरी आज एवढा वेळ का लागला म्हणून ती पुढच्या खोलीत बघून गेली. मसाड्या आवाजात त्यांचं गुणगुणणं चाललं होतं.

बायकोला हाक मारून ते म्हणाले की, 'अग, माझा तो रेघारेघांचा शर्ट कुठंय ग ?'

बायकोकडून काहीच उत्तर मिळेना म्हणून ते आपणहून सविस्तर सांगायला लागले, 'अग, तो शर्ट ग ? सुलूच्या लग्नात उत्तमरावांनी दिलेल्या कापडाचा ?

'आजकाय कुठं लग्नाला जायचंय का ?'

केळकर खुदकन् हसले.

'अहो, लग्नापेक्षा मंगल कार्य आहे आज! मी जाणार आहे स्वामीनाथन्साहेबांकडं !'

'कोण हा मद्रासी ?'

'अरेतुरे काय करतेस त्यांना ? कलेक्टर आहेत कलेक्टर...! आपल्या सरोजिनीबाईंचे जावई... त्यांची थोरली कमी आठवते का तुला ?... तिनं बघ आंतरप्रांतीय विवाह केला... आठवतं काय ? बाई मुळीच रागावल्या नाहीत. समाजसुधारणा म्हणजे व्रतच होतं त्यांचं–म्हणायच्या, असे विवाह स्वागतार्हच आहेत... त्याशिवाय आंतरभारतीची कल्पना रुजणार नाही. राष्ट्रीयएकात्मता––

'हा हा–ती कमी ना ? आठवली की; घोडनवरी तर झाली होती– कशाला नाही म्हणेल कुणी लग्नाला–मद्रासी तर मद्रासी!'

'छे छे... तुला उदात्त कल्पना कधी कळणारच नाहीत. ज्यात त्यात तू वाकडं पाहतेस–' 'बरं...मी आहे वाईट– ठरलं एकदा– आता त्यात काही बदल व्हायचा नाही... पण एवढं सांगा–की जेवून जाणार का आल्यावर जेवणार आहात ? मी म्हणते, आपलं वेळेवारी जेवण करा नि मग कुठं गाव घोळायचाय तो घोळा...'

आपल्या मठ्ठ बायकोला त्यांनी मनोमन नमस्कार केला. खरं तर त्यांना आता राग यायला लागला होता; पण त्यांनी तो प्रयासानं दाबला...खऱ्या गांधीवादी कार्यकर्त्यानं रागावून चालत नाही. षड्रिपूंना ताब्यात ठेवावं लागतं... तरच कार्यसिद्धीची आशा असते.

कलेक्टर–कचेरीत खूप वेळ ताटकळल्यावर केळकरांना साहेबांपुढं जायला मिळालं. आपण कोण हे सांगितल्यावर त्यांच्या चेहऱ्यावर अपेक्षित बदल झाला नाही. किंबहुना कोण ही ब्याद उपटलीय अशी मुद्रा झाली हे त्यांच्या लक्षातच आलं नाही. ते ऐसपैस खुर्चीवर बसले. खादीच्या रुमालानं घाम पुसला. शबनम पिशवीतून लहान लहान पुस्तिका, पत्रकं आणि पावतीपुस्तकं काढली. बँकबुक काढलं... अनंताचा पाच हजारांचा चेक भरून सुरू केलेलं खातं !

साहेब अस्वस्थ होत चालले होते. देशभक्त सासूचं नाव ऐकू आलं तेव्हा चटकन त्यांच्या डोक्यात प्रकाश पडला. केळकरांच्या मराठी बडबडीतला तेवढा एकच शब्द नीटपणे कळला.आपल्या पी.ए.ला हाक मारून त्यांनी सांगितलं, 'यांना बंगल्यावर पाठवायची व्यवस्था करा... आणि बंगल्यावरही फोन करून ठेवा– हे येताहेत म्हणून...हं नेक्स्ट ?'


केळकर हरणाच्या चपळाईनं उठले. साहेबांचं फर्डं इंग्रजी बोलणं त्यांना फारच आवडलं... एकदम घरी ! बाकी त्यात काय नवल ? आपण आहोत माहेरचा माणूस... माहेरचं कुत्रंसुद्धा भाव खाऊन राहतं–तिथं आपण माणसासारखं माणूस !

बंगल्यावरची अपॉइंटमेंट दोन दिवसांनी मिळाली. आजच्या आज कमी भेटत नाही

पृष्ठ ६६ वर

पायल अपार्टमेंटस्

डेक्कन जिमखाना प्रभात रोड नजीक
बांधकाम सुरु असलेल्या
३ बेडरुम (४ खोल्या व दोन सॅनिटरी ब्लॉक्स)
ओनरशिप फ्लॅटस् साठी जागेवर भेटा
बॅगसन्स असोसिएट्स्
वाघोलीकर - परांजपे
११३ / २ अ, प्रभात रोड,
इन्कमटॅक्स ऑफिसरोड पुणे ४.
सकाळी १० ते १२ सायंकाळी ५ ते ७
फोन – C/o ४२४३१, ५८२७६



# आपण आणि आपली मुलं

**आता जमाना पालटला आहे. कुटुंबाकरता व्यक्ती हा दंडक जाऊन प्रत्येक व्यक्तीला स्वतंत्र अस्तित्व व स्वतंत्र मत प्राप्त झाले आहे.**

●

**र. वा. लघाटे**

पाल्यपालक–संबंध हा गेली काही वर्षे एक चिंतेचा विषय होऊन बसला आहे. पालकांची तक्रार आहे की, मुले ऐकत नाहीत, अभ्यासाकडे लक्ष देत नाहीत, दिवसभरात त्यांचा जो काही थोडाबहुत अभ्यास होतो तो शेजारील रेडिओवर विविधभारती किंवा टी. व्ही. चालू ठेवूनच. त्यांना आईवडिलांविषयी प्रेम किंवा आदर वाटत नाही. मुलांसाठी त्यांनी सोसलेल्या कष्टांची त्यांना जाणीव नसते. त्यांच्या कपडे, हॉटेल, सिनेमा इत्यादीं-साठी वडिलांकडून पैसे मिळाले नाहीत की; त्यांची धुसफुस सुरू होते वगैरे वगैरे.

उलट मुलांचे म्हणणे असते की, पालक आपल्याला समजावून घेत नाहीत. त्यांचेच विचार आपल्यावर लादतात. काळ किती पुढे गेला आहे याचे त्यांना भान नसते. आपल्या जुनाट समजुतींच्या मोजपट्टयांनी ते नव्या पिढीचे मूल्यमापन करीत असतात इत्यादि.

अशा तऱ्हेने एकदा का उभयपक्षी असंतोष निर्माण झाला की, घरातील वातावरण बिघडू लागते मुले आईबापांना टाळून घराबाहेर वेळ काढू लागतात. मित्रमंडळीत त्यांच्याबद्दल अनादराने बोलतात. आई-वडिलांनाही चिंता वाटू लागते की, यांचे पुढे कसे होणार व आपल्या उतारवयात ही आपल्याला कितपत उपयोगी पडतील ? या परिस्थितीला आपण दोन पिढ्यांमधील दुरावा (Generation gap) म्हणतो.

तसे पाहिले तर आईवडील व मुले यातील मतभेद हे आजच नव्याने सुरू झाले आहेत असे नाही. अगदी साठ–सत्तर वर्षांपूर्वीही ते होते. फक्त त्यांचे स्वरूप वेगळे होते. त्या काळातील मुलांना आईवडिलांविरुद्ध जाण्याची किंवा बोलण्याची हिंमत नव्हती. ती मनातून नाराज असत इतकेच एक साधे उदाहरणच सांगतो– १९१४–१५ च्या सुमारास कॉलेजात शिकत असलेल्या एका गृहस्थांची गोष्ट. बरोबरीच्या इतर मुलां-प्रमाणे केस राखावे, भांग पाडावा असे वाटे; पण घरात वातावरण शेंडी ठेवून, साप्ताहिक हजामत करवून घेण्याचे. 'मी केस राखू का ?' असे वडिलांना विचारण्याचा धीर त्यांना कधीच झाला नाही. मग त्यातल्या त्यात शेंडीची लांबी कमी करून

व घेरा मोठा ठेवून ते स्वतःचे समाधान करून घेत.

याहूनही विशेष म्हणजे लग्नाच्याबाबतीत संबंधित मुला-मुलींची संमती विचारण्याचीही वडील माणसांना गरज वाटत नसे 'आम्ही काय त्यांचे अकल्याण करणार आहो ?' असा उलट प्रश्न ते विचारीत. त्या काळात लग्नाच्या वेळी मुलीचे वय बारा-तेराहून अधिक नसे; पण मुलाचे वीस ते चोवीस असे. म्हणजे ते अगदीच लहान नसत. म्हणून अशा लग्नांमुळे ते कधीकधी नाखूष असत-कधी पत्नी अशिक्षित म्हणून, तर कधी तिला रूप नाही म्हणून. तथापि तेवढ्यामुळे कुटुंबाचे स्वास्थ्य कधीच बिघडले नाही.

अर्थात या परिस्थितीला त्या काळात तशी कारणेही होती. पहिली गोष्ट म्हणजे तेव्हा कुटुंब हे केंद्र मानले जात असून व्यक्तीला कुटुंबाचा एक घटक याहून अधिक महत्त्व नव्हते. कुटुंबप्रमुखाचा निर्णय सर्वजण -वेळप्रसंगी वैयक्तिक आवडीनिवडीला मुरड घालूनही मानीत. दुसरे म्हणजे लोकांची (म्हणजे मध्यमवर्गीयांची) रहाणी अगदी साधी असे. उच्च व मध्यमवर्गीयांच्या रहाणीत फारच अंतर असे. मध्यमवर्गीय कुटुंबे काटकसरीने रहात. रहाण्याची जागा, कपडे, नाटक किंवा अन्य करमणूक यावर बेतानेच खर्च होई. हॉटेलात जाणे फारसे मान्यता पावलेले नव्हते. कोणत्याही प्रकारची चैन मध्यमवर्गीय कुटुंबांना माहीत नव्हती व परवडतही नव्हती. शिवाय टिळकांच्या काळापासून स्वराज्यासाठी चाललेल्या चळवळीच्या वेगवेगळ्या टप्प्यात आपल्या हातूनही काही तरी घडावे अशी तळमळ सर्वांना होती. कोणी चहा सोडला, कोणी स्वदेशीचे व्रत घेतले, कोणी राष्ट्रीय शिक्षणासाठी स्वतःला वाहून घेतले होते. यामुळे एकूण सर्वांचीच भूमिका त्यागाची होती. भोगाची, चैनीची नव्हती. अनेक लोकांना आपल्या मुलांना कॉलेजमध्ये पाठवणे परवडत नव्हते. जी मुले कॉलेजात जात त्यांना जाणीव असे की, आपल्या शिक्षणापायी पालकांवर ताण पडत आहे. या सर्व परिस्थितीत पाल्य-पालकात कधी मतभेद झाल्यास ते निकरावर येत नसत.

आता जमाना पालटला आहे. कुटुंबाकरिता व्यक्ती हा दंडक जाऊन प्रत्येक व्यक्तीला स्वतंत्र अस्तित्व व स्वतंत्र मत प्राप्त झाले आहे. कुटुंबप्रमुख कोणावरही अधिकार चालवू शकत नाही. पूर्वी स्त्रियांचे शिक्षण बेताचेच असे व त्या स्वतंत्रपणे द्रव्यार्जन करू शकत नव्हत्या. तेव्हा 'तुम्हा बायकांना काय कळतंय ?' असे विचारून कुटुंबप्रमुख त्यांना गप्प बसवीत. आता स्त्रिया शिकून नोकरी करू लागल्यावर त्यांना इतक्या तुच्छतेने झटकून टाकणे शक्य होत नाही. अशा परिस्थितीत कुटुंबप्रमुखाच्या हातातून अधिकार निसटू लागला व मग आलेले व्यक्तिस्वातंत्र्याचे वारे मुलांपर्यंत पोचले. पूर्वी मुलगा ऐकेनासा झाला की, बाप त्याला 'घरातून चालता हो' असे सांगे. कारण त्याला खात्री होती की, हा जाऊन जाणार कोठे ? कोणत्या तरी नातलगाकडे; पण आता अशी धमकी देण्याचे तो मनातही आणणार नाही. कारण घर सोडून गेलेला मुलगा स्मगलर, हातभट्टीवाले, मवाल्यांच्या टोळ्या यांपैकी कोणाच्याही कह्यात जाईल अशी त्याला धास्ती वाटत असते. अशा स्थितीत उपदेश, समजावणे इत्यादि सौम्य मार्गांचा अवलंब करणे भाग पडते. हा दुबळेपणा मुलाच्याही लक्षात आलेला असतो व मग नमते घेण्याची त्याला गरज वाटत नाही. भरीत भर म्हणून हल्ली मुंबईसारख्या मोठ्या शहरात अनेक तरुण नाक्यावर किंवा गल्लीच्या तोंडापाशी उभे राहून चकाट्या पिटीत संध्याकाळचा वेळ घालवतात. या टोळघांतील संगत कशी असेल ते सांगता येत नाही. घरात न पटणारा मुलगा बाहेर नाक्यावर अधिक वेळ घालवील, त्याला मारझोड केल्यास तो आणखीनच बिथरेल, ही भीती असते. एकंदरीत हल्लीच्या काळात पाल्यपालकांचे सूर जुळले नाहीत तर कुटुंबस्वास्थ्य विघडण्याचा संभव असतो.

स्वातंत्र्योत्तर काळात समाजात प्रचंड स्थित्यंतरे झाली. पंचवार्षिक योजना आखल्या जाऊन अनेक उद्योगधंदे, कारखाने निघाले, शेतीत सुधारणा झाल्या. शिक्षणप्रसार मोठ्या प्रमाणावर झाला. शाळा खेड्यांपर्यंत पोचल्या, जिल्ह्याच्या गावी कॉलेजे निघाली, विशिष्ट मर्यादेपर्यंत प्राप्ती असणाऱ्या पालकांच्या मुलांना शिक्षण मोफत मिळू लागले. पूर्वी कारकुनीच्या पुढे सरक न शकणाऱ्या मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांमधून डॉक्टर, इंजिनिअर, प्राध्यापक, चार्टर्ड अकौंटंट इत्यादि तयार होऊ लागले व त्यांना चांगल्या पगाराच्या नोकऱ्या मिळू लागल्या. याच काळात महाराष्ट्रात अनेक साखर. कारखाने निघून शेतकऱ्यांच्या हातात पैसा खेळू लागला एक नवा सधन मध्यमवर्ग व शेतकरीवर्ग उदयाला आला. त्यांचे रहाणीमान उंचावले. पूर्वी केवळ श्रीमंतांच्याच घरी आढळणाऱ्या पंखा, सोफासेट, टेलिफोन, स्कूटर, फ्रीज इत्यादि गोष्टी आता या नव्या वर्गाच्या घरात दिसू लागल्या. श्रीमंत व मध्यमवर्ग यांच्या रहाणीमानातील अंतर बरेच कमी झाले. याचा परिणाम अगदी कनिष्ठ मध्यमवर्गापर्यंत सर्वच कुटुंबांवर झाला. पूर्वी सर्वसाधारणपणे पुरुषांना किंवा तरुणांना दोन शर्ट, दोन कोट किंवा बुशशर्ट, तीन पॅण्टस् पुरेशा होत असत. शर्ट किंवा पॅंट आठवड्यातून एकदा बदलली जात असे. आता रोज वेगळा शर्ट किंवा पॅण्ट घालणारे डोळ्यांसमोर असल्यावर सामान्य माणसालासुद्धा पूर्वीपेक्षा अधिक लवकर कपडे बदलणे भाग आहे. सहाजिकच आता चार-पाच जोड्या तरी हव्यातच..


**M/s. Reliance Sales Corporation**

184/4, Nagar Wachan Mandir,
Laxmi Road, POONA – 411 002.
Tel. : 44 53 89

*Contact for :*

ELECTRONIC COMPONENTS &
INSECT-KILLER MACHINE for
AGRICULTURE PURPOSES.

ऑफिसात जाणाऱ्या मुलींनाही रोज वेगळे पातळ नेसता आले नाही तर कमीपणा वाटतो. या गोष्टी उच्चमध्यमवर्गाच्या आवाक्यात असल्या तरी (आणि कपड्यांचे जास्त जोड जास्त दिवस पुरतात हे कबूल करूनही) सामान्य म्हणजे कनिष्ठ मध्यमवर्गीयांना हे जड जाऊ लागले आहे. प्राप्तीपेक्षा रहाणीमान वरच्या दर्जाचे ठेवल्यास कर्जबाजारीपणा करावा लागतो.

स्वतःच्या बाबतीत पालक काटकसर करतात; पण मुलांना किती ठिकाणी 'नाही' म्हणणार ? कधी कपडे, कधी सिनेमा, कधी सहली, काही ना काही कारणाने त्यांची मागणी चालूच असते आणि सारखे 'नाही' म्हटले की मुले आईवडिलांवर चिडतात. त्यांच्या डोळ्यांसमोर शेजारची किंवा वर्गातील इतर सुखवस्तु आईबापांची मुले असतात. आपले पालक आपली हौस कधीच पुरवीत नाहीत, हा ग्रह मुलांचा एकदा का झाला की, कुटुंबात स्वास्थ उरत नाही. मुले समजूतदार असली तरीही त्यांना बरोबरीच्या मुलांहून सतत वेगळे रहाता येत नाही आणि जेथे मुलांना पालकांच्या परिस्थितीविषयी जाणीव नसते, तेथे पालकांना अखंड मनस्ताप सोसावा लागतो.

स्वातंत्र्यपूर्व काळातील ध्येयवाद नंतर फार थोडा काळ टिकला.

मला आठवते की १९५६–६० या काळात माझ्या मुलाबरोबर सिडनहॅम कॉलेजमध्ये जाणारा दहा-बारा महाराष्ट्रीय मुलांचा एक गट होता. सर्वांच्या पालकांचे उत्पन्न बेतांचेच होते. कॉलेजला मोटारने येणारी धनिक मुले त्यांच्या वर्गात होती; पण त्यांच्या रहाणीचे अनुकरण आपल्याला झेपणार नाही या जाणिवेने ती सर्व वागत. ही सर्व मुले उत्तम प्रकारे पास झाली व त्यांपैकी बहुतेक सर्व आज चांगल्या हुद्द्यांवर आहेत.

पटेल– नेहरू यांसारख्या मान्यवर त्यागी पुढाऱ्यांच्या मृत्यूनंतर खिसेभरू सत्तालंपट पुढाऱ्यांचे पेव फुटले. सार्वजनिक क्षेत्रात किंवा राजकारणात सेवेसाठी उतरायचे ही पूर्वीची त्यागी परंपरा जाऊन सत्तेच्या आश्रयाने स्वतःच्या तुंबड्या भरायच्या हा रोजचा व्यवहार बनला. राजकारण्यांनी उडाणटप्पू लोकांना हाताशी धरून हरएक मार्गाने स्वतःचे खिसे भरणे सुरू केले. त्याचा परिणाम म्हणून लाचलुचपत बोकाळली, सर्वत्र चैनबाजी सुरू झाली. वाटेल त्या भल्याबुऱ्या मार्गाने पैसा कमावणे व थाटात रहाणे, हे नवे ध्येय झाले. नित्य नवे कपडे, भारी किंमतीची घड्याळे, महागडी हॉटेले, टेपरेकॉर्डर, कॅसेट्स या गोष्टींना गेल्या पाच–दहा वर्षांत ऊत आला आहे. सर्वच तरुणवर्गाला त्याची ओढ वाटू लागली आहे. या वस्तू घरी न आल्या तर कुटुंबातील स्वास्थ्य बिघडू लागले आहे. पालक आणि मुले यांच्यातले संबंध ताणले जाऊ लागले आहेत. भोवताली सर्वत्र चैनीचे वातावरण पसरले आहे व तसे आपण रहावे असे प्रत्येकाला वाटू लागले आहे. यातूनच कधीकधी गुन्हेगारीची प्रवृत्ती सुरू होते. तिचे अगदी टोक म्हणजे जोशी–अभ्यंकर खटल्यात शिक्षा झालेले सर्वजण विशीच्या आसपासचे तरुण विद्यार्थी होते ! चैनीसाठी पैसे मिळवण्यासाठी त्यांनी दरोडे घातले व खून केले होते. सायकली, स्कूटर्स, मोटारी पळवून नेणाऱ्या तरुणांच्या टोळ्यांविषयी आपण अनेक वेळा वाचतो.

अर्थात सर्वच तरुण असे असतात असे म्हणणे अन्यायाचे होईल. कुटुंबासाठी काबाडकष्ट करीत रहाणारे किती तरी तरुण आजही आहेत व वडील माणसांना त्यांचे कौतुकही असते. उलट काही पालकही दुराग्रही किंवा असमंजस असू शकतात. शेजारचा अथवा नात्यातील एखादा मुलगा डॉक्टर किंवा इंजिनिअर होऊन पुढे आलेला पाहून ते आपल्या मुलाला एस्. एस्. सी. नंतर सायन्सकडे जायला सांगतात. आता त्या मुलाला गणितात गती नसेल किंवा सायन्सची आवड नसेल तर तो फारशी प्रगती दाखवू शकणार नाही. वकिलीत उत्तम जम बसलेल्या गृहस्थाला आपला मुलगाही वकील व्हावा असे वाटते व ते साहजिकच आहे; पण मुलाला चित्रकलेची आवड असल्यास त्याला कायद्याचा अभ्यास करायला लावल्याचा परिणाम इष्ट होईलच असे नाही.

सर्वांत विशेष चिंतेची बाब म्हणजे अलीकडे तरुणांत वाढत्या प्रमाणात आढळून येणारी सिगारेट, रमी, दारू इत्यादि व्यसने. ड्रिंकच्या नावाखाली दारू व गेमच्या नावा–खाली जुगार या व्यसनांना आता प्रतिष्ठा प्राप्त झालेली आहे आणि सिगारेट तर शाळा-कॉलेजच्या मुलांपर्यंत जाऊन पोचली आहे. पाश्चत्य देशातील थंड हवामानात मर्यादित प्रमाणात घेतलेली दारू हितावह असू शकते, सिगारेटने अधिक काम करण्यास तात्पुरते का होईना उत्तेजन येते. तेव्हा त्या देशातील लोकांच्या बाबतीत ही व्यसने काही मर्यादेपर्यंत उद्योगशील अभ्यासू वृत्तीला पोषक ठरू शकतात. पण आपल्याकडे या गोष्टींची सुरुवात 'कंपनीं'त व शेवट न सुटणाऱ्या व्यसनांत होतो. या व्यसनांनी पैशाचा अपव्यय व प्रकृतीची नासाडी यापलीकडे काही साधत नाही. दारू व पत्त्यांचा जुगार यापायी चांगल्या पगाराच्या नोकऱ्या सुटलेल्या सुशिक्षित तरुणांची उदाहरणे मला माहीत आहेत.

तथापि या बाबतीतील आपली जबाबदारी पालकांना टाळता येणार नाही. व्यसने अचानक एक दिवसात लागत नसतात. जेथे पालक स्वतःच या व्यसनांच्या आहारी गेलेले असतील तेथे ते कोणत्या तोंडाने मुलांचा निषेध करणार ? उलट पालक निर्व्यसनी असूनही मुलांना व्यसने लागली तर पालकांना असा प्रश्न विचारता येईल की, ही व्यसने सुरुवा-


*With Best Compliments from :*

**B. K. Naik & Sons**

Hoarding Advertisers

'Chandrakunj'

794, Bhandarkar Institute Road,

Pune-411 004.

*Phone : 57007*

तीलाच तुमच्या लक्षात कशी आली नाहीत? निर्व्यसनी पालकांच्या मुलांना व्यसने बाहेर त्यांच्या मित्रमंडळीत लागत असतात. आपल्या मुलाकडे येणाऱ्या मुलांशी पालकांनी मोकळेपणाने बोलून, त्यांच्याशी मिळूनमिसळून वागून त्यांची स्वतःची व त्यांच्या घरची माहिती मिळवली पाहिजे म्हणजे आपला मुलगा कोणत्या संगतीत आहे याचा अंदाज लागतो. त्याचप्रमाणे अगदी लहानपणापासूनच घरांत मुलांवर चांगले संस्कार घडवले गेले तर पुढे वाईट संगतीनेही मुले बिघडण्याचा संभव कमी असतो वयाच्या पंधरा–सोळा वर्षांपर्यंत घडलेले संस्कार आयुष्यभर उपयोगी पडत असतात.

शिस्तबद्ध व नियमित रहाणी, स्वावलंबन, स्वतःपासून कोणालाही उपद्रव होऊ न देणे व स्वतःबरोबरच इतरांचाही विचार करता येणे हे मूलभूत संस्कार ज्या कुटुंबात आढळतात तेथे आर्थिक स्थिती फारशी चांगली नसली तरीही कौटुंबिक सौख्य नांदत असते. सकाळी लवकर उठून आपले अंथरूणपांघरूण आवरून सर्वांनी एकत्र चहाकॉफी घेणे, आपली कपबशी आपण धुऊन ठेवणे, आंघोळीनंतर स्वतःचे कपडे धुऊन वाळत घालणे, जेवायच्या वेळी आपली व इतरांची पाने घेणे इत्यादी कामे प्रत्येकाने केली तर घरातील गृहिणीची कामे सोपी होतात. स्वावलंबन तर अंगी बाणतेच; पण कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीत आपण सर्व कुटुंबाकरता जगतो, स्वतःकरता नव्हे, अशी भावना निर्माण होते. यातूनच पुढे कुटुंबाकरता वाटेल तो त्याग करायची व्यक्तीची तयारी होते भोगापेक्षाही त्यागात चिरकाल टिकणारा आनंद आहे, हे समजते.

संध्याकाळी शाळेतून किंवा कर्त्या पुरुषाने ऑफिसमधून प्रथम घरी येऊन मगच कोठे जायचे असल्यास जायचे, उशीर होणार असल्यास आधी घरात सांगून ठेवायचे, आयत्या वेळी काम निघाल्यामुळे उशीर होणार असल्यास शक्य तर घरी कळवण्याची व्यवस्था करायची, अशी शिस्त कुटुंबप्रमुखाने स्वतः पाळून मुलांनाही ती लावली पाहिजे. तसेच संध्याकाळी बाहेर गेल्यावर अमुक वाजेपर्यंत घरी परत आले पाहिजे व पुन्हा सकाळप्रमाणे आपापली कामे स्वतःच करायची असे वळण लागले पाहिजे.

यात हल्ली काही व्यावहारिक अडचणी आहेत ही गोष्ट खरी आहे. काही पालकांना, विशेषतः ऑफिसपासून दूर उपनगरात रहाणाऱ्यांना सकाळी लवकर बाहेर पडावे लागते व संध्याकाळी घरी येईपर्यंत रात्र होते. अशा वेळी ही जबाबदारी घरातील कर्त्या स्त्रीवर पडते आणि तिलाही नोकरीवर जाणे भाग असल्यास परिस्थिती बिकट होते अशाही स्थितीत संस्काराची बैठक भक्कम असल्यास मुले वाममार्गाला जाणार नाहीत. मुले अगदी लहान असल्यास घरात वृद्ध आजी–आजोबा यांचा उपयोग होईल.


वाचन हाही संस्कार घडवण्याचा एक अनुभवसिद्ध मार्ग आहे. सानेगुरुजींच्या कथा, 'शामची आई'सारख्या कादंबऱ्या, थोरांची चरित्रे, 'किशोर'सारखी मासिके इत्यादी साहित्य कुमार व किशोर वयातील मुलांसाठी विपुल प्रमाणात उपलब्ध आहे. पालकांनी फक्त योग्य दृष्टी ठेवून, निवड करून मुलांच्या हाती ते सहज पडेल अशी काळजी घेतली पाहिजे. ते लादू नये.

थोडक्यात म्हणजे पाल्यपालकसंबंध चांगले रहाण्यासाठी सामंजस्य आवश्यक आहे. पालकांनी स्वतः व्यवस्थित वागले पाहिजे. शिवाय मुलांशी मोकळेपणाने वागून, त्यांच्या अडीअडचणी समजावून घेऊन त्या दूर केल्या पाहिजेत. मनातील विचार बोलून दाखवायला त्यांना संकोच वाटणार नाही, इतके मोकळे वातावरण घरात ठेवले पाहिजे. मतभेद होतील तेथे चर्चा करून समजुतदारपणे ते मिटवले पाहिजेत. यासाठी तडजोड करण्याची तयारी ठेवली पाहिजे. आपल्या आर्थिक जबाबदाऱ्यांची कल्पना मुलांना देऊन ठेवल्यास तीही बेजबाबदारपणे मागण्या करणार नाहीत. यासाठी त्यांना विश्वासात घेतले पाहिजे. मुलांनी जसे वागावे असे पालकांना वाटत असेल तसे त्यांनी स्वतः वागावे. स्वतः ख्यालीखुशालीत राहून गैरशिस्तपणे वागणाऱ्या पालकांना मुलांना उपदेश करण्याचा अधिकार रहात नाही. पाल्य–पालकसंबंध बिघडत असतील तर मुलांना बोल लावण्यापूर्वी पालकांनी आत्मनिरीक्षणही केले पाहिजे. हल्ली बाहेरचे वातावरण दूषित व मोहमय झाले आहे ही गोष्ट खरी; पण यापासून आपल्या मुलांना दूर ठेवण्यासाठी आपण खबरदार राहिले पाहिजे. ●

(टीप–या लेखात मध्यमवर्गाचाच विचार प्राधान्याने केला आहे. कारण चैनीची चटक लागल्यावर पैसा पुरत नसल्यामुळे निर्माण होणारे संघर्ष त्या वर्गातच होतात. समाजात हा वर्ग मोठ्या प्रमाणात आहे व तो समाजाचा कणा मानला जातो. काबाडकष्ट करून पोट भरणाऱ्या कनिष्ठ वर्गातील स्त्री-पुरुषांना मुलांकडे पहायला वेळ नसतो, उलट धनिकांकांडे पैशाची ददात नसते.)



# अेक फुलबाग फुलवायची आहे.



**घर म्हणजे सजवलेली ऐटबाज दालनं नव्हेत ! घर म्हणजे घरातरी माणसं .... त्यांची सुंदर मनं .... ही मनं सर्वांनीच जोपासायची, फुलवायची ....**

●

**मेधा सिधये**

'**पा**या हदरलेली घरं!' खरंच का अवतीभोवती तसं घडतंय? वरवर तर आज राजाराणीचे चिमुकले संसार आपल्या छोटेखानी पण सुबकतेने सजविलेल्या जागेत खुषीत चाललेले दिसतात. बहुतेक घरांतून दोघं सुशिक्षित...नोकरी करणारे. एक किंवा दोनच मुलं. हळूहळू संसार स्थिरावतो. सुबत्ता वाढत जाते; पण तरीही पहाणाऱ्याला जाणवतं, इथं काही तरी चुकलंय. कुठला तरी सूर खटकतोय. या घराचा बँक–बॅलन्स वाढत जातोय; पण मनाचा बॅलन्स लटपटतोय. घरात सगळं आहे; पण सुख नाही, असं पतीला किंवा पत्नीला वाटतंय...ती दोघं आतल्या आत एकमेकांचा राग करताहेत. मुलांचं बाल्य कुरतडलं जातंय. ज्या गृहिणीनं, आल्यागेल्याचं जमेल त्या वेळी जमेल तसं का होईना; पण आपुलकीनं स्वागत करायचं ती गृहिणी 'पाहुणा' दारात पाहून कपाळाला आठी घालते आहे पती, पत्नीला काहीही न सांगता तासनतास घराबाहेर रहातो आहे. वाढत्या वयाबरोबर मुलं आपल्या आईबापांची आर्थिक ताकद अजमावू लागली आहेत. बाकी घरात त्यांना कशातच रस वाटत नाही आहे... हे दृश्य, दुर्दैवानं आज अनेक कुटुंबांत दिसत आहे. घराचं घरपण नाहीसं झालंय, ज्या घरी आवर्जून जावं, थोडा वेळ गप्पा माराव्या, मन ताजंतवानं, प्रफुल्लित व्हावं, प्रामाणिक आतिथ्याची ऊब घेऊन शांत समाधानानं आपण घरी परतावं...अशी घरं किती? खरंच, फार थोडी! का व्हावं असं?

घराचा पाया हादरण्याची कारणं असंख्य असू शकतात. आयुष्याच्या मध्यावर आपला पती किंवा पत्नी यांच्याखेरीज इतर कुणाबद्दल वाटू लागलेलं आकर्षण, चारचौघात न बसणारा विचित्र, एककल्ली स्वभाव, अफाट महत्त्वाकांक्षा, एकत्र किंवा विभक्त कुटुंबातही होणारा अन्याय, कोंडमारा, व्यक्तिस्वातंत्र्याबद्दलच्या अवास्तव कल्पना, आर्थिक कारणे, लैंगिक असमाधान इ. इ. या यादीला अंतच नाही! फार गंभीर कारणांमुळं घटस्फोट घेणं किंवा पती–पत्नींनी एकमेकांपासून दूर रहाणं आपण समजू शकतो; पण या माणसांनी स्वतःमध्ये थोडा

बदल करण्याचा प्रयत्न केला तर घरातलं सुख, शांतता टिकवता येईल अशी परिस्थिती खूप ठिकाणी दिसते. या संदर्भात, या लेखाच्या मर्यादेत थोडा विचार करू या. माणसाची 'माणूस' म्हणून खालावलेली पातळी, स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाची नको एवढी तीव्र जाणीव, त्यापायी येणारी आत्मकेन्द्रितता, संकुचितता या गोष्टी मला कौटुंबिक पातळीवरील सर्व प्रकारच्या नात्यात दिसतात. एखादा पिता प्रतिकूल परिस्थितीत स्वतःच्या आईवडिलांची, भावंडांची जबाबदारी पार पाडतो, स्वतःचं शिक्षण पूर्ण करतो, आपल्या हुशारीच्या, महत्त्वाकांक्षेच्या बळावर नोकरी–व्यवसायात उच्च स्थान जिद्दीने मिळवतो आणि त्यामुळं स्वतःच्या मुलाचीच 'कारकुंडा' म्हणून अवहेलना करतो. मुलाचं वय, जगातला अपुरा अनुभव, त्याची कुवत या गोष्टी लक्षात न घेता त्याला हिणवणं योग्य आहे का? पण यशाची धुंदी इतकी विलक्षण असते! आपल्या पोटच्या पोराचं 'सामान्यत्व' पित्याला सलतं. तो त्याचा राग करतो, तुच्छ लेखतो. मग मुलाला वडिलांच्या कर्तृत्वाचा अभिमान वाटेल? त्यांनी भोगलेल्या कष्टांची जाणीव तो ठेवील?

'लग्नानंतर घराची जबाबदारी सांभाळून मी पदवी घेतली. तुम्हाला मात्र काहीच करियर नाही' असं बोलून आपल्या पतीला हिणवणाऱ्या बायका खूप असतात. सासूशी किंवा आईशी पटत नसेल तर मुलांना आजीपासून क्रूरतेनं तोडलं जातं. आजी आणि नातवंडे यांची होणारी तडफड स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असलेली सुबुद्ध (?) स्त्री डोळ्यांनी पाहू शकते. या सगळ्या प्रकारात नवरा डोळ्यांवर कातडं ओढून बसतो. ही दृश्यं पाहिली की, असं वाटतं यांना माणसं का म्हणायचं?

प्रत्येक घरात काही ना काही- छोटयामोठया समस्या असतातच. आपल्यापुढं असलेल्या समस्येचं धीमेपणानं स्वागत करून, तिच्या मूलभूत स्वरूपाचा नीट विचार करून, आपल्या घरातली माणसं 'माणूस' म्हणून समजावून घेऊन मग त्यांच्या बाबतीतला निर्णय घेण्याची शांत, समंजस वृत्ती फार थोडयांमध्ये असते. जुन्या काळच्या संसारामध्ये समस्या नव्हत्या का? काळ आणि परिथितीनुसार समस्यांचं स्वरूप निराळं होतं; पण त्या होत्याच होत्या. तरीही तेव्हा घरं उध्वस्त होत नव्हती. काही भेगा पडत, विटा निखळत; पण पाया मजबूत होता. कारण जीवनाला सामोरं जाण्याची जिद्द होती, हिंमत होती. 'सबंध कुटुंबासाठी सर्व प्रकारचे कष्ट' ही भावना होती. आज मात्र आपण फक्त तात्कालिक सुख पहातो. पलायनवादी भूमिका घेतो. एक घाव दोन तुकडे असं वागून जर जुन्या पिढीनं माणसं तोडली असती तर आपल्याला प्रेमाचा, जिव्हाळ्याचा वारसा मिळाला नसता. परस्परांबद्दल प्रेम, एकमेकांना मदत करण्याची वृत्ती या गोष्टी एका पिढीकडून पुढच्या पिढीमध्ये झिरपत जातात. आज स्त्री-पुरुष दोघेही अधिकाधिक स्वार्थी, संकुचित वृत्तीचे होत चाललेले आहेत. स्पर्धा कुणाशी, किती मर्यादेपर्यंत करायची हे बरेचदा उमगत नाही. 'मला ह्यांच्याहून जास्त पगार मिळतो' 'मी ह्यांच्याहून जास्त शिकलेली आहे.' 'किती शिकल्या तरी बायका त्या बायकाच' 'बायकोचं काय ऐकायचंय? मी ठरवीन तेच खरं!' असे स्त्री–पुरुषांचे उद्गार कानांवर येतात. 'माझी सासू पदवीधर आहे; पण अक्कल मात्र काडीची नाही!' अशी वाक्यं लग्नाला दोन–चार वर्षंच जेमतेम झालेली सुशिक्षित (?) स्त्री चारचौघात उच्चारते. त्यात तिला काहीच गैर वाटत नाही. तिने थोडा धीर धरला तर? प्रसंग–परत्वे, कुठल्या ना कुठल्या प्रकारचे गुण तिला सासूतही दिसतील. तेवढा धीर मात्र हवा. माझ्यातल्या 'मी' ला आवरता यायला हवं. स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाची एकतर्फी जाणीव ठेवणारी कुटुंबातली व्यक्ती फक्त आपला अहंकार जपते. कुटुंबातील इतर माणसांच्या अंगीही काही गुण आहेत, त्यांना स्वतःच्या भावभावना आहेत, त्यांच्या व्यक्तित्वालाही आपण योग्य तो मान दिला पाहिजे, ही दिलदारी क्वचित दिसते.त्यातूनच पहिली ठिणगी उडते. मनं एकमेकांविरुद्ध धुमसत रहातात एकमेकांचा सहवास नकोसा वाटू लागतो. एकाच घरात माणसं गेस्टहाउससारखी राहू लागतात. समाजात बेअब्रू होऊ नये म्हणून 'सुखी संसाराचं' नाटक चालू असतं!

आजच्या जमान्यात जीवनातल्या सर्वच क्षेत्रात स्वार्थ आपला प्रभाव गाजवताना दिसतो. एका विशिष्ट व्यापक अर्थाने प्रत्येक प्राणिमात्र स्वार्थी असतोच. माकडीण आणि तिचं पिलू, ही गोष्ट आपल्याला ठाऊक आहेच; पण हे टोकाचं उदाहरण झालं. कौटुंबिक पातळीवरून विचार करायचा झाला तर आपल्या कुटुंबियांसाठीच का होईना आपण आपला स्वार्थ बाजूला ठेवायला हवा. समाजात प्रतिष्ठा मिळते, पैसा मिळतो म्हणून सारा वेळ घराबाहेर काढणारे स्त्रीपुरुष हे विसरतात की, मुलांना आईवडिलांचा सहवास मिळणं ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे. खूप खाऊ, खूप खेळणी किंवा इतर चैन या गोष्टी प्रेमळ सहवासाची भूक भागवू शकत नाहीत. 'त्याग' या शब्दामागचं दिव्यत्वाचं वलय दूर सारून जर वास्तववादी दृष्टीनं विचार केला तर लक्षात येतं की, आपल्या आवडीला, महत्त्वाकांक्षेला, सुखाला कुटुंबाच्या स्वास्थ्यासाठी थोडीशी मुरड घालणं म्हणजेच त्याग करणं. या त्यागाची गोड फळं बहुधा प्रेमादराच्या


*With Best Compliments From*

**७० वर्षांची वाटचाल**

# बुवा आईस्क्रिमवाले

**१७१२, उद्यान कार्यालय बिल्डिंग**
**पुणे**

फोन : ४४०९०८

रूपानं चाखायला मिळतातच. असा त्याग जर आईवडिलांनी केलेला नसेल तर म्हातारपणी त्यांची स्वतः सेवाशुश्रूषा न करता त्यांना वृद्धाश्रमात किंवा हॉस्पिटलमध्ये नेऊन टाकावं असं तरुण पिढीला वाटलं तर त्यांचं काय चुकलं ? नोकरीच्या निमित्तानं बाहेरगावी किंवा परदेशी असणारा अशा घरातला मुलगा आईवडिलांना भेटायला आला तर औपचारिकपणे येतो. तो बाहेर हॉटेलात उतरतो, ओझरती भेट घेऊन वृद्ध मातापित्यांच्या जीवनातली 'संध्या–छाया' अधिकच गडद करून जातो ! या त्याच्या वागण्यावर 'अशी ही हल्लींची पिढी !' असा नुसता शेरा मारून चालणार नाही. मुळात खोलवर जाऊन विचार करायला हवा.

कुटुंबातल्या माणसांच्या सुखी जीवनाबद्दलच्या कल्पनांवर घरातलं सुखसमाधान अवलंबून राहील. झगमगाटाच्या भुलभुलैय्यात अडकणारी माणसं, पैसा मिळवण्याचं यंत्र बनून जातात. पैसाच पैसा..सुखच सुखचा मंत्र जपत असतात. सुखाचा हा आभास केव्हा तरी नाहीसा होतो. मग अशा एखाद्या घटनेतून माणसं अंतर्मुख होतात; पण वेळ निघून गेलेली असते. कधी अगदी याच्या उलट परिस्थिती असते. आर्थिक ओढाताणीमुळं मन सदैव असंतुष्ट असतं, विवंचना ग्रासत असतात नि त्यापायी एकमेकांशी भांडणं, दूषणं देणं सुरू होतं.

पती–पत्नी दोघं नोकरी करीत असतील तर आपल्या छोकरीत कुणी किती महत्त्वाकांक्षा ठेवायची ? अधिकारपदासाठी स्पर्धेत उतरायचं ते कुणी ? आणि कोणती किंमत देऊन ? याचा विवेक न राहिल्यानं संसाराला तडा गेल्याची उदाहरणं दिसतात. मुलांचं संगोपन, घरातल्या इतर जबाबदाऱ्यात स्त्री–पुरुषांचा समान सहभाग असला पाहिजे म्हणजे मग बदलीची नोकरी, अधिकारपद मिळाल्यावर वाढणाऱ्या जबाबदाऱ्या यांचा शारीरिक, मानसिक ताण स्त्रीवर पडणार नाही; पण याबाबतीत अचूक आणि निश्चित निर्णय घेणं, तो एकदा घेतल्यावर भावनावेगाला बळी न पडता संसारातल्या काही उणीवा, दुःख धीरोदात्तपणे सहन करणं यासाठी आपल्या कुटुंबातल्या माणसांवरच्या आणि एकूण मानवी जीवनावरच्या निष्ठा फार दृढमूल असाव्या लागतात. आपण घेतलेल्या निर्णयाचे कटु-गोड परिणाम पचविण्याची ताकद आपल्यात आहे की नाही हे ठरविण्यासाठी उत्तम आत्मपरीक्षण करता यावं लागतं. ते न जमल्याने काही वेळा आपण बुद्धिनिष्ठ, नव्या विचारसरणीचे, बदलल्या जीवनप्रवाहाशी सहज समरस होऊ शकणारे आहोत असं मानून चारचौघांच्या चाकोरीबद्ध संसारांना तुच्छ लेखून माणसं वेगळी वाट चोखाळतात आणि आपल्या पंखात तेव्हढं बळ नाही हे उमगल्यावर कोल मडून जातात घराचं घरपण कशात असतं ? ते टिकविण्याची जबाबदारी आजच्या काळातही एकट्या स्त्रीचीच आहे का ? पती-पत्नीमधलं नातं कसं असावं ? आईवडिलांचं आपल्या मुलाशी कशा प्रकारचं मैत्र जुळलं पाहिजे ? सासू–सासरे, दीर–नणंदा जर घरात असतील तर घरातल्या सुशिक्षित, नोकरी करणाऱ्या सुनेने, घर, दार, स्वतःच्या आवडी-निवडी, महत्त्वाकांक्षा हे सगळं कसं पेलायचं ? असंख्य प्रश्न मनात येतात ज्यांना या प्रश्नांची उत्तरं स्वतःपुरती तरी सापडलेली आहेत ते संसार खऱ्याखुऱ्या आनंदात चाललेले असतात ज्यांना या प्रश्नांची जाणीवच नाही किंवा उत्तरं शोधण्यात अपयश आलेलं आहे त्या घरांना धक्का बसलेला दिसतो.

घराचं घरपण कशात असतं ? नेमकी व्याख्या करणं अवघड आहे; पण उत्तराचं स्वरूप सांगता येईल ज्या घरातल्या सगळ्या व्यक्ती एकमेकांशी प्रेम, आदर, विश्वास अशा सुंदर बंधनांनी जखडल्या गेलेल्या असतील, ज्या घराला संपूर्ण कुटुंब म्हणून एक स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आहे नि शिवाय प्रत्येकाची व्यक्तिवैशिष्टये आवश्यक त्या प्रमाणात जोपासली जातात, जिथे लहान-मोठ्या प्रत्येकाचा आदर केला जातो आल्या गेल्याचं घरातल्या सर्वांकडून आत्मीयतेने स्वागत केलं जातं...काही विशेष अडचणीच्या प्रसंगी आणि इतर वेळीही आपल्या आवडत्या गोष्टी, इच्छा, मिळणाऱ्या संधी यांना घरासाठी एका मर्यादेपर्यंत का होईना; पण मुरड घातली जाते... अशा घराचा सहवास आपल्याला नेहमी हवासा वाटेल, नाही का? दिखाऊ ऐट, संपत्तीची गुर्मी, अधिकारपदाची लालसा किंवा त्याबद्दलचा गर्व यांचा जिथे मागमूसही नसेल, जिथे फक्त तुमच्या मनाचा 'तळ' पारखला जाईल, तो स्फटिकशुभ्र असेल तर तुम्ही त्या घराचे व्हाल, ते घर तुमचं होईल...

घराला घरपण देणं, ते टिकवणं ही जबाबदारी घरातल्या छोट्या–मोठ्या सर्वांचीच आहे. एकट्या स्त्रीची मुळीच नाही. एकमेकांविषयी ममत्व वाटावं असं वातावरण निर्माण करण्याची जबाबदारी पती, पत्नी दोघांची आहे. छोटी–मोठी संकटं झेलणं, आजारपणं सोसणं, आतिथ्य करणं, या सर्व गोष्टी समप्रमाणात विभागल्या गेल्या पाहिजेत. महत्त्वाचे किंवा लहानसेसुद्धा निर्णय लादले जाता कामा नयेत. आपल्या पुरुषप्रधान संस्कृतीत खूपदा असं होतं.

'गृहिणीः सचिवः सखी मित्रः ...' असं वर्णन कालिदासानं केलंय. 'शयनेषु रंभा, भोज्येषु माता' हा श्लोकही खूप काही सांगतो; पण हे सारं फक्त 'स्त्री'च्या संदर्भात ! प्राचीन काळात स्त्रीला स्वतंत्र स्थान नव्हतं. तेव्हा या एकतर्फी अपेक्षा आपण समजू शकतो; पण आता 'माणूस' म्हणून स्त्रीचं स्वतंत्र व्यक्तिमत्त्व काही प्रमाणात तरी


## काशिनाथ नारायण परांजपे

**सोने–चांदीच्या व मोत्यांच्या दागिन्यांचे व्यापारी**

७२, काऊ लेन, घाटकोपरवाला चाळ, मुगभाट, मुंबई ४.

फोन : ३५५१७६

मान्य झाल्यावर, संसार हा दोघांचा, हा विचार मूळ धरू लागल्यावर पती-पत्नीतलं नातं कसं असावं याचा विचार थोडया व्यापक जाणिवेतून व्हायला हवा. दोघांपैकी कुणी तरी एक मुख्य आणि एक दुय्यम असं स्वरूप या नात्यात असताच कामा नये. गौणत्व, कमीपणा जर घ्यायचा असेल तर तो एकमेकांना चांगलं जाणून, आपल्यापेक्षा दुसऱ्याचं कर्तृत्व ज्या क्षेत्रात मोठं असेल ते प्रेमभावनेने मान्य करून, जरूर घ्यावा, नव्हे तो घेतला जाईलच. पती-पत्नीतलं नातं नव्या नवलाईच्या काळापासून वार्धक्यापर्यंत सतत बदलत जातं, जायलाच हवं; पण मूळ पाया पक्का हवा. विवाह म्हणजे सहजीवन हे ध्यानी घेऊनच वाटचाल चालू राहिली पाहिजे. दोघांमध्ये सर्व बाबतीत अंतिम एकवाक्यता नसेल किंवा एकमेकांचा विरोध खिलाडूपणे पचविण्याची ताकद नसेल तर घराचं घरपण कसं जोपासलं जाणार ? आपली मुलं हाच बहुधा आपला सर्वांचा जीवनहेतू असतो; पण जर दुर्दैवानं मूल नसेल तर एकमेकांसाठी ही यात्रा सफल संपूर्ण करायची आहे ही भावना हवी. मूल होणं ही गोष्ट Bio-product मानायला शिका असा सल्ला एका दांपत्याला, एका गायनॉकॉलॉजिस्टनं दिलेला मला आठवतो. हा उपदेश पचवणं कठीण आहे; पण ' एकमेकांचे सहचर ' होणं या दृष्टीनं त्यातला आशय मला महत्त्वाचा वाटतो.

पती–पत्नीचं एकमेकांशी ज्या प्रकारचं नातं असेल, त्या भावसंबंधाचा परिणाम आई-वडील आणि मुलं यांच्यातल्या नात्यावर निश्चितच होतो. आई वडिलांच्या समृद्ध नि संपन्न भावजीवनामुळं त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आपोआपच एक उंची प्राप्त होत असते. त्याचा संस्कार मुलांवर अतिशय सहजतेने होतो. मुलं आई-वडिलांच्या आचरणातून खूप खूप शिकत असतात. अशा घरांना मुलांवर संस्कार करण्याची धडपड करावी लागतच नाही. समजू–उमजू लागलेलं बालक आपलं स्वतंत्र अस्तित्व वारंवार सिद्ध करू पहात असतं. या त्यांच्या अवस्थेपासून ते ' प्राप्ते तु षोडशे वर्षे, पुत्रम् मित्रवदाचरेत् ' या अवस्थेपर्यंत ही मैत्री हळूहळू विकसित होत गेली पाहिजे. मुलांशी वैचारिक, भावनिक पातळीवर समरसता ही गोष्ट वाटते तेवढी सोपी नाही. कारण कळत-नकळत ' पिढयातले अंतर ' (Generation gap) वाढत जात असते. जीवनसृष्टीत फरक पडत असतो. बदलत्या काळाबरोबर धावणं, बदलत्या जीवनमूल्यांशी समझोता करणं, आई-वडिलांना जमेलच असं नाही म्हणूनच सुस्पष्ट विचारसरणी असणं, त्या विचारांची मुलांशी मनमोकळी देवाण–घेवाण करणं, भाबडी तकलादू माया न करता, कठोर व्यवहारी जगाला मुलं सामोरी जाऊ शकतील अशा प्रेरणा देणं यातूनच हे नातं दृढ होत जातं. ' आपण खंबीरपणे आपल्याच पायावर उभं रहायचं आहे, प्रसंग पडलाच तर आई-वडिलांचं छत्र आहे ' अशी मुलांची भावना असली पाहिजे आणि Experience is an expensive teacher ' म्हणून आपल्या परिपक्वतेचा लाभ डोळसपणे आपण मुलांना द्यायचा आहे अशी विचारसरणी आईवडिलांची हवी.

वरील सर्व प्रश्नांपैकी सर्वांत अवघड प्रश्न म्हणजे एकत्र कुटुंबातल्या सुशिक्षित, स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाची जाणीव असणाऱ्या, नोकरी करणाऱ्या सुनेनं आपल्याला हवं ते स्वातंत्र्य आपल्या व्यक्तिमत्त्वविकासासाठी आवश्यक ती परिस्थिती... या गोष्टी कशा मिळवायच्या ? माझ्या मते तरी आजच्या काळात एकत्र कुटुंबपद्धती ही अनैसर्गिक आणि अव्यवहार्य गोष्ट आहे; पण म्हणून एकमेकांशी जुळवून घ्यायचंच नाही का ? एकमेकांचा राग राग करीत उभा जन्म तगमगत काढायचा का ? एकत्र कुटुंबाची अत्यंत मनापासून आवड असणारी थोडी माणसं वगळली तर प्रत्येक घरात कुठल्या ना कुठल्या प्रकारच्या समस्येमुळं घरातली माणसं अस्वस्थ असलेली जाणवतात. कधी जागेची अडचण, घरातल्या आर्थिक व्यवहारामुळं कुरबूर, एकमेकांच्या स्वभावदोषांमुळं धुमफुस... अनंत प्रकार दिसतात. माणसं मुळात चांगली असतात; पण सर्वांचीच विचित्र कोंडी होते मात्र हे एकत्र कुटुंबातच होतं, विभक्त कुटुंबात होत नाही असं मला मुळीच सुचवायचं नाही. एकत्र असो वा विभक्त असो, घराचा पाया हादरतो याचा अर्थ घरातल्या व्यक्ती ' माणूस ' म्हणून कुठं तरी कमी पडतात.

घर म्हणजे सजविलेली ऐटबाज दालनं नव्हेत ' घर ' म्हणजे घरातली माणसं .. त्यांची सुंदर मनं... ही मनं सर्वांनीच जोपासायची, फुलवायची. असंतोषाची खळखळ प्रेमानं, वात्सल्यानं निपटून काढायची. पित्याला मुलांची ' आई ' होता आलं पाहिजे. पत्नीला प्रसंगी पतीची आई होता आलं पाहिजे. आजोबा–आजीनं. आता आमचे दिवस संपले ' असं हताशपणे न म्हणता रसाळ फळासारखा पिकलेला आपला जीवनानुभव तरुण पिढीच्या ओटीत घालून तृप्त मनानं त्यांना आशीर्वाद द्यावा. मोठ्या माणसांची जीवन जगण्याची ही रीत मुलांना अचूक भावते. ती आपोआप विनम्र होतात. मग आपल्या आजूबाजूच्या लहानशा जगाला तरी म्हणता येतं– आमच्या आयुष्यात आम्ही ही चिमुकली फुलबाग फुलवली आहे... तुम्हीही या..आनंद घ्या. विसाव्याचे काही क्षण इथे नक्की मिळतील. एकमेकांना प्रेरणा देऊन आपण परतभेटीची प्रतीक्षा करू. ' हे विश्वचि माझे घर ' हा आध्यात्मिक अनुभव थोर संतांचा. ती पात्रता आपली नाही; पण घरातलं इवलंसं विश्व उत्तम सांभाळून दूरचं क्षितिज जवळ घेता येईल का पहाणं हे काय कमी महत्त्वाचं आहे ?

●


deccan
LUXURY SERVICE
Phone: OFF. 50305
RESI.
Proprietors
Sudhakar Jadhav
C. N. Jagtap
NEAR LUCKY RESTAURANT
F. C. ROAD, POONA-4
NEW LUXURY CARS ON HIRE
DAY & NIGHT SERVICE

दिल्लीच्या दीनदयाळ संस्थेने नानाजी देशमुख यांच्या नेतृत्वाखाली उत्तर–प्रदेशातील गोंडा जिल्ह्यात ग्रामोदयाचे जे कार्य उभे केले त्याचा श्री. दत्तप्रसाद दाभोळकर यांनी करून दिलेला परिचय गेल्या तीन वासंतिक अंकांत आलेला आहे.

ओरिसा आणि बिहारमध्येही असा एकेक जिल्हा निवडून या संस्थेने तेथे कार्याची काही जुळवाजुळव सुरू केली आहे.

महाराष्ट्रात या ग्रामोदय प्रयोगासाठी बीड ज़िल्हृयाची निवड झालेली आहे. या बीड जिल्हृयाची सद्य:स्थिती कशी आहे ?

ग्रामोदयाचे कार्य तिथे यशस्वीपणे उभे राहू शकेल का ?

ग्रामोदयामागील संस्थेच्या कार्यकर्त्यांचा नेमका दृष्टिकोन कोणता आहे ?

यासाठी हा गोंडा ते बीड दीर्घलेख.

माणूस प्रतिनिधी बंडू ठाणेकर या लेखानिमित्त बीड जिल्हृयात हिंडत असताना त्याना काम फार अवघड आहे असे तीव्रतेने सतत जाणवत होते.


निसर्ग अगदी प्रतिकूल.

राजकीय कारणासाठी अनेकांचा या कामाला विरोध.

तरीही दीनदयाळ संस्थेच्या महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांना आशा आणि उमेद वाटते की, सेवा, त्याग आणि विकासाचा वस्तुनिष्ठ दृष्टिकोन या जोरावर आज ना उद्या ग्रामोदयाचे काम महाराष्ट्रातल्या या मागासलेल्या व वैराण जिल्हृयातही उभे राहील.

# गोंडा ते बीड

● **बंडू ठाणेकर** ●



## एक

अहमदनगरचा एस. टी. स्टँड लोकांनी खच्चून भरला होता. मुंबई–पुणे–नाशिक बाजूला जाणाऱ्या गाड्यांच्या फलाटावर गर्दीचं प्रमाण थोडं जास्तच होतं. सकाळचे जेमतेम सात वाजत होते नि तरीही ऊन जाणवू लागलं होतं. उकाडा भासत होता. त्यातच गर्दी वाढत होती. वातावरण त्यातून आणखीनंच तापत होतं. त्या गर्दीतनं

वाट काढत काढत मी पुढे पुढे जात होतो घानोऱ्याला जाणारी बस शोधत शोधत. ' जामखेडला जाणारी गाडी घानोरा मार्गे जाते. ' चौकशी–खिडकीवरल्या एस्टी-कर्मचाऱ्यानं रुक्षपणे सांगितलं आणि सगळ्या फलाटांवरच्या पाट्या वाचत वाचत मी जामखेडवाल्या फलाटावर पोचलो. त्या फलाटाकडे सुरुवातीपासून मी लक्षच दिलं नव्हतं. कारण एक तर तिथे एक गाडी मी स्थानकावर आल्यापासून उभी होती, ती साफ रिकामी होती. दुसरं फलाटावर गर्दीही अगदीच बेताची होती. फलाटावर येऊन बघतो तर ती मघापासून उभी असलेली बस जामखेडलाच निघाली होती. गाडी रिकामी होती. सरळ आत शिरलो. खिडकीशी बसायला मिळालं न् मी सुस्कारा सोडला ...

सुस्कारा सोडण्याला तसंच कारणही होतं. उन्हाळ्याची सुट्टी आणि एस. टी. चा प्रवास म्हणजे डोकं वैतागवून टाकणारी कहाणी. अगदी आरक्षण असलं, तरी गर्दी एवढी प्रचंड होते की, आरक्षित जागेवरही अतिक्रमण होऊन जातं. एवढंच नाही तर कुठे हलताही येत नाही. आरक्षण नसलं तर विचारायलाच नको ! चार-चार, पाच-पाच तासही उभ्यानं प्रवास करायला लागतो. मागं एकदा मी मुंबई–चिपळूण उभ्यानं प्रवास केला होता; तर मुंबईहून परवा अहमदनगरपर्यंत येताना पुण्यापर्यंत मला उभ्यानंच यावं लागलं होतं. त्यात पुन्हा नगरला आल्यानंतरचे दोन दिवस म्हणजे एक अनुभवच होता ...


पंधरा-वीस वर्षांपूर्वी, किंवा त्याही पूर्वी नगरला आलो की, वाटायचं रखरखीत वाळवंटातला दुष्काळ ह्यापेक्षा काही वेगळा नसावा ! पण त्यानंतर मात्र नगरचा परिसर जामच बदलून गेला आहे. सहकार-चळवळ खऱ्या अर्थानं इथल्या मातीत रुजली, फुलली. तिला जलसिंचन योजनांची मदत मिळाली आणि सारा परिसरच आमूलाग्र बदलून गेला ! कालव्यांनी खेळवलेलं पाणी, उसाची लागवड आणि साखरकारखान्यांचं जाळं. त्यापाठोपाठ दुग्धव्यवसाय. त्यापाठोपाठ विविध वाहनं, बांधकामं, हॉटेल्स–लॉजेस, दुकानं, गॅरेज. आता तर सर्वत्र औद्योगिक वसाहती भरभराटू लागल्या आहेत. थोड्या-फार फरकानं ह्याच पद्धतीनं पश्चिम महाराष्ट्रातल्या अनेक जिल्ह्यांच्या विकासाची वाटचाल गेल्या काही वर्षांपासून चालू आहे. त्याचे फार चांगले परिणाम ह्या परिसरात आढळून येत आहेत ...

सहकारी चळवळींमधलं राजकारण, त्यातून निर्माण झालेले राजकीय अड्डे, भ्रष्टाचाराची असंख्य प्रकरणं वगैरे अनेक गोष्टींची वारंवार चर्चा होते. सहकार की स्वाहाकार असा प्रश्नही अनेकदा विचारला जातो. सहकारी चळवळीत रूढ झालेल्या ह्या अनिष्ट गोष्टींवर कडाडून हल्ला व्हायला पाहिजे ह्यात वाद नाही. मात्र ह्याच गोष्टींची वरचेवर चर्चा करून मूळ चळवळ बदनाम होते. तसं होता कामा नये. वास्तवात ह्या सहकारी चळवळीनं, विशेषत: पश्चिम महाराष्ट्रात, आर्थिक, सामाजिक मोठाले बदल घडवून आणले आहेत. आर्थिक सत्ता व त्याचबरोबर सामाजिक नेतृत्वही साहजिकच पारंपारिक गटाकडून दुसऱ्या गटांकडे, काही अंशी बहुजन समाजाकडे गेलं आहे. कोल्हापूर–सांगली–सातारा हे तसे पूर्वीपासूनचे पीकपाण्याला, उद्योगाला बरे जिल्हे; पण नाशिक–नगर–सोलापूरचे पट्टे दुष्काळीच. कायम गरिबीकडेच झुकलेले. धनंजयराव गाडगीळ, विखे पाटील यांनी दिलेले धडे इथल्या बहुजनसमाजातल्या नेत्यांनी गिरवले. त्याची दीक्षा आपल्या अनुयायांना दिली. सहकारी बँका निघाल्या. शेतीत नगदी पिकांकडे नजर वळली. सहकारी पद्धतीनं पाणीपुरवठा झाला. साखरकारखाने, सूतगिरण्या उभ्या राहिल्या. विणकरमंडळी सहकाराच्या झेंड्याखाली उभी राहिली आणि पूर्वापार केवळ पुण्या–मुंबईकडे डोळे लावून बसणारी जनता इथल्या मातीतच राबून इथेच सुबत्ता उपभोगू लागली. संपूर्ण महाराष्ट्राची राजकीय सत्ता, ह्या सहकारी आर्थिक केंद्रीकरणामुळं, ह्या भागातच एकवटू लागली ...

हे संक्रमण फार मोठं होतं. ह्या संक्रमणकाळात, काळाच्या नियमाप्रमाणे अनेक अनिष्ट गोष्टी घडत गेल्या; पण सर्वसामान्य जनतेला ह्या संक्रमणाचा फायदा झाला. स्वत:च्या गावातच रोजगार-व्यवसाय मिळून रोजी-रोटीसाठी होणारं धाऊक स्थलांतर निश्चित थांबलं. साहजिकच ह्या भागात पैसा बऱ्या प्रमाणात खेळू लागला त्यापाठोपाठ अनेक सोयी-सवलती ह्या परिसरात आपोआप वाढू लागल्या. लोक अधिकाधिक जागृत झाले. शिक्षण, वैद्यकीय उपचार वगैरे सोयी वाढल्या. प्रत्येक खेडं, प्रत्येक व्यक्ती जरी आज पूर्णपणे विकसित झाली नसली, तरी ह्या संपूर्ण प्रदेशात विकासाला ह्या संक्रमणामुळे मोठी गती मिळाली आहे ह्यात वाद नाही. त्यामुळेच पुढं शासनालाही जागृत जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी पावलं उचलावी लागली. एम. आय. डी. सी. सिकॉम ह्यासारख्या उद्योगधंद्यांना चालना देणाऱ्या शासकीय संस्थांनी आपलं लक्ष ह्या प्रदेशावर केंद्रीभूत केलं. त्यातनं सांगली–मिरज–कुपवाड, नाशिक–सातपूर पाठोपाठ नगरला आज मोठमोठे उद्योगधंदे उभे राहात आहेत.

वीस–पंचवीस वर्षांपूर्वी नगरपरिसराची परिस्थिती ज्यांनी पाहिली असेल त्यांना आजचा इथला विकास चांगलाच जाणवू शकेल. नगर आज झपाट्यानं पुणं–मुंबई–ठाणे–नाशिक ह्या महाराष्ट्रातल्या विकसित पट्ट्याशी जवळीक साधू पाहात आहे. सांगली–कोल्हापूरही ह्या बाबतीत मागे नाही. ह्या बदलाच्या इतिहासाचा अभ्यास एकदा होणं आवश्यक आहे. अगदी खोलवर. निदान मला तरी तसं वाटलं, दोन दिवस नगरमध्ये काढल्यावर, इथं आजही दारिद्र्यरेषेखालची माणसं आहेत. अगदी मागास टापू आहे नाही असं नाही; पण जे संक्रमण गेल्या वीस-एक वर्षांपासून सुरू आहे, त्या संक्रमणाच्या प्रभावातून हे टापूही सुटलेले नाहीत, तिथेही धडपड सुरू आहे. संगमनेर, जामखेड वगैरे टापू त्या दृष्टीनं अभ्यसनीय आहेत...

नगरमधल्या दोन दिवसांच्या वास्तव्यात ह्या विषयावर मी अनेकांशी चर्चा केली. त्यातूनच ह्या विकास–वाटचालीचे काही पैलू दृष्टीसमोर आले. मागास परिसरांच्या विकासाचा विचार करताना, पश्चिम महाराष्ट्रातल्या ह्या इतिहासाचा सांगोपांग विचार करणं अगत्याचं आहे. गुंठा-दोन गुंठा जमिनीवर टोमॅटो, इतर भाज्या, फुलं फुलवून सुबत्तेकडे वाटचाल करणारा शेतकरी इथे आहे. तर दूधपुरवठ्यातून मोटरसायकली बाळगणारे गवळीही आहेत. इथल्या जमिनीत कसणाऱ्यांची मुलं आस्ते आस्ते का होईना, उच्चशिक्षित होताहेत. कारखान्यांकडे वळू पाहताहेत. ' सहकारा 'तनं फुललेला हा विकास आहे. त्यातले दोष बाजूला करून, कुशलतेने हा मार्ग हाताळला तर ' सहकार ' हा विकासाचा एक चांगला मार्ग ठरायला हरकत नाही...



नगरमधले उन्हाचे चटके सहन करत करत मी तिथे हिंडत होतो. हिंडताना ज्यांच्या–ज्याच्यांशी चर्चा करी, तो प्रत्येक मला पुढचा कार्यक्रम विचारी. 'मी बीडला जाणार आहे इथून' म्हटलं की प्रत्येक जण मला बीडविषयीची स्वतःची मतं ऐकवायचा. त्या सगळ्यांनी वर्णन केलेलं चित्र मनाशी साकारायचा प्रयत्न केला तेव्हा काहीसा मीही धास्तावलो. अफाट दुष्काळ, भाजून काढणारा उन्हाळा, प्यायला पाणी नाही, खाण्या-पिण्याचे, राहण्याचे हाल, सर्व तऱ्हेच्या तापांच्या साथी...


२८ मे १९८३

...बीडचं हे वर्णन. एसटी स्थानकावरची तोबा गर्दी, सकाळी सात साडेसातलाही जाणवणारा उन्हाचा झटका... मी स्थानकावर बीड जिल्ह्याकडे कूच करायला पोचलो तेव्हा ह्याच साऱ्या कारणांनी खूपसा धास्तावलेलाच होतो नि म्हणूनच जामखेडला जाणारी बस रिकामी दिसली, तीत मला आरामात खिडकीशी बसायला मिळालं तेव्हा हायसं वाटलं. श्री. भिरंगी, डॉ. हळबे वगैरेंशी बोलताना मला वीस-पंचवीस वर्षांपूर्वीच्या नगरचेही अनेक किस्से ऐकायला मिळाले होते, त्यावरून त्या वेळच्या नगरचं चित्रंही अनेकदा डोळ्यांसमोर आलं

होतं. ते चित्र आणि आज ऐकायला मिळालेलं बीडचं वर्णन ह्यात फारसा फरक नव्हता ... बीड जिल्ह्यातल्या भटकंतीतला पहिला मुक्काम होता धानोरा. नगरपासून अवघ्या तीस-पस्तीस किलोमीटर अंतरावरला. बस सुटली. नगरच्या वास्तव्यात जुळलेले काही मित्र स्थानकावर होते. त्यांचा निरोप घेतला. बसचा वेग वाढायला लागला. वाढत्या वेगाबरोबर मनही पुढे पुढे धावू लागलं. ठाम दरिद्री, दुष्काळी बीड जिल्हा असंच मत नगरकरांनी करून दिलं होतं...

त्याच पार्श्वभूमीवर काही वर्षांपूर्वीचा असाच दुष्काळी नगर जिल्हा आठवला. त्याचा विकास आज झपाट्याने होतो आहे. त्याचा विकास-इतिहास त्यामुळेच आठवला. बीड ह्या नगरला लागून असलेला जिल्हा. जिल्ह्याच्या पश्चिम भागाचे संबंध तर आजही जास्त करून नगर-शीच आहेत. तिथल्या चळवळीचा प्रभाव बीडवर का पडू नये ? न जाणो पडेलही. तिथेही म्हणे आज सहकारी साखरकारखाने आहेतच. गोदावरी, मांजरा, सीना वगैरे जिल्ह्याच्या काही विभागातनं वाहात जाणाऱ्या नद्यांवर पाटबंधारे, कालवेही निघत आहेतच. कदाचित ह्याचाही फायदा बीड जिल्ह्याला होणार नाहीच कशावरून ?अशाच वेळी, उत्तर प्रदेशातल्या मागासलेल्या गोंडा जिल्ह्याचा कायापालट करणाऱ्या दीनदयाळ शोध संस्थान, दिल्ली ह्या संघटनेचे कार्यकर्तेही बीड जिल्ह्यात काम करायला पुढे सरसावले आहेत. त्यांनी हा जिल्हा विकासासाठी निवडायचं ठरवलं आहे... तर नगरच्या मिशन कॉलेजच्या 'ग्रामीण विकास अभ्यास संघटनेनं जिल्ह्याच्या आष्टी तालुक्यात काही विकासकामांना गती दिली आहे. आंबेजोगाईच्या डॉ. लोहिया यांच्या 'मानवलोक' ह्या 'धडपडचा' संस्थेनंही काही प्रयोग सुरू केले आहेत. महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळानेही १९८३-८४ वर्षात जिल्ह्यात औद्योगीकरणाला चालना मिळावी म्हणून प्रयत्न करण्याचा संकल्प सोडलेला आहे.

शेजारच्या पश्चिम महाराष्ट्रातल्या यशस्वी सहकारी चळवळीची योग्य मांगड, ह्या सर्व वर उल्लेखिलेल्या संघटनांच्या संस्थांच्या कार्याशी घातली गेली तर कदाचित काही वर्षांनी बीडहून बसमध्ये बसताना आजच्या नगरसारखंच बीड विकसित झालेलं दिसायला हरकत नाही ... बसनं नगर जिल्हा ओलांडून बीडच्या आष्टी तालुक्यात प्रवेश केला आणि विचारांची ही साखळी तुटली. रस्त्यावरच्या खाचखळग्यांनी बसलेल्या झटक्यांमुळे ! वाटलं मन किती पुढे धावतं राहातं! अजून बीड जिल्हा स्वत: प्रत्यक्ष बघायचाच आहे. तोपर्यंतच सांगीव बातम्यांवरून त्या जिल्ह्याचं चित्र तर मनानं रेखाटलंच; पण तिथे जाम मागासलेपण आहे हे निश्चत करून त्यावरील उपायावर मन विचार करू लागलं. मनातल्या ह्या खेळाला उगीचच हसावंसं वाटलं. हसू आलंच. सहज नजर सहप्रवाश्यांवरनं भिरभिरली न बाहेरच्या पळत्या दृश्यांवर स्थिरावली...




आमच्या बसनं बीड जिल्ह्यात प्रवेश केला होता !!

## दोन

महाराष्ट्र हे देशातल्या सर्वांत प्रगत राज्यांपैकी एक आहे किंवा महाराष्ट्र, देशात सर्वांत जास्त प्रगत राज्य आहे असं अनेक मानतात. खुद्द केंद्र शासनाचाही बहुधा तसाच समज आहे. विकास-दर्शक काही निकष आहेत. राज्यात मिळणारा महसूल, एकूण कारखानदारी, कामगारसंख्या, दरडोई उत्पन्न – उत्पादन – मिळकत-साक्षरता, बँकांच्या शाखा इत्यादि इत्यादि. ह्या सर्व निकषांचा संपूर्ण राज्य म्हणजे एक घटक अशा दृष्टीनं विचार केला तर वरील-प्रमाणे समज करून घेणं अजिबात चुकीचं नाही. ह्या सर्वच बाबतीत महाराष्ट्र अग्रेसर आहे ह्यात वाद नाही. अलीकडेच केन्द्र सरकारने 'उद्योगविरहित' (No Industry) अशा १८४ जिल्ह्यांची यादी प्रकाशित केली. ह्या जिल्ह्यांमध्ये निघणाऱ्या नवीन उद्योगधंद्यांना खास सवलतीही केन्द्रशासनाने जाहीर केल्या. मध्यम वा मोठ्या आकाराचा एकही उद्योग ज्या जिल्ह्यात नाही तो 'उद्योगविरहित' जिल्हा. आश्चर्य वाटेल; पण महाराष्ट्रात असा एकही जिल्हा नाही! महाराष्ट्राच्या पुढारलेपणाविषयी देशभर जो समज आहे त्याला ह्यामुळेच पुष्टी मिळालेली आहे. इतर राज्यांच्या मानाने महाराष्ट्र कित्येक दशके पुढे आहे आणि म्हणूनच महाराष्ट्राला काही विशेष सोयी–सवलती मिळू नयेत असा एक मतप्रवाह राष्ट्रीय पातळीवर आढळतो. नियोजन मंडळातही हे मत आहे असे म्हणतात !

आकडेवारीच्या दृष्टीनं हे सगळं खरं असलं तरी महाराष्ट्राचं हे प्रगत राज्य असल्याचं चित्रण खूपच फसवं आहे. आकडेवारीत महाराष्ट्राला जे अग्रेसरत्व मिळतं त्यातला सिंहाचा वाटा मुंबई–ठाणे–पट्ट्याला आहे. पुणे–नाशिक–परिसर आज खूपच विकसित झाला आहे. त्या परिसराकडे दुसरं स्थान जातं. मुंबई–ठाणे–पुणे–नाशिक हा त्रिकोण, कल्पना येण्यासाठी, महाराष्ट्राच्या नकाशातून बाहेर काढा. उर्वरित महाराष्ट्र आणि बाकीची राज्यं ह्यांची आता तुलना करा. महाराष्ट्र, देशातल्या अनेक राज्यांच्या मानानं मागासलेला आहे असंच जाणवेल. खुद्द ठाणे–नासिक पुणे ह्या जिल्ह्यांतूनही एकेक विशिष्ट पट्टा सोडला, तर बाकी जिल्ह्यांत ठार दारिद्र्य ठायी ठायी विखुरलेलं दिसेल. देशात कुठेही नाही इतकं प्रचंड केन्द्रीकरण मुंबई–ठाणे–नासिक त्रिकोणात झाल्यामुळेच,

राज्यांतर्गत फार मोठा असमतोल निर्माण झालेला आहे. औरंगाबाद, कोल्हापूर, सांगली, नगर, सोलापूर, जळगाव, मालेगाव, नागपूर, चंद्रपूर ही काही केन्द्रं आज पुढारलेली आहेत; पण तिथलाही विकास म्हणावा तितका गतिमान नाही. पश्चिम महाराष्ट्रात सहकारी चळवळ फोफावली. त्यातून तिथे विकासालाही गती मिळाली; पण तिथे अजूनही विकास काही विशिष्ट पट्ट्यांमध्ये रेंगाळतो आहे. काही टापू अजूनही खूप मागासलेलेच आहेत. तरीही एकूण पश्चिम महाराष्ट्रातले जिल्हे प्रगतिपथावर आहेत असं म्हणायला हरकत नाही; पण पश्चिम महाराष्ट्रातला धुळे जिल्हा, संपूर्ण कोकण; विदर्भ आणि मराठवाड्यात तुम्ही हिंडायला लागलात की ही पश्चिम महाराष्ट्रातली प्रगतिपथावरची वाटचालही कुठे दिसेनाशी होते आणि ठार मागासलेपणाला तुम्ही सामोरे जाता....

त्यातही मराठवाड्याचा परिसर आणि जन्मजात दारिद्र्य ह्यांची जणू सांगडच घातली गेल्यासारखी वाटते ! धुळे जिल्ह्यातला काही भाग तरी सुपीक आहे. बराचसा भाग सातपुड्याच्या पर्वतराजींनी बहरून टाकलेला आहे. जळगाव–नंदुरबार–सुरत रेल्वेमार्ग आहे. अनेक राष्ट्रीय महामार्ग धुळ्यातनं जातात. त्यामुळं काही विकास तिथे आपोआप होऊ पाहात आहे. कोकणावर निसर्ग बेहद्द खूष आहे. उत्कृष्ट समुद्रकिनारा कोकणाला लाभलेला आहे, तर विदर्भावर काळी माती खूष आहे. कापसासारख्या पांढऱ्या सोन्याचा वरदहस्त विदर्भाला लाभलेला आहे. ह्या साऱ्या निसर्गदत्त गोष्टींचा पुरेपूर फायदा उचलला जाऊन ह्या परिसरांचा विकास राजकारणापायी साधला जात नाही ही गोष्ट वेगळी; पण ह्या परिसरांचा विकास घडवून आणता येईल अशा नैसर्गिक सुविधा तरी त्या त्या परिसरातून उपलब्ध आहेत.

मराठवाड्यात मात्र ह्यापैकी काहीच नाही. मराठवाड्यानं निझामशाहीत खूप काही सोसलं; पण एवढं सोसूनही फलित मात्र मराठवाड्याला निझामशाहीत कधीच काही मिळालं नाही ! मराठवाडा ही संतांची भूमी म्हणूनही ओळखला जातो. पूर्वी औरंगजेबाच्या काळात मोगलांनी मराठवाड्यावर वर्चस्व गाजवलं. तेव्हापासून तहत स्वातंत्र्यापर्यंत सतत, काही अपवाद वगळता, सारा परिसर यावनी सत्तेखालीच राहिला. त्या संपूर्ण कालावधीत ह्या संतांनीच ह्या परिसराची स्थानिक अस्मिता सांभाळली. धर्मांतरं रोखली. पैठण, घृष्णेश्वर, जोगेश्वरी, वैजनाथ, तुळजाभवानी वगैरे महत्त्वाची श्रद्धास्थानं ह्या परिसरात आहेत. तिथल्या यात्रा करण्यासाठी अनेक लोक मराठवाड्यात येतात. अंजठा–वेरूळनं इथली पूर्वापार संस्कृती जतन करून ठेवलेली आहे. एवढं असूनही हा संपूर्ण परिसर तसा सर्व सुधारणांपासून मात्र अनेक योजनं दूर आहे. मराठवाड्याच्या उत्तर पट्ट्यातून एकमात्र रेल्वेमार्ग जातो, तोही मीटरगेजचा. राष्ट्रीय महामार्ग फारसे नाहीतच. गोदावरीच्या क्षेत्रात येणारा काही भूभाग सोडला तर इतर सर्वत्र पाण्याची वानवाच. जमीन पठारी. शुष्क कोरडी. त्यामुळं बेताचं पीकपाणी. ह्या सर्व त्रुटी म्हणून उद्योगधंदे वा इतर विकास नाही...ह्या दुष्ट चक्रातून तीस वर्षांच्या स्वातंत्र्यानंतरही मराठवाडा उर्वरित महाराष्ट्राच्या मानानं फारच मागासलेला राहिला आहे !

अनेक वर्षांपूर्वी लोकसत्तेचे त्या वेळचे संपादक कै. ह. रा. महाजनी ह्यांनी मराठवाड्याविषयी काही परखड अग्रलेख लिहिले होते....संतांची भूमी, महाराष्ट्राचा सांस्कृतिक आत्मा वगैरे भूलथापांनी मराठवाड्यातील जनतेला भुलवत ठेवायचा उद्योग पश्चिम महाराष्ट्रातल्या नेतृत्वानं बंद केला पाहिजे. निझामशाहीतून महाराष्ट्रात येण्यासाठी, मराठी बांधवांबरोबर एकत्रित राहण्यासाठी मराठवाड्याच्या जनतेनं मोठा त्याग केला आहे. खूप सोसलं आहे. आता त्यांना विकासाची संधी उपलब्ध करून द्यायला हवी आहे. तिथल्या विकासासाठी, रेल्वेमार्गांचं जाळं मराठवाड्यात उभं राह्यला हवं. रस्ते वाढायला हवे आहेत. पाण्यासाठी आहे त्या नद्यांचा, तलावांचा, विहिरींचा उपयोग करून घ्यायला हवा. जास्तीत जास्त जमीन पाण्याखाली यायला हवी...ह. रा. महाजनींच्या ह्या परखड इशाऱ्यांनंतर व स्थानिक लोकांच्या चळवळींनंतर शासनानं औरंगाबादवर लक्ष केन्द्रित केलं. अनेक सोयीसवलती तिथे जाहीर केल्या गेल्या. जायकवाडी–प्रकल्प राबवला गेला. यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक व पुढे शंकरराव चव्हाणांच्या काळात अनेक मोठाले प्रकल्प औरंगाबादला गेले. त्यातून तिथल्या औद्योगीकरणाला मोठी चालना मिळाली. औरंगाबाद विकसित होत गेलं.



औरंगाबाद विकासाच्या योजना शासनानं आपल्या पद्धतीन राबवल्या होत्या. लोकांचा सहभाग मिळवण्याचा फारसा प्रयत्न त्या वेळी झालाच नाही. त्यामुळे बहुश: बाहेरचे लोक नेऊनच तिथे मोठाले उद्योग उभारण्यात आले. त्यातले कुशल कारागीरही बहुधा बाहेरचेच आले. स्थानिक जनता ह्या विकासापासून त्यामुळं काहीशी अलिप्तच राहिली. औरंगाबादची वाढ प्राय: उपऱ्यांच्या आगमनानंच होत गेली. असं असलं तरी औरंगाबादचा विकास होत गेला हे मान्य केलंच पाहिजे. तो सर्वांगीण नव्हता. स्थानिक जनतेचाही कदाचित नव्हता हेही त्याबरोबरच कबूल केलं पाहिजे. कारण तसं असतं तर, औरंगाबादलगतचा परिसर वीस वर्षांच्या ह्या वाटचालीनंतरही पूर्णपणे मागासलेला राहिला नसता !

जायकवाडीचे टप्पे जसजसे पूर्ण होत आहेत, तसतसा बहुसंख्य शेतकरी असलेल्या समाजाचा सहभाग वाढू लागला आहे. पैठणचा विकास आज त्यामुळेच होतो आहे. जायकवाडीच्या परिसरातला भागही हळूहळू विकसित होऊ पाहात आहे !

असं असलं तरी ह्या साऱ्या शासकीय प्रयत्नांची व्याप्ती खूपशी औरंगाबाद शहरापुरतीच मर्यादित राहिली. जालन्यासारखी मोठी बाजारपेठ असूनही जालना जिल्हा तसा मागासलेलाच राहिला. तीच गत नांदेड, परभणी जिल्ह्यांची ! बीड, उस्मानाबाद, लातूर जिल्ह्यांची परिस्थितीही फारशी वेगळी नाही. मराठवाड्याचा विकास म्हणजे औरंगाबादचा विकास असं वाटावं असेच प्रकार आजपर्यंत होत राहिले. आजही होत आहेत. औरंगाबाद शहर खूप पुढारलं. रेल्वेमार्ग मीटर गेजचाच राहिला तरी गाड्यांची संख्या वाढली. विमानं येऊ लागली. पंचतारांकित हॉटेलं उभी राहू लागली. कॉस्मॉपॉलिटन गर्दी स्थानिक जनतेला भेडसावत वाढू लागली. त्यातून उद्योगधंदे, व्यवसाय, रोजगाराच्या संधी वाढल्या. विकास 'दिसू' लागला; पण ह्याचा फायदा आजूबाजूच्या प्रदेशाला फारसा झालाच नाही. खुद्द औरंगाबाद जिल्ह्याच्या उर्वरित भागालाही फारसा झाला नाही. मग बाकीच्या जिल्ह्यांची बातच नको ! ते उपेक्षितच राहिले, आजही आहेत !

बीड जिल्हाही त्यातलाच एक. भारतातल्याच काय, पण महाराष्ट्रातल्याही अनेकांना ह्या जिल्ह्याचा धड ठावठिकाणा सांगता येणार नाही ! औरंगाबाद, अहमदनगर व सोलापूर ह्या महाराष्ट्रातल्या तीन मोठ्या शहरांशी ह्या जिल्ह्याचा संबंध येतो. ही तिन्ही शहरं १२५ ते १५० किलोमीटर अंतरावर बीडपासून नजीक आहेत. औरंगाबाद, नगर आणि उस्मानाबाद ह्या जिल्ह्यांच्या कोंदणात बीड जिल्हा वसलेला आहे आणि जवळून अभ्यास केला तर मराठवाड्यातल्या सर्व जिल्ह्यांपेक्षा सर्वांत मागासलेला असा हा जिल्हा आहे. कदाचित उस्मानाबादची तुलना ह्या जिल्ह्याशी होऊ शकेल.

प्राचीन काळी अस्माका म्हणून ओळखला जाणारा हा परिसर पुढे दुर्गावती, चंपावतीनगर आदी नावांनीही ओळखला जात असे. मोगल सत्तेच्या काळात ह्या शहराला बीड हे नाव मिळालं कदाचित शहराजवळून वाहात जाणाऱ्या 'बेंडसुरा' ह्या नदीच्या नावावरून ! पठारावरचा, मध्यमहाराष्ट्रातला हा जिल्हा. ह्या जिल्ह्यात डोंगराळ भाग खूप आहे; पण सगळे डोंगर बोडके. शुष्क–कोरडे! उन्हाळ्यात स्वत: तापणारे, दुसऱ्यांना तापवणारे. जिल्ह्याची उत्तर सीमा म्हणजे गोदावरीनदी. तिच्या कडेकडेने दक्षिणेला वसलेले आहेत गेवराई आणि माजलगाव हे तालुके. जायकवाडी धरणाच्या पहिल्या टप्प्याचं काम पूर्ण होत आलं आहे. त्या धरणाचा फार मोठा फायदा ह्याच दोन तालुक्यांना प्रामुख्यानं मिळणार आहे, जवळजवळ पासष्ट ते सत्तर हजार हेक्टर जमीन त्यामुळे पाण्याखाली येणार आहे. जसजसं काम पूर्ण होऊ लागलं आहे तसतसे त्याचे परिणाम ह्या तालुक्यांतून दिसू लागले आहेत. पिके घेण्याच्या पद्धतीत त्यामुळे फरक पडू लागला आहे. दुबार पिकं जिल्ह्यात कुठे फारशी अस्तित्वात नाही. कारण तेवढं पाणीच जिल्ह्यात कुठे नाही. गेवराई–माजलगाव पट्ट्यात ती कुठे कुठे आढळतात. गेवराई तालुक्यातच जिल्ह्यातल्या तीनपैकी एक साखरकारखाना आहे. अर्थात सहकारी क्षेत्रातला. दूध – सोसायट्याही काम करू लागल्या आहेत. आणखी एक किंवा दोन सहकारी साखरकारखाने येऊ घातले आहेत. सहकारी क्षेत्रात खतकारखान्याची घोषणाही नुकतीच राजकीय मंचावरून करण्यात आली. जायकवाडीच्या कृपेनं हे दोन तालुके हरितक्रांतीच्या दिशेनं वाटचाल करू लागले आहेत. तदनुषंगानं काही कुटीरोद्योग, लघुउद्योगांचीही नोंदणी जिल्हा उद्योग-केंद्राकडे होऊ लागली आहे. काही हालचालींची ही नुसती सुरुवात आहे......


# " महाराष्ट्राच्या कालमुद्रा "

**लेखक : म. वि. सोवनी**

महाराष्ट्राच्या समाजजीवनावर परिणाम करणाऱ्या विविध क्षेत्रांतील घटनांची दिनांकवार नोंद करणारा ग्रंथ–

**६७० + १६ डेमी पृष्ठे ☆ मूल्य रु. ८५/००**

श्री. ना. ग. गोरे, श्री. माधव गडकरी, संपादक, मुंबई सकाळ यांनीं आवर्जून गौरवलेला ग्रंथराज ! !

प्रकाशक : **नितीन प्रकाशन,** ११८२ सदाशिव पेठ, पुणे ३०.

जिल्ह्याच्या पूर्वभागात माजलगाव तालुक्याचा काही भाग व आंबेजोगाई तालुका येतात. ह्या तालुक्यांच्या एका बाजूला परभणी जिल्हा आहे, तर दक्षिणेला लातूर आंबेजोगाई तालुक्यातल्या अनेकांना लातूर व लातूरमार्गे सोलापूरचा परिसर जवळ पडतो. संपूर्ण आंबेजोगाई तालुका तसा, इतर जिल्ह्याच्या मानाने, पावसाच्या दृष्टीने सुखी आहे. तसा पाऊस इथेही कमीच पडतो. पंचवीस इंचांच्या आसपास; पण तो नियमितपणे पडतो त्यामुळे व गोदावरीच्या उपनद्यांमुळे बराच भाग पाण्याखाली येत असल्याने, तसा आंबेजोगाईचा परिसर इतर जिल्ह्याच्या मानाने प्रगत भासतो. काही डोंगराळ, साफ दुर्लक्षित भाग ह्याही तालुक्यात आहे. ह्याही तालुक्यात काही ठिकाणी पिण्याला पाणी लांबून लांबून आणावं लागतं. धड रस्तेही अनेक गावात जायला नाहीत. तरीही हा परिसर इतर जिल्ह्याच्या मानानं प्रगत वाटतो नि त्याचं प्रत्यंतर आंबेजोगाई गावात शिरताच मिळतं.

अलीकडेच हे गाव गाजलं ते मराठी साहित्यसंमेलनाचं सूप इथं वाजल्यामुळं. त्या संमेलनाला आलेल्या अनेक पाहुण्यांनी तक्रारी केल्या. ह्या गावात पोचायला धड मार्ग नाहीत. रेल्वेची सोय नाही. परिसरात सोयी काही नाहीत. इत्यादी इत्यादी; पण इथला स्थानिक माणूस मात्र संमेलनावर खूष होता– आहे. संमेलनाच्या स्मृती काढून त्या आठवणींमध्ये तो आजही मश्गूल होतो. तो एक आगळाच अनुभव होता. वेगळी अनुभूती होती. त्यांच्या दृष्टीने ती एक साहित्यिक मेजवानीची पर्वणीच होती नि त्यामुळेच, इतर ठिकाणांपेक्षाही इथल्या संमेलनाला गर्दी जास्त लोटली होती म्हणे ! थोडं विषयांतर झालं खरं; पण संमेलनाचे जे किस्से मला ऐकायला मिळाले त्यामुळे ह्या परिसराच्या सांस्कृतिक प्रगतपणाचेच प्रत्यंतर मला आले असं म्हणायला हरकत नाही. ह्या शहरातनं हिंडायला लागलं की, त्याचे पुरावेही जागोजाग मिळू लागतात. मराठवाड्याचं पुणं असं कुणी आंबेजोगाईला मानतात. शाळा, महाविद्यालयं, तांत्रिकी शाळा, वैद्यकीय महाविद्यालय नि त्याचबरोबर सांस्कृतिक कार्यक्रम, चळवळी, वाचनालयं... संपूर्ण बीड जिल्ह्यात असं जीवन कुठेच पाह्यला मिळत नाही.

इतर जिल्ह्याच्या मानाने आंबेजोगाई तालुका प्रगत आहे असं मी पुन्हा पुन्हा म्हणतो त्याला काही आणखीही कारणं आहेत जिल्ह्यातला नागरी भाग फक्त सहा गावांतनं विखुरलेला आहे. त्यातली दोन नगरपालिका असलेली गावं आंबेजोगाई तालुक्यात आहेत. एक आंबेजोगाई. जिल्ह्याचं प्रमुख सांस्कृतिक केन्द्र. शिवाय इथे एक सहकारी साखरकारखाना आहे. छोटी औद्योगिक वसाहतही आहे. दुसरं गाव म्हणजे परळीवैजनाथ. संपूर्ण बीड जिल्ह्याची रेल्वेशी, औद्योगीकरणाशी जी थोडीशी तोंडओळख आहे ती परळीवैजनाथमुळे. परळीला ब्रॉडगेज व मीटरगेज दोन्हीचे लहानसे रेल्वेमार्ग आहे. मीटरगेज परभणीकडे जाते. तर ब्रॉडगेज विकाराबाद (आंध्र) कडे जाते. दोन्ही मार्ग मिळून जिल्ह्यातली रेल्वेमार्गांची लांबी आहे फक्त सत्तेचाळीस किलोमीटर. तीदेखील जिल्ह्याच्या एका टोकाला. त्यामुळे आंबेजोगाई व तालुक्याचा काही भाग सोडला तर इतर जिल्ह्याला ह्या रेल्वेमार्गाचा कुठलाही फायदा नाही !

परळी-वैजनाथलाच २७० मेगॅवॅटचं औष्णिक वीजनिर्मितीकेंद्र आहे. ह्या केंद्राची क्षमता पाचशे मेगॅवॅटपर्यंत वाढवण्याचं काम सध्या जोरात चालू आहे. रेल्वे, वीज-निर्मितीकेंद्र ह्याबरोबरच जिल्ह्यातली एकमात्र सहकारी औद्योगिक वसाहत व सहकारी औद्योगिक बँकही परळीलाच आहे परळी वैजनाथ व आंबेजोगाईची योगेश्वरी ही दोन महत्त्वाची तीर्थस्थानंही ह्याच परिसरात. त्यामुळे पर्यटकही ह्याच परिसरात येत असतात... सांस्कृतिक, औद्योगिक, शैक्षणिक, पर्यटन... सर्वच बाबतीत त्यामुळे हा आंबेजोगाई-परळी परिसर जिल्ह्याचं नेतृत्व करतो म्हटलं तर फारसं वावगं ठरणार नाही !

बीड जिल्ह्याची दक्षिण सीमा सीमित केली आहे मांजरानदीनं. नदीच्या काठानं वसले आहेत प्रामुख्याने आंबेजोगाई, केज आणि बीड तालुके मांजरानदीवरही महासांगवी धरणाचं काम जोरात सुरू आहे आणि धरणाचा मोठा फायदा बीड आणि केज तालुक्यांना व्हायची शक्यता आहे. जवळजवळ पंधरा हजार हेक्टर जमीन त्यामुळे पाण्याखाली यायची आहे. ह्या दोन तालुक्यांपैकी बीडमध्ये औद्योगिक वसाहत एम्‌आयडीसीची उभी आहे. म्हणावी तशी प्रगती ह्या औद्योगिक वसाहतीची नसली तरी बीडच्या औद्योगिक हालचालींना त्यामुळे थोडा हातभार लागला आहे. मराठवाडा विकास महामंडळाचा चामडे कमावण्याचा मोठा कारखानाही ह्या औद्योगिक वसाहतीत आहे. त्यामुळे थोडी औद्योगिक कामगारांची संख्या वाढली आहे. ह्याव्यतिरिक्त ह्या दोन तालुक्यांत काही छोटे लघुउद्योग कुठे कुठे कसेबसे उभे आहेत. मांजरानदीवरील प्रकल्पामुळे काही बागायती उभ्या होऊ पाहात आहेत, तर तालुक्यांमध्ये प्रत्येकी एकेक सहकारी साखरकारखान्याची घोषणा झाली आहे.

*With Best Compliments From*

## HOTEL RADHIKA

Sadashiv Chambers

564, Nana Peth, Laxmi Road,

PUNE–411002

*Phone – 22630*

बीडमध्ये सहकारी सूतगिरणीचेही प्रयत्न सुरू आहेत. कारण ह्या ठिकाणी बरेच हातमाग व यंत्रमाग आहेत. त्यावर विणलं जाणार ' बीड टेरीकॉटन ' परिसरात प्रसिद्धही आहे.

असं असलं तरी हे तालुके तसे गेवराई, माजलगाव व विशेषत: आंबेजोगाईच्या मानाने मागासलेलेच ! दुष्काळीही शेतं कोरडी ठणठणीत ! नद्यांच्या ओहोळांना, ओढ्यांना व कित्येक विहिरांनाही पाण्याचा थेंब नाही. प्यायलाही पाणी अनेक मैलांची पायपीट करून आणावं लागतं. तेही बहुधा तोकडंच. अशा ह्या ठार दुष्काळी परिसरातलं दृश्य सर्वत्र खूपच केविलवाणं आहे. दारिद्र्य कसं असतं ते कुठली परिसीमा गाठू शकतं ह्याची चुणूक ह्या तालुक्यातनं हिंडताना दिसते. त्यावर उपाय म्हणून शासनातर्फे दुष्काळी कामं सतत सुरू असतात. कुठे पाझरतलाव, कुठे जिल्हा रस्ते. नगरपासून बीडपर्यंत तुम्ही कुठल्याही रस्त्यानं जा. अशा अनेक कामांच्या पाट्या तुम्हाला जागोजाग आढळतील. अगदी दोन-चार किलोमीटर अंतरावर, कुठे ओढ्यावर, कुठे ओहोळावर, कुठे गोदामाई-मांजरा-सीना आदींच्या उपनद्यांवर ठिकठिकाणी लघुसिंचन तलावाचं जाळं आहे. मिळेल त्या साधारण शक्य ठिकाणावर पाझर तलाव निर्माण केले गेले आहेत. ह्या पाट्या वाचल्या, त्या पाट्यांवरच्या कामाच्या तारखा वाचल्या की, वाटतं एव्हाना बीड जिल्हा सर्वत्र हिरवागार होऊन गेला असेल. रोजगार हमी योजनेखाली ह्यातली बरीचशी कामं झालेली आहेत ' रोहयो ' मधल्या भ्रष्टाचारांच्या बातम्या गृहीत धरूनही, त्या योजनेमुळे अनेक गरजवंतांना अर्धी रोटी तरी मिळाली. एवढाच काय तो या विविध योजनांचा फायदा म्हणता येईल. एरवी एवढ्या मोठ्या प्रमाणावर राबवल्या गेलेल्या योजनांचा शेती सुधारण्याच्या दृष्टीने, पाण्याचा दुष्काळ कमी करण्याच्या दृष्टीने किंवा कशाही कारणाने फारसा फायदा झालेलाच नाही. कदाचित अशा कामांसाठी निवडलेली ठिकाणंच चुकीची असतील! कुठे मुळातच पाणी नसलेल्या ओढ्यांवर तीन-तीन, चार-चार लघुसिंचन ' तलाव ' बांधण्यात आले असतील, तर कुठे, जिथे पावसाचीच वानवा तिथे मोठाले पाझर तलाव बांधूनही पाणी साठवलंच जात नसेल. कारणं काही का असेनात; पण बीड, सांगवी, धानोरा, वेंडसुरासारख्या काही मोजक्या तलावांचा अपवाद वगळता सर्वत्र परिणाम शून्य आहे !


COMMERCIAL
AND
INDUSTRIAL
DESIGNERS, PRINTERS

Sawkar
Art
Service

**1318 B, Kasba Peth**
Behind Dr. Gharpure Hospital,
**PUNE 411 011**

*Phone* :
Works, C/o 44 90 82
Office : 30 7 39


साहजिकच केज काय किंवा बीड काय, दोन्ही तालुक्यांत दुष्काळाचं स्वरूप भीषण जाणवतं. बीडसारख्या शहरवजा गावातही पिण्याच्या पाण्याची वानवा आहे. रोगराईही सर्वत्र जाणवते. त्यामानाने आवश्यक वैद्यकीय सेवाही उपलब्ध नाहीत. कुणाला गरज भासलीच तर बीडहून मोठ्या शहराकडे जायला वाहनांचीही, एस. टी. व्यतिरिक्त सुविधा कुठलीच नाही. परळी–आंबेजोगाईच्या दृष्टीन परळीची रेल्वे–सुविधा काही अंशी तरी उपयोगी पडते. आंबेजोगाई मेडिकल कॉलेज खूप वैद्यकीय सेवा पुरवू शकतं; परंतु बीडला त्याही सुविधा नाहीत. आंबेजोगाई–परळी ही जिल्ह्यातली शहरं खरी; पण तीसुद्धा बीडपासून शंभर–सव्वाशे किलोमीटर अंतरावर ! नगर–औरंगाबाद–सोलापूरदेखील दीडशे किलोमीटरच्या आसपास ! तेथेही पोचायला फक्त एसटीच. ती देखील राज्यमहामार्गावरून व जिल्हा-परिषद रस्त्यांवरून धावणारी ! कारण ह्या जिल्ह्यात राष्ट्रीय महामार्गाचा एक किलोमीटर तुकडाही कुठे नाही. रेल्वे आहे; पण ती फक्त परळीपुरती मर्यादित. तीही सव्वाशे किलोमीटर अंतरावर !! बीड–केज तालुक्यात शिक्षणाचीही गत फारशी वेगळी नाही. सांस्कृतिक–साहित्यिक चळवळही त्यामुळे तशी नाहीच ! एवंच शिक्षण, साहित्य, सांस्कृतिक घडामोडी, शेती, उद्योगधंदे, पाणीयोजना, रस्ते; रेल्वे, इतर बाहेरील जगाशी जवळचं नातं प्रस्थापित करायला आवश्यक सुविधा–सर्वांचीच बीड जिल्ह्यात तशी उणीवच भासत असली तरी ती खुद्द बीडमध्ये व शेजारच्या केज तालुक्यातही चांगलीच जाणवते !

आष्टी–पाटोदा तालुक्यांची परिस्थिती तर ह्याहूनही वाईट आहे. नगर जिल्ह्याला लागून असलेले हे बीड जिल्ह्यातले पश्चिमेकडले तालुके. दोन्ही तालुक्यांत बोडका डोंगराळ भाग भरपूर. त्यामुळे रस्त्यांनी जाताना दोन्ही तालुक्यांत भरपूर घाट, घाट्या, चढउतार, वेडीवाकडी वळणं वगैरे आढळतात. पाऊस इथे दोन्ही तालुक्यांत अगदीच अनियमित. जेमतेम पंधरा–वीस इंच. तोही पडला तर पडला, नाही तर हरीहरी ! आष्टीच्या दक्षिण सीमेलगत सीनानदी वाहते. तिच्यावर काही धरणांचा कार्यक्रम आहे; पण ही नदीच मुळात कोरडी असते. सिंधफणा, मांजरा नद्यांवरील जलसिंचन-प्रकल्पांमुळे पाटोदा तालुक्यातली काही जमीन भिजण्याची शक्यता आहे; पण थोडीशीच ! बहुसंख्य जमीन दोन्ही तालुक्यांत तशी कोरडवाहूच. अनियमित पावसावर थोडीफार शेती होते. ज्वारी, बाजरी वगैरे पिकते; पण तेवढंच ! त्यापुढे शेतीउत्पन्न फारसं नाही. दुबार पीक तर फारसं कुठे नाहीच. काही सधन शेतकऱ्यांच्या शेतांवर विहिरी आहेत. त्यांवर पंपही आहेत. अशा शेतांवर परिस्थिती थोडी बरी आहे; पण भरमसाठ, योग्य जागा न निवडता झालेल्या

अनेक शेतातल्या विहिरींनाही म्हणे गेल्या दोन वर्षांपासून पाणी ठरतच नाही. त्यामुळे इथे अनेक शेतकरी बाहेर पळताना दिसतात. मोठ्या शेतकऱ्यांची ही परिस्थिती, तर छोट्या गुंठा–दोन गुंठे कसणाऱ्यांची परिस्थिती तर पुसायलाच नको ! अशी अनेक कुटुंबंच्या–कुटुंबं चक्क बैलगाड्या घेऊन दूर नगर, नाशिक, सोलापूर जिल्ह्यांत निघून जातात. वर्षातून सात–सात आठ–आठ महिने ! एकट्या आष्टी तालुक्यातून किमान पंधरा हजार बैलगाड्या व त्याबरोबर तेवढी कुटुंबं काम शोधत स्थलांतर करतात. पाटोद्याहून जाणाऱ्यांची जवळजवळ तेवढीच संख्या आहे. ह्याव्यतिरिक्त एसटी वा अन्य मार्गांनी कुठे कुठे रस्ते पायी तुडवतही स्थलांतरित होणाऱ्यांची संख्या कमी नाही. बीड आणि केज तालुक्यातूनही दरवर्षी शेतीचे दिवस संपल्यावर बाहेर पडणाऱ्यांची संख्या कमी नाही. एका ग्रामसेवकाकडच्या आकडेवारीनुसार संपूर्ण बीड जिल्ह्यातून दरवर्षी सुमारे साडेचार ते पाच लाख लोक पोट पाठीवर घेऊन, घरंदारं मागे टाकून, शेती सोडून एका अर्थी देशांतरच करतात ! मुलुख सोडून परप्रांतात, दुसऱ्या जिल्ह्यांत रोजीरोटी कमवायला जातात. ह्यातल्या तीन-चतुर्थांशाहून अधिक स्थलांतरितांची संख्या आष्टी, पाटोदा, केज तालुक्यांतून असते.

ही मंडळी सात–आठ महिने बाहेर असतात. सर्वच्या सर्व कुटुंबासह ! बहुतांशी साखरकारखाने वा तत्सम मोठे उद्योग असतील तिथे बैलगाड्यांसह हे शेतकरी जातात. कारखान्यालगत झोपड्या उभारून राहातात. बायका–मुलांसह मिळेल त्या कामासाठी राबतात. वर्षाची गुजराण करतात. त्यांची मोलमजुरी, त्यांच्या बैलगाड्या तिथे भाव सपाटून पाडून वापरल्या जातात. कारण ठेकेदारांनी त्यांना आगाऊच उचल देऊन बांधून घेतलेलं असतं. शिवाय काम संपवून परतताना तो ठेकेदार पुढील वर्षासाठी बयाणा देऊन त्यांच्या अर्ध्या रोटीची सोय करीत असतो पूर्वी गुलामांचे बाजार राजरोस होत. गुलाम विकत घेतले जात असत. अर्धपोटी, क्वचित शिळ्या तुकड्यावर त्यांना राबवून घेतलं जात असे. आज पद्धत बदलली आहे. ठेकेदार हंगामात कारखान्यांना माणसं पुरवायचा ठेका मिळवतो. तो मिळवल्यावर खेड्यापाड्यात हिंडून नडलेल्यांना मदतीचं गाजर दाखवून 'उचल' देतो. त्या बदल्यात शेतीचा मोसम संपल्यावर कारखान्यावर कामावर यायची हमी घेतो. सुगीचे दिवस संपले म्हणजे त्यांना आठवण करून द्यायला, कामावर घेऊन जायला तो येतो. कामावर हे शेतकरी व त्यांचे कुटुंबीय अक्षरशः राबवून घेतले जातात. त्यातून मिळणारा मोबदला जेमतेम पोट भरेल एवढाच असतो. गावाहून कामावर जाताना नेलेले कपडे बहुधा फाटूनच ही मंडळी परततात. नवीन कपडा होणं शक्यच नसतं. कधी कुणा कुटुंबातली वयात आलेली पोरं, स्त्री कारखान्यावर नासवून, वाईट मार्गाला लावून परत धाडलेली असते ! पूर्वीच्या गुलामगिरीच्या काळात याहून वेगळं काय घडायचं ? फक्त पद्धती मात्र आज बदलल्या आहेत. नावं गोंडस आहेत एवढंच ! बाकी हा सारा 'गुलामां'चाच खेळ आहे ! तोही फार मोठ्या प्रमाणावर ! बीड जिल्ह्याची एकूण लोकसंख्या चौदा लाखांच्या आसपास. त्यातले साडेचार–पाच लाख लोक अशा रीतीने पिळून काढले जातात ! !

'अठरा विश्वे दारिद्र्य', 'ठिगळं लावून चाललेले संसार' वगैरे वर्णनं साहित्यात वाचायला मिळतात; परंतु त्याचं चालतं–बोलतं दर्शन ठायी-ठायी घडतं. बीड जिल्ह्यातल्या या दोन-तीन तालुक्यांतल्या असंख्य छोट्या छोट्या गावातनं ! काही खेडीच्या खेडी ओस पडलेली सापडतील. ह्या मोसमात आणि कारखान्यांचा मोसम संपला की, ह्या सगळ्या बैलगाड्या आपापल्या रिकाम्या झोपड्यांकडे परततात, तेव्हाचं दृश्य केविलवाणं असतं. खेड्यांच्या मानानं कारखान्यांचा परिसर म्हणजे शहरच. तिथनं परतताना हे शेतकरी बव्हंशी अधिक कर्जाच्या ओझ्याखाली पिचूनच परतलेले असतात. 'शहरं' कुणालाच मानवलेलो दिसत नाहीत. अशा कुटुंबांमध्ये कुठलं आरोग्य! कुठलं मुलांचं पालन-पोषण ! संगोपन ! शिक्षण ! हे सारं आयुष्यात कधी मिळणारच नाही अशीच त्यांनी मनाची समजूत करून घेतलेली असते ! परिच्छेदाच्या सुरुवातीला दिलेल्या साहित्यिक वर्णनांहूनही इथलं दारिद्र्य भयाण आहे ! मानवतेला कलंक लावणारं आहे ! ! बीड जिल्ह्याच्या इतर तालुक्यांतूनही अशी गावं आहेत. नाहीत असं नाही; पण केज व त्यानंतर त्याहूनही अधिक तीव्र जाणीव ह्या दारिद्र्याची होते ती आष्टी, पाटोदा तालुक्यात !

तालुक्याची ही दोन्ही गावं म्हणजेही खेडीच आहेत. ह्या दोन्ही तालुक्यांत एकही नगरपालिका नाही. उद्योगधंदे जवळजवळ शून्य ! ते काढायला फारसा वावही नाही. नाही म्हणायला, आष्टी तालुक्यातल्या कडा गावी कडा सहकारी साखरकारखाना उभा आहे; पण हाही कारखाना सतत तोट्यात आहे. हल्ली त्यालाही धड पाणी-पुरवठा होत नाही. परवा वैतागून ह्या कारखान्याच्या अध्यक्षांनी उद्गार काढले की, 'हा कारखाना इथे काढला हीच चूक झाली !' ह्या चुकीवर आज शासनही विचार करत आहे म्हणे ! आता पाटोद्यातही एक सहकारी साखरकारखाना येऊ घातला आहे. सहकारी साखरकारखान्यांनी जसा नगरचा परिसर बदलून टाकला, तशीच ह्या चळवळीची दुसरीही एक काळी बाजू आहे. ती म्हणजे कारखान्यांद्वारे खेळलं जाणारं राजकारण ! राजकारणातल्या एका गटानं एक कारखाना काढला की, दुसऱ्यानं दुसरा. मग ऊस असो वा नसो. पाणी असो वा नसो ! अशा जीवघेण्या स्पर्धात्मक राजकारणानंच ह्या चांगल्या चळवळीची आज वाताहत होणार की काय अशी भीती वाटू लागली आहे. विशेषतः अशी स्पर्धा जेव्हा आष्टी–पाटोद्यासारख्या नको त्या भागात होते तेव्हा विकासाऐवजी नैरा-


दादरमध्ये प्रथमच
संपूर्ण वातानुकूलीत संगीतमय वैभवशाली पेढी
ज्वेलर्स
एम. व्ही. पेंडुरकर आणि कं.
कबुतरखान्यासमोर,
दादर (पश्चिम) मुंबई-४०००२८.
फोन-४२२५००३
B.Y.P.

इयापोटी अनास्था, अनागोंदी, गोंधळ व पीछेहाटच त्या भागात संभवते !

ह्याव्यतिरिक्त ह्या दोन्ही तालुक्यांत दूधसोसायटचा बऱ्याच आहेत; पण त्यातही अनेक भ्रष्टाचाराच्या कहाण्या ऐकायला मिळाल्या. सोसायटचांचे चेअरमन, सेक्रेटरी वगैरे गावातनं गोळा झालेल्या दुधात चक्क पाणी मिसळतात व नंतरच शासनाकडे पोचवतात. पाणी असल्यामुळे शासनाकडून भाव कमी मिळतो. तोच भाव शेतकऱ्यांना मिळतो पाण्याने वाढलेल्या मापांचे पैसे मात्र पदाधिकाऱ्यांना फुकटात मिळतात. सोसायटीत दूध भरायला त्यामुळे फारसे कुणी तयार नसतात !

ह्या सोसायटचा आणि साखरकारखाना ह्याव्यतिरिक्त ह्या दोन तालुक्यांत बाकी आहेत त्या फक्त घोर दारिद्र्याच्या, अज्ञानाच्या कहाण्या ! ह्या दोन तालुक्यांच्या परिस्थितीबाबत एक मात्र फरक आहे. आष्टी तालुका पूर्वी नगर जिल्ह्यात होता. भारताला स्वातंत्र्य मिळायच्या आदल्या दिवशी म्हणे हा तालुका निझामाकडे दिला गेला. निझामशाहीत गेल्यानंतर हा तालुका बीड जिल्ह्यात समाविष्ट केला गेला. त्यामुळे आष्टी तालुक्यातली गावं सांस्कृतिकदृष्टचा जास्त जोडली गेली आहेत ती नगरशी ! नगर त्यांना भौगोलिकदृष्टचाही अगदी जवळ आहे. एवढंच नाही तर आष्टी तालुक्यातून बीड जिल्ह्याच्या उर्वरित भागात जवळच्या रस्त्यानं जायचं असेल तर नगर जिल्ह्याच्या जामखेड तालुक्यातनंच जावं लागतं. नगर–आष्टी–जामखेड व नंतर पाटोदा–बीड असाच मार्ग जातो ! सांस्कृतिक, भौगोलिकदृष्टचाही हा तालुका असा बाकी बीड जिल्ह्यापासून तुटलेला वाटतो ! पाटोदा इतका तुटलेला वाटत नसला तरी पाटोद्याचे जास्त व्यवहार, पूर्वापार परंपरांमुळें, नगर जिल्ह्यातल्या जामखेडशीच आहेत. असं म्हणतात की, निझामशाही व महाराष्ट्र ह्यांच्या सरहद्दीवरील ह्या गावातनंच अनेक व्यवहार उघड वा चोरून होत असत. त्यामुळंच ह्या दोन्ही बाजारपेठा तशा मोठ्या आहेत. विशेषतः जामखेडची !!

तर असा हा बीड जिल्हा ! 'प्रगत महाराष्ट्रा'च्या मुंबई–ठाणे–पुणे–नाशिक त्रिकोणाच्या चित्रणाशी त्याची तुलना करून पाहा ! देशातल्या सर्वांत प्रगत राज्यातलाच हा जिल्हा आहे. राज्य प्रगत आहे असं पटतं का ? आणि असा हा एकच जिल्हा नाही. महाराष्ट्रात असे अनेक जिल्हे आहेत ! बीड फक्त त्यातला एक. कदाचित इतर जिल्ह्यांपेक्षा कांकणभर अधिक दरिद्री एवढंच !!

ह्या जिल्ह्यात मी शिरत होतो तिथे येऊ घातलेल्या सर्वांगीण विकासाची ओळख करून घ्यायला.

... नगरहून सुटलेली बस धानोऱ्यात थांबली होती. बीड जिल्ह्यातल्या माझ्या भटकंतीला सुरुवात झाली होती ...

## तीन

धानोऱ्याला मी उतरलो. नगर–धानोरापर्यंतच्या प्रवासाला साधारणपणे सव्वा तास लागला. वाटेत ठिकठिकाणी प्रवासी उतरवत, उतारू घेत घेत गाडी पुढे जात होती. गाडी धावत असताना माझं लक्ष सतत बाहेर होतं. नगर–धानोरा मार्गात सुखावह काहीच आढळत नव्हतं. कुठे एखादं झाड दिसायचं, कुठे थोडासा हिरवा पट्टा. एरवी सर्वत्र कोरडं ठणठणीत, ओलाव्याचं कुठे नाव नाही. गाव जवळ आलं की एखादी विहीर दिसायची. विहिरीवर पाणी घ्यायला आलेल्यांची झुंबड दिसायची. नंतर गाव संपेपर्यंत पाणी डोईवरून घेऊन जाणाऱ्यांची रांग दिसायची. गावाच्या थांब्यापाशी दोन–चार पाव्हणे दिसायचे. एखादं पानाचं ठेलं. 'च्या'चे दुकान. आजूबाजूला काही मोडकळीस आलेली घरे. एखादं दुमजली. त्यात थोडी पेरून ठेवलेली दोन–चार झाडं. बस एवढंच. कसली हालचालही दिसायची नाही. अगदी शांत शांत. दुपारी वामकुक्षी करत पडून निपचित झाल्यागत. तिथनं बस सुटून पुन्हा उभी रहायची असल्यास अशाच एखाद्या डुलकी घेणाऱ्या गावाशी.


...धानोरा हे त्यातल्या त्यात, त्या पट्टीवरचं थोडं मोठं गाव. जाग असल्यासारखं वाटणारं. थांब्यावरही थोडी जास्त माणसं होती. तिथ उतरलीही बरीच आणि आम्ही उतरत असतानाच आत चढायला धडपडणारी धा–पंधरा होतीच ! एस टी. बसथांब्यावर उतरल्यावर उगाचच इकडे–तिकडे पाहिलं. आजूबाजूला रेंगाळणाऱ्यांच्या नजरा माझ्याकडेच रोखल्या गेल्याचं जाणवलं. थोडं निरीक्षण करून बाजूच्याच 'रेस्टॉरंटा'त शिरलो. अपेक्षेपेक्षा किंवा नगरपेक्षाही म्हणानात का, चांगला वडा, चहा तिथे मिळाला. चहा घेता घेता प्रो. शिदेंना बोलतं केलं. (बहुधा हेच आडनाव आहे त्या हॉटेल–मालकांचं !) '...नगरच्या कॉलेजची मुले येतात हिथे. हिथं जवळच काम चाललेय की त्यांचे. आमचे सरपंच आहेत बघा त्याचे बी चेरमन. कडिलेमास्तर पण जास्त माहिती दील त्येची !' त्यांनी स्वतःच्या दुकानातला एक मुलगा देखील लावून दिला माझ्या संगतीला. माझा 'गाईड' म्हणून त्यानं मला कडिलाकडे आणून सोडलं.

श्री. कडिले हे धानोऱ्याचे ग्रामसेवक. त्यांच्याविषयी खूप ऐकलं होतं धानोऱ्यात पोचण्यापूर्वीच. नगर कॉलेजच्या डॉ. हळवे, पवार आदींकडून दीनदयाळ शोध संस्थानच्या के. डी. जोशींकडून त्यांनी सांगितलं त्याचे प्रत्यंतरही आले. हा ग्रामसेवक खऱ्या अर्थानं ग्रामसेवकाचं काम करीत आहे. गावातल्या प्रत्येकाला त्याची माहिती आहे. अगदी खडा न् खडा. गावात वेगवेगळे प्रयोग व्हावेत म्हणून, गाव सुधारावं म्हणून श्री. कडिले धडपडत असतात...


**आपल्या घरात असलीच पाहिजेत**
**अशी डॉ. पां. ह. कुलकर्णी**
**यांची पुस्तके.**

| | |
|---|---|
| **१. खा । प्या । बरे व्हा !** | रु. दहा |
| **२. घरातली औषधे तिसरी आवृत्ती** | रु. सहा |
| **३. गुणकारी औषधे** | रु. दहा |
| **४. आयुर्वेदीय उपचार** | रु. दहा |

**सागर प्रकाशन**
१२९३ सदाशिव पेठ
पुणे – ४११ ०३०



त्यांच्याशी बोलताना, इतरांशी गप्पा मारतानाच नगरच्या मिशन कॉलेजतर्फे चाललेल्या प्रयोगाची माहिती मला मिळाली. इथे पिण्याचे पाणी व शेतीसुधार हे दोन महत्त्वाचे प्रयत्न झाले पाहिजेत असे त्यांचे मत. त्या अनुषंगाने त्यांनी धानोऱ्याला 'कॉम्युनिटी' विहिरींचा व त्या विहिरींवर 'लिफ्ट इरिगेशन' (उपसा सिंचन) चा प्रयोग आरंभला आहे. सदतीस गावकऱ्यांची दीडशे एकर जमीन त्यामुळे हरित व्हायची आशा त्यांना वाटते आहे. ह्या सदतीस जणांची एक सहकारी संस्था स्थापन झाली आहे. त्यांना आर्थिक सहकार्य मिळावं म्हणून सेंट्रल बँकेची एक शाखाही ह्या मिशन कॉलेजच्या प्रयत्नांनी धानोऱ्यात सुरू झाली आहे. 'सी. एस. आर. डी.' (सेंटर फॉर स्टडीज इन रूरल डेव्हलपमेंट) ह्या कॉलेजच्याच एका विभागातर्फे हे काम चालू आहे. त्यासाठी स्वतःचा काही निधी ह्या बँकेत गुंतवून ही शाखा कॉलेजनं धानोऱ्यात आणली. '...पण असं असूनही बँक शेतकऱ्यांना फार त्रास देत आहे. पैसा वेळेवर मिळाला नाही तर काय फायदा? हजारो कागदपत्र, हजारो नियम...शासनाच्या योजना खूप आहेत; पण त्यांचा उपयोग मात्र होत नाही नियमांच्या घोळामुळे...' धानोऱ्यात इतरांनीही अशाच तक्रारी केल्या; पण मिशन कॉलेजच्या प्रयोगाबद्दल मात्र सगळेच उत्साही वाटले. 'साधारणपणे पुढचा मोसम आम्हाला शेतीला चांगला ठरेल असे वाटते. विहिरीला मोप पाणी आहे. मोटर बी बसली आहे...' एकदा हे काम पूर्ण झालं की शेतीचे विविध प्रयोग ह्या शेतांवर सुरू व्हायचे आहेत. अर्थातच सी. एस. आर. डी. च्या मार्गदर्शनाखाली. नंतर शेतकऱ्यांना पूरक जोडधंदे द्यायचे आहेत बँकेचा आधार घेऊन. गावात गावकऱ्यांच्या मदतीनं पाणीयोजना पूर्ण करण्याचं काम चालू आहे...'

थोडक्यात ह्या मंडळींनी हे गावच दत्तक घेतलं आहे म्हणा ना. चौदाशे–पंधराशे वस्तीचं ... इथून जवळच आंभोरा गाव आहे. तिथेही हाच प्रयोग मिशन कॉलेज करू पाहात आहे ...

धानोऱ्यातच अलीकडे दीनदयाळ शोध संस्थेतर्फे मोफत दंतचिकित्सा शिबिर भरवले गेले. बोबत वैद्यकीय कँपही. ही संस्थाही प्रामुख्याने ह्या परिसरात म्हणजे आष्टी व पाटोदा तालुक्यातच आपलं लक्ष केन्द्रित करीत आहे. ह्या संघटनेनं आपलं पहिलं वैद्यकीय शिबिर भरवलं 'रायमोह'ला. पाटोदा तालुक्यातील डोंगराळ भागातल्या छोट्याशा गावी. पुढची शिबिरंही ह्याच भागात आहेत. कडा, आष्टी, वडगावदौला, करंजवणे वगैरे ठिकाणी. ह्या संस्थेच्याही कार्यक्रमात आरोग्यसंवर्धनाबरोबरच पाणीपुरवठा, शेती ह्या कार्यक्रमांनाही अग्रक्रम देण्यात आला आहे आणि किमान पहिली दोन वर्षे तरी सर्व शक्ती ह्या आष्टी–पाटोदा तालुक्यांतच लावायची असा त्यांचा संकल्प आहे.

बीड जिल्ह्यात त्यातल्या त्यात जास्त मागासलेले तालुके म्हणजे आष्टी आणि पाटोदाच! विकासकार्य करू पाहणाऱ्या या दोन संस्थांनी त्यामुळे हेच दोन तालुके नेमके उचलावे हे तर्कसंगतच आहे. शासकीय संस्थांची काम करण्याची पद्धत ह्याच्या नेमकी उलटी. जिथे काही सोयी–सवलती उपलब्ध आहेत, दळणवळणाची साधने आहेत, पाणी मुबलक आहे, विकसित भागाशी संपर्क ठेवायला सोयीचे आहेत, अशीच 'ग्रोथ सेंटर्स' ह्या संस्था निवडून काढते. त्यामुळे 'वर' आकडेवारी दाखवून शासकीय संस्था किती उत्तम काम करते हे सिद्ध करून दाखवता येते. त्यामुळेच एम्. आय. डी. सी सिकॉम, कृषि उद्योग विकास महामंडळ, लघुउद्योग विकास महामंडळ वगैरे संस्थांनी बीडकडे तसं दुर्लक्षच केलं. मुंबई उद्योगांनी तुडुंब भरल्यावर तळोजा, तारापूरला आपोआप लोक येतील हे जाणून सिकॉमनं ते परिसर 'विकसित' (?) केले. तसंच नगर, नाशिक, औरंगाबाद, जळगावचं! जे सिकॉमचं तेच बाकीच्या शासकीय, निमशासकीय संस्थांचं आणि खुद्द शासनाचंही; पण दीनदयाळ शोध संस्थान किंवा नगर मिशन कॉलेज किंवा आंबेजोगाईची मानवलोकसंघटना अशा स्वयंसेवी सेवाभावी संस्थांना अशा गोष्टींचं देणंघेणं नसावं. ते तसं नाही हेच जणू बीड जिल्हा व त्यातही आष्टी-पाटोदा तालुके निवडून ह्या संघटनांनी दाखवून दिलेलं आहे. त्याचप्रमाणे निव्वळ औद्योगिक वा निव्वळ आर्थिक वा शेतीविषयक विकास एवढाच मर्यादित कार्यक्रमही ह्या संस्थांपुढे नाही तर परिसराच्या सर्वांगीण विकासाचा चंग ह्या संस्थांनी बांधलेला आहे. तो देखील इथल्या जनतेला ह्या विकासकार्यक्रमात संपूर्ण सहभागी करून घेऊन, त्यांच्याच मदतीने!

हे घडत असताना, वर म्हटल्याप्रमाणे जसा बँकेचा अनुभव ह्या

संस्थांना आला तसाच तो शासकीय–निमशासकीय महामंडळाचाही येणारच. सुदैवाने, तसा अनुभव निदान दीनदयाळच्या कार्यकर्त्यांना अजून तरी आलेला नाही. उलट त्यांच्या वैद्यकीय शिबिरांना शासनाच्या विविध यंत्रणांकडून सहकार्यच मिळालं. तर पुढे-मागे येऊ शकणाऱ्या लघुउद्योगांना (म्हणजे संस्थेनं शिफारस केलेल्या लघु-कुटीरोद्योगांना) सहकार्याचा हात महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळानं देऊ केलेला आहे. आष्टी–कडा–पाटोद्याचे सरपंच, स्थानिक आमदार, वेगवेगळ्या सरकारी दवाखान्यांचे डॉक्टर्स व खुद्द कलेक्टर श्री. संदीप बागची ह्यांनी भरघोस सहकार्याचं आश्वासन दिलेलं आहे. अर्थात ही शासकीय आश्वासनं आहेत. पूर्ण होतीलच असं जरी नसलं तरी संस्थेनं अंगीकारलेल्या कामात अडथळे तरी ही मंडळी आणणार नाहीत असं गृहीत धरायला हरकत नाही. निदान तसा आतापर्यंतचा तरी अनुभव ह्या दीनदयाळवाल्यांचा आहे. मिशन कॉलेजवाल्यांचा आहे.

पण इथे भेडसावतो आहे तो एक दुसराच अडथळा. तो म्हणजे राजकीय. क्वचित कुठे धार्मिकही. दीनदयाळ शोध संस्थान हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचं अपत्य. बीड जिल्ह्यात हिंडता संघवाले हे कुठेही लपवत नाही आणि त्याचबरोबर हेही स्पष्ट करतात की, संपूर्णपणे राजकारणविरहित असं हे काम आहे. ह्या विकासकार्यक्रमात राजकारण आम्हाला कुठेही आणायचं नाही. स्वार्थ असा आमचा काहीही नाही किंवा हिंदूंचाच विकास असलाही दृष्टिकोन नाही. येईल त्या सर्वांना बरोबर घेऊन संपूर्ण परिसर आम्हाला बदलून टाकायचा आहे. लोकांचं जिणं सुसह्य करायचं आहे. त्यांची आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक पातळी उंचायची आहे. त्यांचं आरोग्य सुधारावयाचं आहे; पण काही लोकांना ते पटत नाही. संघवाले येऊन इथे काम करणार आणि त्यात कसलंही राजकारण नाही हे काही राजकीय मंडळींना पटतच नाही. दीनदयाळ संस्थेमार्फत रायमोहला एक आणि धानोऱ्याला दुसरा असे दोन मेडिकल कँपस झाले. हे कॅम्पस् कल्पनेबाहेर यशस्वी झाले. सिव्हिल सर्जन्स, सरकारी अधिकारी ह्यांनी ह्या शिबिरांचं मुक्तपणे कौतुक केलं. त्यांना सहकार्य दिलं. औषधं पुरविली; पण दोन्ही ठिकाणी स्थानिक व जिल्हा पातळीवरच्या कम्युनिस्टांनी ह्या शिबिरांना विरोध केला. छोटे छोटे मेळावे भरवून संघवाल्यांचे (अर्धी चड्डीवाल्यांचे) हे राजकीय चाळे आहेत, त्यापासून लांब राहा असा प्रचार केला. इंदिरा काँग्रेस कार्यकर्त्यांनीही अशाच सांशकतेनं बघितलं.


**Perfect Industries**

**Mfrs. of Automobile Accessories**

37/2C, Shankarshet Road
PUNE 411 037

*Branches at :* **Bangalore, Indore, Ahmedabad, Raipur**


पाटोद्याला एक काँग्रेस (आय) कार्यकर्ते भेटले. श्री. नागरगोजे. पाटोद्यातली वजनदार असामी. त्यांनी संघवाल्यांना सरळ ठोकूनच काढलं. संघवाल्यांचे हे उद्योग म्हणजे सरळ सरळ राजकारण आहे. आज ना उद्या ते ह्या उद्योगांच्या आधारावर जनसंघवाले निवडणुकीसाठी पुढे आणणार, मतं मागणार! ह्यात राजकारणाचा काही संबंध नाही असं सांगितल्यावर त्यांनी ताडकन् मला आणि पाटोद्याच्याच डॉ. जैन ह्यांना वेड्यातच काढलं... हे चक्क मिशनऱ्यांसारखे आहेत बघा. हळूहळू यायचं, बोलायचं. काही काही सांगायचं. थोडं काही द्यायचं आणि बाटवून टाकायचं. ह्यांना कोणी फसणार नाही आणि स्पष्टच सांगतो, ह्यांनी जर आमच्या वर्चस्वाखालील गावांमध्ये स्वतःचं प्रस्थ वाढवायचा प्रयत्न केला तर आम्ही त्यांना आडवे जाणार. भले मग त्यांना कितीही चांगलं काम करू देत! आमच्या आडवे आले तर आम्हाला त्यांची खच्ची करायला कितीसा वेळ लागणार? हे संघवाले यशस्वी होणं शक्य नाही... पाटोद्यात जे नागरगोजे ह्यांनी ऐकवलं तेच आष्टीत ऐकायला मिळालं, कड्याला ऐकायला मिळालं आणि बीडमधल्या काँग्रेसवाल्यांच्या व कम्युनिस्टांच्या कार्यालयातही जाणवलं.

आष्टी-बीडमधल्या आमदारांनी स्वतः मात्र राजकारणापासून अलिप्त राहून संघाच्या लोकांनी हे काम केलं तर लोकांचं सहकार्य निश्चित मिळेल असं सांगितलं; पण खाजगीत तेही म्हणे असाच सल्ला आपल्या कार्यकर्त्यांना देतात की, आपल्या आसनाला धोका असेल चड्डीवाल्यांमुळे तर बिनधास्त ठोकून काढा!

संघ हा सगळ्या परिसरात ब्राह्मण–मारवाड्यांचा पक्ष म्हणून ओळखला जातो. ह्या दोन जमातींची माणसंही बहुतेक सर्व गावातनं एका बाजूला राहात असलेली आढळतील तर बहुजनसमाज दुसरीकडे. ब्राह्मण–मारवाडी, व विशेषतः मारवाडी समाजाकडे ह्या परिसरातल्या आर्थिक नाड्या आजही आहेत, त्यामुळे साहजिकच कुठे ह्या लोकांविषयी भीतियुक्त आदर असला तरी सर्वत्र त्यांच्याविषयी सुप्त रागच आहे. संघ आणि त्याच्या कामाला विरोध ह्यातूनही उभा राहतो हेही इथे लक्षात घ्यायला पाहिजे. संघाची शिस्त, कार्यपद्धती लोकांना आवडते. त्यांचा राष्ट्रवादही, त्यांच्या निष्ठाही त्यांना पटतात. त्यांचे विचारही त्यांना कळतात; पण तरीही संघ म्हणजे चड्डीवाली, ब्राह्मणा–मारवाड्यांची पोरं ह्याही विचार मनात पक्का ठाण मांडून बसलेला दिसतो. व त्यातूनच संघाला सर्वसामान्य जनतेचा

विरोध दिसतो. कॉंग्रेसी कळपातली मंडळी त्यामुळेच, जनतेच्या रोषाचा फायदा उचलून संघावर तुटून पडतात, कम्युनिस्ट मंडळी किंवा शेकापवाले मात्र तत्त्व म्हणून, संघ–जनसंघ ह्यावर खवळून उठतात.

कम्युनिस्ट आणि शेकाप ह्या दोन्ही पक्षांची ताकद तशी बीड जिल्ह्यात नाममात्र आहे; पण दोन्ही पक्षात, दुसऱ्यांना उपद्रव देण्याची क्षमता मात्र जरूर आहे. कॉंग्रेस पक्षाचं तसं नाही' हा पक्ष तसा भक्कमपणे पाय रोवून उभा आहे असंही अर्थात म्हणता यायचं नाही. वंजारी आणि मराठवाडा ह्या दोन समाजांचं ह्या पक्षावर वर्चस्व आहे. ह्यातलेच क्षीरसागर, कदम, जगताप वगैरे गट जिल्ह्यात प्रभावी आहेत. आणि त्यांची रस्सीखेच सुरू असते, हेच ह्या जिल्ह्यातलं खरंखुरं राजकारण! हे गट कुठल्या पक्षात आहेत त्या पक्षाचा इथे प्रभाव असतो. आणि असा पक्ष साधारणतः सत्ताधारी पक्ष असतो एवढंच. त्यामुळे आज हे सर्व गट, इंदिरा कॉंग्रेस पक्षात 'विलीन' झाले आहेत.

बीड जिल्ह्याच्या दारिद्र्याबरोबरच्याच इतर काही वैशिष्ट्यांचाही समावेश केला पाहिजे. १९८० साली विधानसभेच्या निवडणुका झाल्या. संपूर्ण महाराष्ट्रात इंदिरा कॉंग्रेसनं झंझावाती यश मिळवलं. बारामतीसारख्या ठिकाणीही, शरद पवारांच्या बालेकिल्ल्यातही इंदिरा कॉंग्रेसचा शंभर टक्के पराभव झाला नाही; पण बीड जिल्ह्यात ते घडलं! आंबेजोगाई सोडलं तर सर्व जिल्ह्यात शरद कॉंग्रेसचे उमेदवार निवडून आले. आंबेजोगाईत भाजपचे उमेदवार निवडून आले. इंदिरा कॉंग्रेसला एकही जागा बीड जिल्ह्यात जिंकता आली नाही; पण गंमत ही की, आंबेजोगाईचा अपवाद सोडला तर जिल्ह्यातले सगळे आमदार आज इंदिरा कॉंग्रेसचे आहेत. ह्याचा अर्थ हे सगळे आमदार मनापासून कॉंग्रेस (आय) मध्ये गेले असा नाही नाही. प्रथम एकानं सोय म्हणून इंदिरावासी व्हायचं ठरवलं तर त्याला तोड म्हणून दुसऱ्या गटाचे आमदार 'स्वगृही' परतले. थोडक्यात पक्षाचं सोयरसुतक तसं फारसं नाही ह्या मंडळींना. स्वारस्य आहे ते आपापल्या भागात आपापल्या गटाचं वर्चस्व टिकवण्याचं. तेवढ्यापुरतंच इथलं राजकारण मर्यादित आहे. काहीसं डबक्यातलं म्हटलं तरी चालेल. साहजिकच प्रादेशिक विकास, समग्र क्रांती वगैरे विषय ह्या मंडळींच्या राजकारणापलीकडचे आहेत. त्यामुळेच असे उद्योग इतर कुणी केले तर त्याला त्यांची फारशी हरकत असत नाही. फक्त त्यांच्या गटाची 'पॉवर' जर ह्या दुसऱ्यांच्या उद्योगांमुळे कमी होणार असेल तर ते त्यांना खपणार नाही. आणि नेमका हाच संशय संघवाल्यांविषयी, त्यांच्या दीनदयाळविषयी ह्या लोकांच्या मनात निर्माण झाला आहे.

भाजपवाल्यांचा प्रभाव तसा जिल्ह्यात फारसा कुठे नाही. आंबेजोगाईचा परिसर सोडला तर पण संघाच्या शाखा जिल्ह्यात सर्वत्र भरतात. त्यामुळेच भाजपचा प्रभाव वाढवण्यासाठी स्वयंसेवकांना हाताशी धरून हे उद्योग संघानं चालवले आहेत असा त्यांचा प्रामाणिक समज झालेला आहे. त्यात ह्या संघवाल्यांना सरकारी अधिकारी पाठिंबा देतात हेही त्यांना रुचत नाही. कलेक्टरपासून सर्व अधिकाऱ्यांवर हे संघवाले प्रभाव पाडतात. त्यांच्यावर दबाव आणून शासनातर्फेच कामं करवून घेतात. व पुन्हा स्वतः काही न करता 'क्रेडिट' पण उकळतात, हा कॉंग्रेसवाल्यांचा दुसरा दावा आणि हे दावे करत असतानाच असे सगळे चड्डीवाल्यांचे प्रयत्न हाणून पाडण्याचा चंगही त्यांनी बांधला असल्याचं पुन्हा पुन्हा सांगतात...

दलित समाजही बीड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर आहे; पण तो तितकासा संघटित नाही. 'दलित पँथर्स'च्या झेंड्याखाली तो हळूहळू एकत्रित येऊ पाहात आहे. संघावर ब्राह्मण–मारवाड्यांचा पक्ष असा शिक्का असल्याने तोही ह्या चळवळीकडे साशंकतेनं पाहतो आहे. त्या समाजाविषयी एक मात्र आहे. कॉंग्रेसविषयी त्यांचा भ्रमनिरास झाला आहे. त्यामुळे तो समाज दुसरीकडे आशास्थान शोधतो आहे. वृत्तपत्रातनं जाणवून दिलं जातं तेवढ्याच सवंगपणे धर्मांतरासाठी तसा तो उत्सुक नाही हे सत्य आहे. त्यामुळे संघवाल्यांच्या प्रयत्नांकडे तो औत्सुक्यानं पाहतो. त्याला खात्री पटली की इथे आपल्यालाही इतरांच्या बरोबरीनं माणुसकीनं वागवलं जात आहे, आपला फायदा सर्वांबरोबर होत आहे तर तो समाज संघाच्या कार्यालाही पाठिंबा देईल. त्यांना कशी वागणूक मिळते ह्यावर बरचसं अवलंबून आहे. त्यांनाही फार मोठ्या राजकीय महत्त्वाकांक्षा नाहीत; पण जीवन सुधारण्याची जाण त्यांना नक्की आली आहे. बहुजनसमाज व उच्चवर्णीय ह्यांचेकडून होणाऱ्या अन्यायाची चीडही त्यांच्या मनात आहे आणि म्हणूनच त्यांना समजावून घेऊन, बरोबरीच्या नात्यानं कार्यक्रमात सामावून घ्यायचा प्रयत्न केला गेला तर कार्यक्रम यशस्वी व्हायला गती मिळू शकेल. चांगली व विधायक !


*With Best Compliments :*

**M/s. CERAMIKA**

21, Gultekdi Industrial Estate
PUNE–411 037

पण ह्याहीपेक्षा मोठं आव्हान ह्या चळवळीला स्वीकारावं लागणार आहे ते अल्पसंख्य जमातींकडून. विशेषत: मुसलमान समाजाकडून. पूर्वी निझामशाहीत राहिल्याने मुस्लिम–वस्ती मराठवाडाभर भरपूर आहे. तशी ती बीड जिल्ह्यातही आहे. आष्टीत कमी; पण पाटोद्यात त्यांची संख्या भरपूर आहे पाटोद्यातले शेखसाहेब सहजी मला सांगून गेले, 'वो नानाजी इधर आके गये। अब वो सारे बम्मन गावो-गावोमें जा कर काम करने वाले है। काम काय के करते जी, ये तो साले हमकोच खतम करनेके लिये काम करेंगे जी !' एका सर्वसामान्य मुसलमानाची ही प्रतिक्रिया. तो कुणीही पुढारी नाही, नेता नाही. त्यांची प्रतिक्रिया तर ह्याहीपेक्षा कडवी असणार ! एकूणच राजकीय परिस्थिती देशभर अशी आहे की, मुसलमान आणि संघवाले कधीच एकमेकांकडे शुद्ध नजरेनं बघू शकणार नाहीत, ही आज पिढयान् पिढयांची दोन्ही समाजाला मिळालेली शिकवण आहे. त्यात आसामच्या जखमा ताज्या आहेत. बांगला देशाच्या मुसलमानांनी आसाम पादक्रांत केल्याने तिथे समस्या निर्माण झाली आहे असा संघवाल्यांचा आग्रह आहे, तर संघाच्या चिथावणीतून हिंदू जातीयवाद्यांनी मुसलमानांची आसामात कत्तल चालवली आहे, ते हिंदुस्थानातून मुसलमानांना हुसकावून लावायला बघत आहेत असा समज मुस्लिम समाजाचा झालेला आहे राजकीय स्वार्थासाठी संघ–जनसंघाला झोडपून काढून मुस्लिम मतं आपल्याकडे खेचण्यासाठी सत्ताधारीही असल्या प्रचाराला खतपाणी घालत असतात राष्ट्रीय पातळीवर जे घडतं त्याला बीड जिल्हाही अपवाद नाही. मुस्लिमलीग किंवा जमाते इस्लामी इथे फारसे प्रभावी नाहीत; पण काँग्रेसचे विविध गटच ह्या समाजाच्या धार्मिक भावनांना मधून मधून भडकावीत असतात. आपापल्या गटाकडे त्यांना आकर्षित करण्यासाठी. गटाशी त्यांची बांधिलकी शाबूत ठेवण्यासाठी. कारण ती एकगठ्ठा मतं केव्हाही उपयोगी पडू शकतात ! मुसलमानांच्या मनातल्या संशयाला फुत्कारण्याचं काम मुस्लिम पुढाऱ्यांपेक्षाही काँग्रेसवाले पुढे सरसावून केव्हाही करू शकतात. संघवाल्यांचा प्रभाव, त्यातून भाजपची मांड असा संशय जर काँग्रेसवाल्यांमध्ये बळावला तर ह्या प्रयत्नांविरुद्ध मुस्लिम समाजाला चिथवायला काँग्रेसवालेच आधी पुढे सरसावतील. मुस्लिम-नेते नंतर ! आणि हाच मोठा धोका आज इथे संभवतो.

**Kiran Products**

Manufacturers

Importers

Exporters

*Regd. Office :*

427/A–2, Gultekdi Industrial Estate

Poona 411 037 ( India )

Tel.–44 06 55 Gram–KIPRO

दीनदयाळप्रमाणेच नगरच्या मिशन कॉलेजलाही हा धोका आहेच. कारण आज जामखेडच्या आरोळे दांपत्याच्या कार्याविषयीही संशयाची पाल लोकांच्या मनात चुकचुकू लागली आहे. 'म्हणूनच त्यांना काय किंवा अगर कॉलेजच्या लोकांना काय आम्ही कुडयात बोलवत नाही !' असं सांगून तिथले वयोवृद्ध माजी सरपंच श्री. पाटील पुढे म्हणाले, '...त्यांचं काम चांगलं आहे हे आम्हालाही माहीत आहे; पण त्यातून ख्रिश्चन धर्मप्रसार होणार असेल तर ते विष मुद्दाम का प्राशन करा ..?' तर पाटोद्यातल्या एका काँग्रेसवासी ग्रामपंचायत सदस्याच्या मते, ' ..ह्यातूनही काही वेगळे गट प्रभावी झाले तर आमच्या सत्तेलाच सुरुंग लागण्याची शक्यता आहे ..!' दीनदयाळ-इतका कडवा विरोध मात्र नगर कॉलेजच्या मंडळींना मला आढळून आला नाही.

ह्या राजकीय–धार्मिक विरोधाला कसं तोंड द्यायचं हे ह्या संस्थांना ठरवावं लागणार आहे. सर्वांना विश्वासात घ्यावयासाठी काय करायचं तेही बघावं लागणार आहे. दीनदयाळच्या श्री. कृष्णा जोशींशी बोलताना त्यांना ह्या विरोधाची जाणीव आहे असं आढळलं. त्यावर त्यांची काही उत्तरंही आहेत. कामातनंच विश्वास निर्माण होईल. तसा अनुभव गोंडयाला, सुंदरबनला आला आहे असं ते म्हणतात. त्यांचा आशावाद खरा ठरो एवढंच म्हणावंसंही वाटत !

एक गोष्ट मात्र इथे आवर्जून सांगावीशी वाटते. दीनदयाळी संघाची संस्था, नगर कॉलेज मिशनचं. दोघेही सेवाभावी वृत्तीनं बीड जिल्ह्यात येत आहेत. त्यांचे कार्यक्रमही बरेचसे एकसारखेच आहेत नि तरीही त्यांचा आपापसात तणाव आहे असं कुठेही जाणवलं नाही. उलट एकमेकांच्या कार्यक्रमांना सहकार्य करण्याचीच भाषा दोघांनीही बोलून दाखवली, हे निश्चितच सुचिन्ह आहे !

धानोरा–अंभोरा – वडगावदौला–साहेबडगाव–करंजवणे–आष्टी–पाटोदा–रायमोह–नागथळा–डोमरी... आष्टी–पाटोदा तालुक्यातनं मी हिंडत होतो. आज इथे, उद्या तिथे. कुठे एस्टीनं, कुठे बैलगाडीतनं, कुठे एखाद्या कार्यकर्त्याच्या मोटरसायकलीवरनं तर कुठे चक्क पायी! रात्री उघड्यावर गावातल्या कार्यकर्त्यांबरोबर पथाऱ्या टाकून गप्पा मारीत काढत होतो. झोपताना निरभ्र आकाशाकडे बघत. मुंबईत हे सुख तरी कुठे मिळतं ? चांदण्या निरखताना, नव्यानं जोडलेल्या मित्रांशी गप्पा मारताना नवनवीन माहिती मनात गोळा होत होती बीड जिल्ह्याविषयी. तिथे होऊ घातलेल्या समाजपरिवर्तनाच्या कामाविषयी. जिल्ह्यातल्या सद्य:स्थितीविषयी. राजकारणाविषयी. त्यातनंच परिवर्तनाचं काम सोपं नाही असं वारंवार मनाला जाणवत होतं...दोन्ही तालुके मनसोक्त भटकून बीडला प्रस्थान ठेवताना हेच विचार मनात घोळत होते...परिवर्तन, विकासकार्य सोपं नाही... अनेक अडचणी आहेत ! (क्रमश:)

# मते आणि मतांतरे

### अनुभव...

राजकीय–धार्मिक विरोधाचा तुम्ही प्रश्न काढला. मोठाले उद्योग-धंदे तिथे नेऊन विकास व्हावा असे म्हणणाऱ्यांचा आम्हाला विरोध आहे हेही मला माहीत आहे. हे विरोध होणार नाहीत असं मी म्हणत नाही. किंबहुना ते होणारच. त्यामुळे मुळातच बोडमध्ये विकासकार्य अवघड आहे, ते अधिक आव्हानात्मक होणार ! हा चॅलेंज आहे ! अडचणींची ही जाण आम्हालाही आहे; पण गोंडा, सिंगभूमचा अनुभव सांगतो की, खऱ्या निःस्वार्थ भूमिकेतून काम केलं तर ह्या अडचणींतूनही मार्ग निघू शकतो !

गोंडामध्ये कामाला सुरुवात केली तेव्हा एका आय काँग्रेस खासदारांचा नानाजींच्या कार्याला कडवा विरोध होता. त्यातून हे खासदार मुसलमान. नानाजींच्या कार्याला विरोध करण्याची कुठलीही संधी त्यांनी वाया दवडली नाही; पण काळ जाऊ लागला. काम होत राहिलं. सुरुवातीला विरोध कमी होऊ लागला. नंतर ह्या खासदारांनी नानाजींची मुद्दाम भेट घेऊन सर्व कार्य पाहिलं. नानाजी, आम्ही सर्व कार्यकर्ते, काही सरदारजी, हे मुस्लिम खासदार सर्वांच्या मांडीला मांडी लावून एकत्र जेवणं झाली. आज ह्या खासदारांनी नानाजींनी सुरू केलेल्या कामात भाग घ्यायचं ठरवलं आहे !!

सिंगभूमचा अनुभव तर आणखी वेगळा. एक आय कॅंप तिथल्या एका खेड्यात घेतला होता. त्यात एका लहानपणापासून अंधत्व आलेल्या मुलीच्या डोळ्यांवर शस्त्रक्रिया करण्यात आली. शस्त्रक्रिया यशस्वी झाली. मुलीला दृष्टी प्राप्त झाली. संपूर्ण गावात जल्लोष उसळला. हे गाव तसे शंभर टक्के ख्रिस्ती; पण त्या जल्लोषात त्यांनी मुलीच्या डोळ्यांवरची पट्टी काढणाऱ्याची वाजत–गाजत वरात काढली. दीनदयाळजींच्या फोटोपुढे हिंदू पद्धतीने पूजाअर्चा केली. नंतर एका चांगल्या मुहूर्तावर संपूर्ण गाव, कुठलीही प्रलोभनं-धाकदपटशा नसताना हिंदू झाला. आज त्या गावातनं आमच्या कार्याला चांगला प्रतिसाद मिळतो आहे...

मोठे उद्योगधंदे आणायचा ज्यांना प्रयत्न करायचा आहे, त्यांनी तो अवश्य करावा. ह्या दोन विचारसरणींमध्ये खरं तर संघर्ष असण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. दोन्ही एकसाथ अवश्य राबवल्या जाऊ शकतात. गोंडा जिल्ह्यात कामाला सुरुवात केली तेव्हा तिथेही चार–पाच सहकारी साखरकारखाने होतेच की ! ...

पण तरीही मनापासून मला मात्र असे वाटते की, जडोद्योगीकरणापेक्षा, आपली आर्थिक कुवत, सामाजिक परिस्थिती, नैतिक आचार-विचार, संस्कृती, वैचारिक कुवत ह्या सगळ्याचा विचार करता ग्रामोद्योग–अन्त्योदय योजनांतून आपल्या खेड्यांचा विकास होऊ शकतो. नाही तर नुसत्याच शहरीकरणाला व त्याबरोबर बकाल संस्कृतीलाच आमंत्रण दिल्यासारखं होईल...

**श्री. के. डी. जोशींबरोबरच्या गप्पांमधून**

¤

### कोर्टाची पायरी न चढलेले गाव

दीनदयाळ शोध संस्थेनं सर्वांगीण विकासासाठी निवडलेले बीड जिल्ह्यातलं पहिलं खेडं आहे–पाटोदा तालुक्यातील करंजवणे ! पाटोद्यापासून १८ कि. मीटर

करंजवणे एका अर्थी वैशिष्ट्यपूर्ण खेडं आहे. त्या वैशिष्ट्यामुळेच हे गाव दीनदयाळ संस्थेने निवडले असे म्हणतात. अर्थात त्या ठिकाणी नगरच्या 'अॅफ्रो' संस्थेने पाण्याचा शोध घेतला आणि संस्थेच्या नशिबानं तिथं पाणीही लागले, हाही महत्त्वाचा मुद्दा आहे; पण तो नंतरचा !

पण इथली खास वैशिष्टचे मात्र वेगळी आहेत !

सात–आठशे वस्तीचे हे छोटेसे खेडे. मुख्य रस्त्यापासून दोन मैल आत. गावात जायला एक कच्ची सडक फक्त. शेती हा गावाचा मुख्य उद्योग; पण पाण्याअभावी शेतीचे उत्पन्न तोकडेच. बाकी उद्योग असे काही नाहीतच. बैलगाड्या अर्थात आहेतच.

इथले सरपंच खूप प्रभावी आहेत. सारा गाव त्यांना मानतो. त्यांचा शब्द राखतो. कदाचित त्यामुळेच असेल; पण ह्या गावा-


Special Summer Vacation
Beauty Course & Slimming Course !

*Few Admission available*
*Become a Beautician*

**Figurel Beauty Parlour**

J. M. Road, Poona–5

*Phone : 57090, 53791*

तले एकही भांडण कोर्टापर्यंत जात नाही. गावकीतच निकाल होतो न् तो बिनतक्रार मानला जातो. कोर्टाची पायरी ह्या गावातलं कुणी चढलेलेच नाही म्हणे !

ह्या गावात दारूलाही कुणी शिवत नाही हे या गावाचे दुसरे वैशिष्टच ! दारूचा एकही गुत्ता नाही. दारू पिणेही नाही. उलट गावच्या डोंगरेश्वरमंदिरात सतत भजने, कीर्तने, जप चालू असतात म्हणे !

ह्याच वैशिष्टचामुळे संस्थेने हे गाव निवडले असावे आणि त्याला प्रतिसादही लगेच मिळाला. सरपंचांनी सक्रिय सहकार्य तर दिलेच; पण गावकरीही कार्यक्रमात सहभागी झाले. पाणी लागण्याची शक्यता निर्माण होताच गावातले सर्व सक्षम तरुण डोंगरेश्वराची पूजा करून विहीर खाणायला पुढे आले...मुख्य रस्त्यापासून गावापर्यंत रस्ता पक्का करायचा व त्याच्या दुतर्फा झाडे लावायचा संकल्पही त्यांनी लगेच सोडला.

ह्याच खेडचात त्यामुळे अनेक कामे संस्था हातात घेत आहे. विहीर व पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, उपसा जलसिंचन (लघु-सिंचन), रस्ता, झाडे आणि लघुउद्योग, गोबरगॅसही. दहा–बारा तरुण ग्रामोद्योगासाठी इथे आले आहेत आणि पॉलिवस्त्र, खडू वगैरेसारखे ग्रामोद्योग वर्षभरात ह्या गावात निघण्याची शक्यता आहे !

¤

## एक लाख झाडं

श्री. नाना मुंगीकर, आष्टी. जंगलखात्यातून मुदतपूर्व सेवानिवृत्ती स्वेच्छया स्वीकारून बाहेर पडलेले. आष्टीत शेती करण्याची जिद्द उरी बाळगून. स्वतंत्र व्यवसायात स्थिर व्हायची आकांक्षा बाळगून हॉटेलचा व्यवसाय त्यांनी प्रथम केला. शेती अर्थातच एकीकडे कसायलाही सुरुवात केली. जोडीला दुधाचाही व्यवसाय केला.

अशा नानांना संघाने हाताशी धरले. त्यांचा अनुभव लक्षात घेऊन सामाजिक वनीकरण त्यांच्याकडे सोपवले. जंगलखात्याचे विविध अधिकारी व इतर ग्रामस्थ ह्यांच्या मदतीने ते हा प्रकल्प राबवणार आहेत. सुबाभूळ, बाभळी, साग, लिंबोणी, घायपात अशा अनेक उपयोगी पण कमी पाणी लागणाऱ्या वनस्पतींची लागवड त्यांच्या डोळ्यांसमोर. किमान एक लाख झाडं ह्या मोसमातच लावायचा त्यांचा मानस आहे......

रात्रीच्या आष्टीतल्या मुक्कामात त्यांनी एक कल्पना मांडली. विचार करण्याजोगी आहे. विशेषतः पुण्या–मुंबईच्या ग्राहक सहकारी चळवळींनी ह्या सूचनेचा जरूर विचार करावा......

... 'कडा साखरकारखान्यानं; आष्टी–कडा वगैरे भागात जवळजवळ चाळीस ट्रक्स दिलेले आहेत. अर्थात बँकेच्या सहकार्यानं. कारखान्याच्या हमीवर. कारखान्याच्या हंगामात कारखाना ह्या ट्रक-मालकांना काम पुरवील. तेसुद्धा कारखाना व्यवस्थित चालू असेल तेव्हा. कारखान्याच्या चेअरमनसाहेबांचं आजच्या पेपरातलं भाषण तुम्ही वाचलेतच.

'...अशा वेळी आणि हंगाम चालू नसताना हे ट्रक्स निव्वळ उभे तर राहणार नाहीत ना, ह्याची भीती वाटते...

'...इथला शेतकरी तसा गरीबच. सदाचा नाडलेला. त्याचा शेतमाल त्यामुळे सहसा पाडूनच खरीदला जातो. ज्वारी, गहू, बाजरी, कडधान्ये, डाळी इत्यादींची प्रत इथे चांगली असते. तुमच्या पुण्या–मुंबईला ज्या भावांनी हा शेतमाल विकला जातो त्याच्या निम्म्याहूनही कमी किंमत देऊन तो इथे शेतकऱ्याकडून विकत घेतला जातो. कारण शेतकरी नडलेला असतो.

'हा नाडलेला शेतकरी, ट्रक्सवाले आणि पुण्या–मुंबईच्या ग्राहक संघटना ह्यांची सांगड घातली गेली तर मला वाटतं तिघांनाही त्याचा फायदा होईल. शेतकऱ्यांनी आपले धान्य एकत्र करावे. ते ट्रक्सनी ग्राहक संस्थांना थेट पोचवावे. गावातला ठेकेदार, मुंबईचा घाऊक खरेदीदार, इतर मध्यस्थी हे सारे टप्पे वगळून. एलिमिनेट करून. त्यातून शेतकऱ्यांना भाव चांगला मिळेल, ट्रक्सना बारमाह काम मिळेल, ग्राहक सोसायटयांना दलालांपेक्षा कमी भावात चोख माल घरपोच मिळू शकेल......

'पुण्या–मुंबईच्या काही ग्राहक संघटनांचा सहकार असेल तर प्रयोगादाखल आष्टी व लगतच्या काही शेतकऱ्यांचा शेतमाल गोळा करून पाठवायची जबाबदारी माझी......' इति श्री. नाना मुंगीकर.

¤

## अगोदर पाणी

मी बीडमध्ये पोचलो त्या दिवशी त्या शहरात मोठा मोर्चा येणार होता. एप्रिल–मेच्या मध्यावर मी बीडमध्ये होतो. सगळीकडे


C. L. Automobiles Garage

**Cars, Bus, Laxury Bus, Mini Bus, M. S. & Aluminium Body Jeep & Ambulance,**

*** MATADOR BODY**

*** STANDARD JEEP BODY**

*** NEW BODY BUILDERS & REPAIRS**

F–15, M. I. D. C. SHIROLI, KOLHAPUR

*Phone*–2 7 3 2 4

*Office :* Gavat Mandal, Udyam Nagar, Kolhapur.

( Maharashtra )

पाण्याचा खडखडाट होता नि मोर्चाही त्या संबंधातलाच होता. रिकामे हंडे बडवत, 'पाणी, पाणी' ओरडत हा मोर्चा कलेक्टर-कचेरीवर येणार होता.

कलेक्टर श्री. संदीप बागची यांच्याकडे मी असतानाच हा मोर्चा आला. '...आमचे मित्र आले वाटते...' असं म्हणत, संभाषण अर्धवट तोडत कलेक्टरसाहेब उठले. त्यांच्यापाठोपाठ आम्हीही बाहेर आलो.

मोर्चा बऱ्यापैकी मोठा होता नि त्यात स्त्रियांचीही मोठी संख्या होती. त्यांच्या हातात रिकाम्या घागरी होत्या. अनेकींच्या कडेवर तान्ही मुलंही होती...तळपत्या उन्हात मोर्चेकरी घोषणा देत पाण्यासाठी उभे होते......

नंतरच्या चर्चेत, बीडमधल्या वास्तव्यात पाण्याच्या दुर्भिक्षाची चांगलीच जाणीव झाली. खुद्द बीड शहरातही प्यायच्या पाण्याचे अतोनात हाल होते. इतर आंतर्भागांची तर गोष्टच विचारू नका......

'ही सगळ्यात मोठी समस्या आहे–पाणीच नाही, तर बाकीचा विकास कुठला? पाण्याची उपलब्धता व्हावी म्हणून प्रयत्न चालू आहेत; पण मुळात पाऊस नाही. नद्या कोरड्या. विहिरींना पाणी नाही. ह्यावर उपाय शोधला पाहिजे...उद्योजकता, औद्योगिक विकास नंतर येऊ शकेल...' नंतरच्या चर्चेत कलेक्टरसाहेबांचे मनोगत!

□

### अगोदर रेल्वे

'...बीड केंद्रबिंदू समजून ऐंशी मैलांच्या त्रिज्येचं वर्तुळ काढलं तर त्या क्षेत्रात रेल्वेचा एक इंचही तुकडा नाही. मोठमोठ्या शहरांना एकमेकांशी जोडणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाचाही नाही. बीड जिल्ह्याच्या विकासातला हा सर्वांत मोठा अडसर आहे. रेल्वेमार्गांमुळे जा–ये वाढते. दळण-वळण, संपर्क सुधारतो: उद्योगधंद्यांच्या वाढीला मदत होते. शेतीमालाला बाजारपेठा सुलभतेने गाठता येतात......

'मला आठवते त्याप्रमाणे १९४३ साली शाळेत शिकत असताना आमचे एक शिक्षक ही व्यथा मांडायचे. तळमळीने मांडायचे. आज ह्याला बत्तीस वर्षे उलटून गेली आहेत. स्वातंत्र्याला त्यावर पाच वर्षे आणि बीड जिल्ह्यात रेल्वेने परळीला चंचुप्रवेश केलेल्याला (१९२९) पंचावन्न वर्षे! परिस्थितीत ह्या घटकेलादेखील तसूभराचासुद्धा फरक नाही.

'माझे स्वतःचे उद्योग आहेत. वाहतुकीला किती त्रास होतो, त्यामुळे उत्पादित मालावर कशी किंमत चढत जाते ह्याची चांगली जाणीव मला आहे. त्यापायी उद्योगधंद्यांचं कंबरडंच मोडून जातं. मग कुठून इथे उद्योगधंदे वाढावेत? उद्योजकता वाढीला लागावी?'

–श्री. जाहेर पाटील
एक प्रगत उद्योजक, बीड


## दि ठाणे पिपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि. ठाणे

**मुख्य कार्यालय : ९० ब, गोखले रोड, ठाणे– ४००६०२, दूरध्वनी– ५९५१५६**

| | | |
|---|---|---|
| शाखा : | शाखा : | शाखा : |
| सुभाष पथ शाखा | पांचपाखाडी शाखा | नौपाडा शाखा |
| ठाणे– ४००६०१ | ठाणे– ४००६०२ | गोखले पथ, ठाणे– ४००६०२ |
| दूरध्वनी – ५९१६७० | दूरध्वनी – ५०१०१० | दूरध्वनी – ५९५१५६ |

**प्रगतीचे काही बोलके आकडे**

| | |
|---|---|
| (१) वसूल भांडवल | ... रु. ३०,००,०० |
| (२) ठेवी | ... रु. ५८,५००,००० |
| (३) खेळते भांडवल | ... रु. ८,५०,००,००० |
| (४) गंगाजळी व इतर निधी | ... रु. २६,५०,००० |
| (५) भागावर लाभांश | ... रु. १२ टक्के संकल्पित, |

**ठेवीदारांसाठी आकर्षक योजना**

(१) शुभमंगल योजना (२) लक्षाधीश योजना (३) दामदुप्पट योजना (४) अखंड पेन्शन योजना (५) पुनर्गुंतवणूक योजना (६) पेन्शनर्सना त्यांचे पेन्शनची रक्कम प्रत्येक महिन्याच्या एक तारखेला मिळवून देण्याची योजना.

या योजनांच्या तपशीलासाठी आमच्या मुख्य कार्यालयास अथवा नजिकच्या शाखेस भेट द्या. वातानुकूलीत नौपाडा व पांचपाखाडी शाखेत सेफ डिपॉझिट लॉकर्स अल्प भाड्याने मिळू शकतील. कर्ज परतफेड दर महिन्याला वेळचेवेळी करणाऱ्यास व्याजामध्ये एक टक्का सूट दिली जाते.

**संचालक मंडळ**


| | | | |
|---|---|---|---|
| १. श्री. नं. शं. जोशी | ... कार्याध्यक्ष | २. श्री. वि. द. कदम | ...उपकार्याध्यक्ष |
| ३. श्री. राजेंद्र देसाई | ... संचालक | ४. श्री. डी. डी. खळे | ... संचालक |
| ५. श्री. गिरधर पटेल | ... संचालक | ६. श्री. डॉ. चं. म. प्रधान | ... संचालक |
| ७. श्री. ज. प्रा. ठक्कर | ... संचालक | ८. श्री. नरेंद्र बल्लाळ | ... संचालक |

श्री. नं. शं. पांडव – जनरल मॅनेजर

## टायरमधील योग्य हवेच्या दाबाचा व इंधनाच्या बचतीचा संबंध काय ?

निश्चितच आहे !

**नवीन संशोधनाप्रमाणे गरजेपेक्षा ८ पौंड हवेचा दाब कमी असल्यास, आवश्यकतेपेक्षा १०% इंधनाचा खप वाढतो**



' अवन्ती ' पंप नेहमी तुमच्याजवळ असल्यास, तुमच्या वाहनाच्या टायरमधील हवेचा दाब वेळोवेळी तपासून तसेच आवश्यक तेवढी हवा भरून ' इंधनात बचत व टायरच्या आयुष्यात वाढ ', असे दोन्ही फायदे तुम्ही सहजरित्या मिळवू शकता !

## – अ व न्ती पं प –







## अगोदर माणसं

आष्टी-कडा परिसराचे तसे जिव्हाळ्याचे संबंध नगरशी आहेत. जामखेडशी आहेत. आजही आमचे बहुतेक व्यवहार नगरशी चालतात. कदाचित् पूर्वी नगर जिल्ह्यात समाविष्ट असल्याने असेल; पण आजही खूपशा आष्टीकरांना बीड जिल्ह्याशी भावनिकदृष्ट्या एकात्म व्हायला जड जातं.

ह्या सगळ्या आजुबाजूच्या परिसरात 'कडा' परिसर हा तसा पूर्वीपासून सुखी इथल्या कडानदीला बारमाही पाणी असे. अगदी मे महिन्यात देखील. इथे शेतीही बरी होती. शेतांवर बहुतेक सर्वत्र विहिरी आहेत आणि ह्या विहिरींना पाणीही भरपूर असे; पण गेल्या दोन-चार वर्षांपासून परिस्थिती बदलली आहे. झाडी अफाट कापली गेली आहे. नवीन झाडं लावलीच जात नाहीत. नदी कोरडी पडली आहे. शेतातल्या बहुतेक विहिरीही कोरड्या पडल्या आहेत. परिस्थिती आज इतकी बदलली आहे की, प्यायला पाणीही लांबून आणावं लागतं. गाड्यांनी, टँकर्समधून आणावं लागतं... यंदा दुष्काळानं सीमा गाठायचाच विचार केलेला दिसतो आहे.

ह्या परिस्थितीवरही मात करता येऊ शकते. विहिरींमधला गाळ काढून, उपसा सिंचन करून, शेती फुलवता येऊ शकेल. झाडं मोठ्या प्रमाणावर लावता येतील. लघुउद्योग सुरू करता येतील. निदान कड्यात तरी तसा भरपूर वाव आहे. इथे साखरकारखाना आहे. नगर जवळ आहे. मी सरपंच असताना इथे एकाला इंजिनियरिंग वर्कशॉप काढायला मी उद्युक्त केलं. ते चांगलं चाललं आहे. त्याच्या एका दुकानाची दोन दुकानं झाली आहेत. त्यानं गावात त्या धंद्याच्या जोरावर शेती घेतली आहे.

तसं म्हटलं तर खूप करता येईल परिसरातली आजची हतबल परिस्थिती दूरही करता येईल; पण त्यासाठी मेहनती, कष्टाळू, निःस्वार्थी कार्यकर्त्यांचं जाळं विणलं पाहिजे. काम करणारी प्रामाणिक माणसं तयार केली पाहिजेत. बाहेरनं आलेल्या कार्यकर्त्यांनी काही काम केलं तर हरकत नाही; पण त्याहीपेक्षा इथल्या लोकातनं कार्यकर्ते उभे केले तर काम जास्त झपाट्याने होऊ शकेल. इथल्या जनतेला त्यात सामावून घेऊन होऊ शकेल.

माझ्या मते तरी हाच आजच्या प्रश्नांवर एकमात्र तोडगा आहे. माणसं तयार करा, कामं भरपूर आहेत. विकासाला वाव आहे.

**—श्री. जे. एम्. तथा भाऊसाहेब पाटील,**
**माजी सरपंच, कडा.**
**( वय अंदाजे ७० सेवानिवृत्त मुलकी अधिकारी)**

¤

## डॉक्टरद्वय

डॉ. मुस्कुटे आणि डॉ. गुंजाळ हे डॉक्टरद्वय 'कडा' ह्या गावी एक हॉस्पिटल चालवतात. खाजगी हॉस्पिटल गावाच्या मानानं बरंच अद्ययावत आहे. तिथे ऑपरेशन्स देखील लहानसहान होतात. ह्या डॉक्टरद्वयांनी दीनदयाळ संस्थेच्या कार्याला मनापासून हातभार लावला आहे. रायमोह, धानोरा इथल्या वैद्यकीय शिबिरांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग होता. आता आष्टीत, कड्यातही कॅम्पस् ते आयोजण्याच्या तयारीत आहेत. एवढंच नाही तर संस्थेचे औषधपेढीचे व मोफत चेक-अप सेंटरचे कामही त्यांच्या दवाखान्यामार्फत ते चालवणार आहेत. तशी त्यांची 'ऑफर' आहे.

डॉक्टरद्वय हॉस्पिटलच्या मागेच राहते. तिथे स्वतंत्र जागा घेऊन दोघांनीही टुमदार बंगल्या बांधल्या आहेत. त्या सभोवती छानशा बागा तयार केल्या आहेत. विहीर अर्थात आहेच. त्यावर पंप बसवून बागांमधून, घरांमधून आणि हॉस्पिटलला पाणीपुरवठा होतो. बागांमधून सुंदर गुलाब तर आहेतच; पण चिकू, आंबा, पपया, भाज्या वगैरेही भरपूर आहेत. स्वतःच्या व हॉस्पिटलसाठी गुरं आहेत. त्यांचं दूधदुभतं तर आहेच; पण गोबरगॅसचा प्लँटही त्यावर चालतो. तो गॅसही तिन्ही ठिकाणी उपयोगी पडतो...

आपल्या कामानं ह्या डॉक्टरद्वयांनी जणू आदर्शच घालून दिले आहेत ! गावकऱ्यांतही ते लोकप्रिय आहेत. आजुबाजूच्या खेड्यांतूनही त्यांची लोकप्रियता आहे.

त्यांचं इथल्या लोकांविषयीही मत फार चांगलं आहे. 'दारिद्र्य आहे गरिबी आहे; पण तरीही लोक वृत्तीनं चांगले आहेत. सरळ आहेत. अशा वृत्तीमुळे काम करणाऱ्यालाही उत्तेजन मिळतं.'

¤

## स्थलांतरितांचा प्रश्न

ग्रामोद्योग, अन्त्योदय वगैरे कल्पना बोलायला ठीक आहेत, भाषणं द्यायला ठीक आहेत किंवा प्रयोगात्मक एखादं बरं गाव निवडून राबवायलाही ठीक आहेत; परंतु जेव्हा सबंध जिल्ह्याचा प्रश्न येतो, फार मोठ्या जनसमूहाच्या विकासाचा प्रश्न येतो (बीडची लोकसंख्या आज १४ लाखांवर आहे !) तेव्हा भाषणात टाळ्या मिळवून देणाऱ्या या योजना उपयोगी पडत नाहीत. प्रयोगात्मक गाव निवडून त्या गावात सुधारणा घडवून आणण्यासाठी चार-पाच वर्षं घालवणंही फारसं उत्साहजनक ठरत नाही. त्यासाठी काही ठोस कार्यक्रमच हवेत. परिस्थितीत तातडीनं बदल घडवून आणू शकतील असे. प्राथमिक विकास होऊन बदल-प्रक्रियेला चालना मिळण्यासाठी दहा-दहा वर्षं वाट पहावी लागणार असेल, तर ती उपाययोजना कामाची नाही असंच म्हणावं लागेल...

उलट रेल्वेमार्ग आणणं, मोठाले उद्योग सुरू करणं अशा उपाययोजनांमुळे ह्या बदलप्रक्रियेला फार लौकर गती मिळू शकेल. त्यातून आनुषंगिक व परस्पर पूरक लघु-लघुतम उद्योगांचं जाळं उभं राहू शकेल. विकासाची वाटचाल खुली होईल...

पाण्याचा प्रश्नही गंभीर आहे. तो शासनाने सोडवला पाहिजे. मुंबईला पाणी येतं शंभर शंभर मैलांवर असलेल्या जलाशयातून ! मराठवाड्यात असं औरंगाबादेत घडलं आहे. बीड जिल्ह्यात असे प्रयोग करता येणार नाहीत का ?

¤

तुम्ही आष्टी-पाटोद्यातल्या बैलगाड्यांसंबंधी बोललात. त्या मोठ्या संख्येनं दूरदूर बाहेरगावी जातात हेही खरं आहे; पण हा प्रकार संपूर्ण बीड जिल्ह्यातच आहे. जिल्ह्याच्या साडेचौदा लाख लोक-

संख्येपैकी दरवर्षी जवळजवळ साडेचार-पाच लाख लोक काम शोधण्यासाठी स्थलांतरित होतात. या समस्येचं स्वरूप फार गंभीर आहे. व्यापक आहे. त्यावर तोडगाही तातडीनं शोधून काढायला हवा आहे.

पण सुधारित बैलगाड्या त्यांना बँकेमार्फत पुरवणं हा तोडगा होऊच शकत नाही. कारण त्यामुळे त्यांना उलट स्थलांतर करायलाच प्रोत्साहन मिळेल. त्यांची मिळकतही तुम्ही म्हणता तशी सुधारणार नाही. चार-पाच हजाराचं कर्ज, त्यावरील व्याज, कर्जाची परतफेड, गाडीची मरम्मत – फार मोठा आर्थिक फायदा शेतकऱ्याचा होऊ शकणार नाही ! शिवाय त्यांच्या स्थलांतराचा प्रश्न सुटायचा नाही तो नाहीच !

त्यासाठी दुसरा काही कार्यक्रम घ्यायला हवा की जेणेकरून ह्या स्थलांतरितांना आपापल्या गावातच काम मिळेल. त्यांचं स्थलांतर थांबेल. त्यांच्या बैलगाड्या बीड जिल्ह्यातच वापरता येतील !

**श्री. क्षीरसागर**

**संपादक, दैनिक ' चंपावती पत्र ', बीड**

## सुशिक्षित बेकारांची शक्ती

पाटोदा तालुक्याविषयी बोलायचं तर हा तालुका फार मागासलेला आहे. वंजारी आणि मराठा समाज मोठे. त्याचबरोबर मुसलमान वस्तीही मोठी. ह्या दोन-तीन गटातच राजकारण फिरत असतं. ...आता दीनदयाळचे लोक इथे कामं करणार हे चांगलं आहे; पण संघाविषयी ह्या सगळ्याच गटांमध्ये मोठा ' फोबिया ' आहे. भीतियुक्त संशय आहे. त्यांचा विश्वास संपादून काम पुढं नेणं हेच इथलं मोठं आव्हान आहे...

तसाच दुसरा महत्त्वाचा प्रश्न सुशिक्षित बेकारांचा. गावोगावी शाळा-महाविद्यालयं निघाली आहेत. त्यातनं आजच्या स्टॅंडर्डप्रमाणे अनेक मॅट्रिक्युलेट्स, ग्रॅज्युएट्स बाहेर पडतात. त्यांच्यासाठी पुरेशा नोकऱ्या उपलब्ध नाहीत. काही उद्योगधंदा काढायचा तर पैसा नाही. धंद्याची माहिती नाही. बाजारपेठ नाही. वाहतुकीची साधनं नाहीत. पिढ्यान् पिढ्या चालत आलेली शेती करायची तर शिक्षण घेऊन शेतात राबायला मन तयार नसतं. लाजही वाटते. त्यामुळं सुशिक्षित बेकारांची फलटणच्या फलटण ग्रामीण भागात रोज तयार होत आहे. हा तरुणवर्ग जोशपूर्ण असतो; पण आज तो पूर्णतया असंतुष्ट आहे. पाटोद्यातही हीच परिस्थिती आहे...

ह्या सुशिक्षित बेकारांच्या शक्तीला विधायक वळण देऊन ती नवनिर्माणाच्या कार्यात वापरली गेली पाहिजे. हे काम कसं करायचं याचा गांभीर्याने आणि अग्रक्रम देऊन विचार संघानं करायला हवा. ह्या शक्तीला विकासकार्यात सामावून घेता आलं तर बरेच प्रश्न सुटण्यासारखे आहेत...

**– डॉ. जैन, पाटोदा**

¤

## आम्ही विरोध करू

कामं इथल्या परिसरात खूप करण्यासारखी आहेत. इरिगेशनशिवाय तसं इथे काहीच खरं नाही; पण त्यासाठी कसून काम करायला हवं. पाटोदा तालुक्यात बांदरा आणि मांजरा ह्या दोन नद्यांचा फायदा उचलून पाटाच्या पाण्याच्या आधारे इथे खूप बदल घडवून आणता येतील. योजनाबद्ध प्रयत्न केले तर ते अवघडही नाही...

दुग्धव्यवसाय अधिक चांगला इथे होऊ शकेल. दोन-चार गावांचा गट बनवून तिथे गायी द्यायच्या. दूध गोळा करायचं. दूध शीतीकरण केन्द्रं सुरू करायची आणि दूधक्रांती घडवून आणायची. त्या अनुषंगानं बरेच काही उद्योगही इथे वाढीला लागू शकतील...

ह्या सर्व कार्यक्रमांची सुरुवात डोमरी, सावरगाव वगैरेसारखं एखादं गाव निवडून करता येईल. त्या गावाचा आदर्श उभा होईल असं काम तिथे झालं पाहिजे...

पण संघाला मात्र ह्यातलं नक्कीच काही करायचं नाही आहे. भाषणबाजी, कामं करत असल्याचा देखावा, त्यातून स्वतःकडे क्रेडिट, एवढाच संघाचा कार्यक्रम आहे. त्यातून नुसता प्रपोगंडा गोंधळ-गडबड एवढंच त्यांचं लक्ष आहे...

तसे हे लोक मोठे चालबाज. अगदी मंत्री-मुख्यमंत्र्यांच्या सचिवांपासून ते तहत जिल्हाधिकारी, प्रांत ह्या पातळ्यांपर्यन्त–सर्व अधिकारी संघाच्या प्रभावाखालचे असतात. त्यांच्याचमार्फत सरकारी कामं करवून घ्यायची, टिमकी स्वतःची वाजवायची. श्रेय स्वतःकडे घ्यायचं. हा यांचा खाक्या. सगळे मोठे अधिकारी यांना कसे वश होतात कळत नाही; पण ह्या अधिकाऱ्यांना संघानं खिशात घात-

*With Best Compliments From :*

**M/s. Shree Textiles**

802/6, Sadashiv Peth ( Opp. Shanipar )
POONA 411 030

**( House of Furnishing Cloths )**

लेलं असतं एवढं मात्र खरं !

पण हा डाव आता आम्ही ओळखला आहे. संघवाल्यांच्या ह्या उपद्व्यापानं थोडा गोंधळ माजेल कदाचित; पण आम्ही त्यांना यशस्वी होऊ देणार नाही. आम्ही त्यांना आडवे जाऊ—

**श्री. नागरगोजे वकील,**
**पाटोदा**
**इंदिरा काँग्रेसचे पाटोद्यातले पुढारी-कार्यकर्ते....**

¤

## दिरंगाई

आमच्या संस्थेचे उद्दिष्ट आहे ग्रामसुधार योजना व तत्संबंधीचे संशोधन. त्यानुसार ठिकठिकाणचे विद्यार्थी प्रशिक्षणार्थ इथे येतात. त्यापैकीच काही बाहेर जाऊन ह्या कार्याला वाहून घेतात. प्रयोगात्मक म्हणून आमची काही कामे चालतात. प्राय: नगर जिल्हयात उपसा सिंचन, सुधारित शेतीचे प्रयोग, ग्रामोद्योग इत्यादि.

ह्या सर्व कामांसाठी पैसा लागतो. संस्थेच्या कामाला त्यामुळे मर्यादा पडतात. संस्थेने पुरस्कार दिलेल्यांना देखील बँका, वित्तीय संस्था ह्यांच्याकडून सहकार्य मिळायला त्रास होतो. त्या मानाने सरकारकडून आमच्या योजनांना सहकार्य चांगले मिळते; पण बँका, वित्तीय संस्थांच्या अतिसावधान काम करण्याच्या पद्धतींमुळे साहाय्य मिळण्यास फार त्रास होतो, दिरंगाई होते, प्रकल्पाचा तोंडवळाच बिघडून जातो...

ह्या प्रकल्पांना वेळेवर साहाय्य मिळाले तर चांगले परिणाम मिळू शकतात ह्याचे एक चांगले उदाहरण मी सांगतो. एका कुंभाराला चांगले गाढव घ्यायला नि मेकॅनिकला चाक घ्यायला वेळेवर साहाय्य मिळाले. त्यामुळे त्याचा धंद्यात इतका चांगला जम बसला की, त्याने कर्ज तर मुदतीत फेडलेच; पण धंदा वाढवला. जमीन घेतली. दुभती जनावरेही घेतली.

असे क्वचित कधी साह्य मिळाले किंवा कुणाला आमच्या संस्थेतर्फे मदत देता आली तर प्रकल्प यशस्वी झाल्याची अशी आणखीही उदाहरणे बरीच देता येतील. ह्या यशस्वी प्रयोगांमुळेच आम्हाला बाहेरची बोलावणी येतात. अंतर, नियंत्रण, पैसा इत्यादि कारणांमुळे आम्ही सगळीकडे जाऊ शकत नाही. धानोऱ्याला मात्र आम्ही काम हातात घेतले आहे. एक तर अंतर जवळ आहे. लोकांचे सहकार्य आहे. ते काम यशस्वी होईल अशी खात्री आहे. अडयळा फक्त बँकेच्या दफ्तरदिरंगाईचा आहे—

**डॉ. हळबे, डायरेक्टर.**
**सेंटर फॉर स्टडीज इन रूरल डेव्हलपमेंट,**
**नगर कॉलेज, नगर**

¤

## स्थलमहिमा

बीड जिल्ह्यातल्या भटकंतीचा मार्ग होता नगर—वडगावदोला—नगर—धानोरा—अंभोरा—धानोरा-कडा आष्टी-पाटोदा-बीड...

वाटेत अनेक घाट लागले. अनेक डोंगरमाथे पार करावे लागले. लघुसिंचन, उपसासिंचन, पाझर तलाव, धरणं—अनेक भूसिंचन प्रयोगांच्या पाटचा दिसल्या. अनेक देवळे दिसली. पडकी घरं, निर्मनुष्य वस्त्या, पाण्याचे हंडे घेऊन जाणाऱ्यांच्या रांगा, परतणाऱ्या बैलगाड्या, त्यातले दीन चेहरे ही सारी दृश्ये तर सततच दिसत होती; पण अशा अवस्थेतही माणुसकीचा प्रत्यय मात्र सर्वत्र येत होता. लोक एकमेकांना धरून. जमेल तेवढे अगत्य पाव्हण्यांना दाखवत होते.

ह्या भटकंतीत एका गावातला अगदी आगळा प्रयोग ऐकायला मिळाला. गावाचे नाव आठवत नाही; पण बहुधा--करंजवणेच असावे.

गावात तरुण—म्हातारे बरेच. काम फारसे नाहीच. त्यातून व्यसनाधीनता आली. दारू पिण्याचे प्रमाण फार वाढले. तशात गावातल्या देवळात एक अवलिया आला. त्याने गाव न्याहाळले. देवळात मुक्काम ठोकला. काही जाणत्या, नेमस्त गावकऱ्यांशी चर्चा केली न् गावच्या देवळात रामनामजप, भजने ह्यांचा अखंड स्रोत चालू झाला. देवळाकडे बरेच अगदी तरुणही आकर्षित झाले; पण प्रवेश हवा तर मद्यपान करता कामा नये अशी अट आली. एक नाही—दोन नाही तब्बल सहा महिन्यांपेक्षाही जास्त काळ हा जागर देवळात चालू राहिला.

जागर संपला तेव्हा गाव दारूच्या व्यसनातून पूर्णपणे मुक्त झालेले होते...

असे एक ना दोन अनेक किस्से ! अनेक महिमास्थाने. नागथळा त्यातलेच एक. तिथे नागदेवाच्या मंदिराच्या बाजूने एक ओहोळ वाहतो. ह्या ओहोळात बारा महिने भरपूर पाणी असते. अगदी आजूबाजूचा प्रदेश कोरडा ठणठणीत असला तरी !...

आष्टीहून ब्रह्मगाव, भुगगांवमार्गे पाटोद्याकडे जाताना शृंगेरीदेवीचा घाट लागतो. खुद्द देवळाच्या अगदी जवळच घाटाचे दृश्य अप्रतिम आहे. देऊळ, घाट आणि पलीकडे जवळच काही तलाव, पाणतळे-एकूण दृश्य फार सुंदर आहे...

आष्टी—पाटोद्याचा विकास करताना ह्या अशा ठिकाणांचे सौंदर्य, तिथला महिमा जपायला हवा. त्यांचा विकासात कुशलतेने उपयोग करून घ्यायला हवा !


**जगन्नाथ गंगाराम पेडणेकर**

**ज्युवेलर्स**

**सोने, चांदी व मोत्यांच्या दागिन्यांचे व्यापारी**

**खांडके बिल्डिंग नं. ९, रा. के. वैद्य रोड,**
**दादर, मुंबई २८.**

सोने, चांदी व मोत्यांचे दागिने ऑर्डरप्रमाणे अल्पमुदतीत बनवून दिले जातील व तयार दागिने हजर स्टॉकमधून मिळतील.

४ लाख ६३ हजार वाचकांची एकमुखी प्रशंसा




चौथी
डिलक्स
आवृत्ती

लेखक : वि. ग. कानिटकर

॥ पृष्ठसंख्या ५४० ॥ मोठा डबल क्राउन आकार ॥ भरपूर छायाचित्रे ॥
॥ मूळ किं. १४० रु. ॥ सवलतीत ९५ रु. ॥

चौथ्या डिलक्स आवृत्तीचे खास आकर्षण

**माइन काम्फ**

या हिटलरच्या दुर्मिळ आत्मचरित्राची सचित्र ओळख

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.

## निसर्गाचे आव्हान

ह्या भागात काय करता येईल हाच मुख्य प्रश्न आहे. दीनदयाळ शोधसंस्थेची सध्या जिल्ह्याची पाहणी चालू आहे काही आराखडेही तयार होऊ लागले आहेत. एक-दोन मेडिकल कँपस् झाले आहेत. आणखी होणार आहेत...

पण डोंगराळ, पाणी अजिबात नाही, जमीन खडकाळ-खूपशी कोरडवाहू...हे निसर्गानंच निर्माण करून ठेवलेले प्रश्न एवढे मोठे आहेत की, त्यांच्यावर मात करून विकास घडवून आणणे हे एक फार मोठे आव्हान आहे. शिक्षणाचा अभाव, रोगराई, बेकारी, दारिद्र्य हे त्या अनुषंगाने निर्माण झालेले प्रश्न आहेत. अर्थातच उद्योजकता इथे लोकांमध्ये नाही ह्यात आश्चर्य असे कसलेच नाही. तशी परिस्थितीच इथे नाही...

त्यातही काही उद्योग कुठे कुठे चालू आहेत. डोंगराळभागात मेंढपाळ आहेत. लोकरीचा उद्योग ते करतात, तर बिडसांगवीला बरेच हातमाग आहेत. आष्टीत तेलघाण्यांचाही मोठा उद्योग पूर्वी होता; परंतु आता घड पीक नाही, पाऊस नाही. झाडी तोडलेली. पुण्या-मुंबईकडच्या तेल उत्पादन करणाऱ्या कारखान्यांची चढाओढ. त्यामुळे एके काळी तेजीत असलेला हा धंदा आज कसाबसा उभा आहे. बऱ्याच तेलगिरण्या बंद आहेत...

आज हे बदलायचे तर पाण्याचा प्रश्न मुख्य सोडवायला पाहिजे. इथल्या जमिनीचा अभ्यास करून इथे कुठले उत्पन्न जमिनीतून मिळू शकेल त्याचा अभ्यास होऊन तसे शेतकऱ्यांचे प्रशिक्षण झाले पाहिजे. कोरडवाहू शेतीचे प्रयोग झाले पाहिजेत. ह्यासाठी अभ्यासपूर्वक योजना आखून सर्वांच्या मदतीने त्या पार पाडायला हव्यात...

**श्री. देशपांडे वकील, आष्टी**

¤

## विरोध मावळेल

आम्ही सर्व तऱ्हेच्या सूचना मिळवून त्यानुसार कार्यवाही करायला, आराखडे आखायला तयार आहोत. ठराविक आकृतिबंधच राबवायला पाहिजे असा आमचा आग्रह नाही गोंडा जिल्ह्यात जो प्रयोग यशस्वी झाला तोच इथे राबवला पाहिजे असे तर आम्ही कधीच म्हणणार नाही आणि ते शक्यही नाही. गोंडा जिल्ह्यात दीनदयाळ शोधसंस्थेने काम सुरू केले तेव्हा तिथे जी परिस्थिती होती त्यापेक्षा इथली परिस्थिती अगदी भिन्न आहे. तिथल्यापेक्षा इथले दारिद्र्य भयाण आहे. गोंडा जिल्ह्यात पाणी मुबलक आहे. जमीन सुपीक आहे. प्रश्न तिथे प्रामुख्याने होता तो लोकांना प्रशिक्षित करण्याचा. त्यांना कामाला लावण्याचा. त्यांना दिशा दाखवण्याचा!

इथले प्रश्न अगदी वेगळे आहेत. दारिद्र्य अफाट आहे. पाण्याची वानवा मोठी आहे आणि पाण्याचा प्रश्न सोडवल्याशिवाय इथे बाकी सुधारणांचा विचार व्यर्थ आहे. पाण्याशिवाय शेतीप्रधान कार्यक्रमावर जोर देणेही कठीण आहे. कोरडवाहू शेतीचा प्रयोग अवश्य राबवायचा आहे; पण त्यावर सारा भर देऊन इथे प्रश्न सुटणारे नाहीत नि म्हणून प्रथमपासूनच बीड जिल्ह्यातल्या ह्या दोन तालुक्यांत काम करताना आम्हाला कुटीरोद्योग, ग्रामोद्योग, लघु उद्योग ह्यांच्यावरही भर द्यावा लागणार आहे.

जिल्ह्याचा एकूण सारासार विचार करताना म्हणूनच आम्ही चतुःसूत्री कार्यक्रम आखला आहे. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, आरोग्य, कोरडवाहू शेती व सामाजिक वनीकरण आणि कुटीरोद्योग-लघु उद्योग हीच ती चतुःसूत्री!

ह्या आधारे आम्ही कामाला सुरुवातही केली आहे. दोन मेडिकल कॅम्पस् झाले आहेत. वर्षभरात चोवीस कॅम्पस्चा संकल्प आहे. त्या आधारे ह्या दोन तालुक्यांतल्या प्रत्येक खेड्यात पोचायचा आमचा मानस आहे. औषधपेढी त्याच्या पुढची पायरी! ह्या कॅम्पस्चा चांगला फायदा होतो. संपर्क साधला जातो. समज-गैरसमज दूर सारता येतात. गोंडसिंगमूमचा अनुभव हाच आहे. इथेही असाच अनुभव पहिल्या दोन कॅम्पस्च्या काळात आला आहे.

त्यानंतर पाणी. आमचं नशीब चांगलं असेल कदाचित; पण दोन-तीन ठिकाणी आम्हाला पाणी पहिल्या प्रयत्नातच मिळालं आहे... धनगर-जवळगा, आष्टी हे पुढचे टप्पे.


कोरडवाहू शेती किंवा सामायिक विहिरींवर उपसासिंचन करून शेती ह्यासंबंधात पाहणी सुरू आहे. श्री. प्रयाग ह्यांच्या मार्गदर्शनाखाली हे काम सुरू आहे. सामाजिक वनीकरणाचा प्रयोगही एकलाख झाडं वर्षात लावून आम्हाला राबवायचा आहे. ही झाडं नुसती लावायची नाहीत तर जगवायची आहेत. नाना मुंगीकर हे ह्या प्रकल्पाचा आराखडा आखताहेत. जंगलखात्याचेही सहकार्य घ्यायचा प्रयत्न चालू आहे

उद्योजक मात्र आम्ही करंजवणे, धनगरजवळगा वगैरे गावात शोधले आहेत. थोडे पैसेही उभे करण्याची त्यांची तयारी आहे. त्यांना उद्योग शोधून द्यायचे, त्यांचे प्रशिक्षण करायचे, वित्तीयसंस्था किंवा बँकांकडून त्यांना अर्थसहाय्य मिळवून द्यायचे, त्यांना विक्रीव्यवस्था करून द्यायची हे पुढचे टप्पे आहेत. त्या दृष्टीने प्रयत्न चालू आहेत; पण एक निश्चित की, ह्या वर्षभरात किमान दहा-पंधरा तरी लघुउद्योग आम्हाला चालू करून द्यायचे आहेत. काही घडे घालून द्यायचे आहेत.

दुसरी चांगली गोष्ट म्हणजे आज तरी आम्हाला सहकार्य चांगलं मिळत आहे. जनतेचे, सरकारी यंत्रणेचेही! विरोध कुठे कुठे होणार हे आम्हालाही माहीत आहे; पण आमची भूमिका स्वच्छ आहे. राजकारण, जात-पात-धर्म ह्यांचा आणि ह्या कार्याचा कसलाही संबंध नाही. त्यामुळे ह्याचा प्रत्यय येईल तसतसा विरोध मावळेल अशी आशा आहे!

**श्री. के. डी. जोशी**
**दीनदयाळ संशोधन संस्थान**

**[ पूर्वार्ध समाप्त : उत्तरार्ध पुढील अंकी ]**



# ब्लड कॅन्सर



**पूर्वसूत्र :** डॉ. मॉर्टेलच्या लाडक्या मुलीला ल्युकेमिया झाला होता. चार्लसला फक्त एकच माहीत होतं–मिचेलीला वाचवायचं ! हॉस्पिटलमधून कॅथरिनचा फोन आला होता–' मिचेलीचं काही तरी बिघडलंय, इकडे ये. '

चार्लस मिचेलीच्या खोलीत शिरला तेव्हा मृत्यूपूर्वीची हिरवी छटा तिच्या चर्येवर भासली. चार्लस भडकला ते मिचेलीला औषधाचा दुप्पट डोस दिला गेला आहे हे ऐकून. त्या औषधामुळंच तिला हृदयाचा झटका आला होता. चार्लस या उपचारांच्या विरुद्ध होता. त्याची मनस्थिती बिघडत चालली होती.

मिचेलीवरचे उपचार चार्लसला थांबवता येणार नाहीत अशी व्यवस्था कॅथरिननं करावी असा सल्ला डॉ. विलींनी दिला.

रीसायल कंपनीतून नदीच्या पात्रात सोडल्या जाणाऱ्या बेंझिनचा चार्लसला छडा लावायचा होता. पण रीसायल कंपनीच्यां यंत्रणेपुढे तो अगदी एकटा पडला होता. त्यात कॅथरिननं दिलेली बातमी ऐकून तो बेफामच झाला. मिचेलीवरचे चुकीचे उपचार थांबवणंसुद्धा आता त्याच्या हातात नव्हतं.
¤

अगदी वेगळ्या व नवीन विषयावरील ही हृदयस्पर्शी कादंबरी.

मागील अंकात प्रकरणे ८ ते १० दिली. पुढे....

मूळ लेखक : डॉ. रॉबिन कुक : मूळ कादंबरीचे नाव ' फीव्हर. '

मुक्त अनुवाद : प्रा. म. रा. राईलकर

# अकरा

तो जेव्हा बालरुग्णालयात पोचला तेव्हा रात्रीचे ९ वाजले होते. वर्दळही कमी होती. तो लिफ्टनं ६ व्या मजल्यावर आला आणि मिचेलीच्या खोलीत शिरला. खोलीच्या अंधाराची सवय होईतों, तो जरा दरवाज्यातच थांबला.

कार्डिआक मॉनिटर लावलेला दिसत होता. दोन्ही हातांच्या शिरेतून द्रवपदार्थ जात होता. त्यातूनच असली औषधं मिचेलीला दिली जात आहेत हे त्याला माहीत होतं.

तो पुढं झाला. त्याला वाटलं मिचेली झोपलेली आढळेल; पण तिचे डोळे टक्क उघडे होते.

'मिचेली ?' तो कुजबुजला.

'डॅडी ?' प्रथम तिला वाटलं होतं की रक्त घेणारा माणूस आला असेल.

त्यानं अलगद तिला उचललं आणि गालाला गाल लावले. चांगलाच ताप होता. हळूच खाली ठेवून तिच्याकडे पाहिले तर ओठ फुटलेले आढळले. पाहता पाहता त्याला वाटलं, 'रीसायकल कंपनीत आपण उगीच मूर्खपणा केला. रीसायकलवर सूड घेण्यापेक्षा मिचेलीकडे अधिक लक्ष द्यायला हवं होतं. त्यांना आपल्या छोट्या मुलीची पर्वा करायचं काय कारण ?'

'डॅडी, तुमचं नाक किती सुजलंय !'

चार्लस हसला. 'ही स्वतः आजारी आणि किती दुसऱ्याची काळजी !'

'काही नाही ग ! मी बर्फावरून घसरून पडलो.' मिचेली हसली पण लगेच पुन्हा गंभीर झाली. 'डॅडी, मी बरी होईन का हो ?'

चार्लस एकदम गडबडला. 'तर, तर' हसत हसत त्यानं म्हटलं, 'इतकंच काय, आता तुला ही औषधं घ्यायची सुद्धा गरज पडणार नाही.' त्याचं इंजेक्शनच्या बाटलीकडे लक्ष गेलं. 'आताच का आपण हे काढून टाकू नये ?'

मिचेली घाबरली. तो म्हणाला, 'दुखणार नाही.' त्याने इंजेक्शनची एक नळी काढून टाकली. 'ती दुसरी नळी असू दे. पुन्हा त्रास झाला तर उपयोग होईल !'

एकदम खोलीतले दिवे लागले. त्याने मागं वळून पाहिलं तर हॉस्पिटलचे दोन रक्षक आणि एक नर्स. तिनं लोंबती नळी पाहिली आणि ती रागावली.

'माफ करा, श्री. मार्टेल; पण तुम्हाला इथून जायला हवं, तुम्हाला आम्ही अटक करू शकतो; पण तुम्ही सहकार्य दिलंत तर असा प्रसंग येणार नाही.' चार्लस तिच्या कॉटवरच बसून राहिला. शेवटी दोन्ही रक्षकांनी त्याचे हात धरले तेव्हा तो उठला.

'डॅडी, तुम्हाला का अटक करणार आहेत ?'

'आता भेटायची वेळ नाही ना म्हणून; पण आता झोप. मी पुन्हा येईन हं.' तिला हात करून तो गेला.

नर्स त्याच्याबरोबर येत म्हणाली, 'तुम्ही ती नळी काढायला नको होती.' चार्लसनं उत्तर दिलं नाही.

'आता जर तुम्हाला पुन्हा यायचं असेल तर ठरलेल्या वेळातच यायला हवं नि तेही कुणाच्या तरी बरोबर.'

'मला तिचे चार्ट दाखवता का ?' तो नम्रपणे म्हणाला.

नर्सने काही उत्तर दिलं नाही तेव्हा तो म्हणाला, 'वडील म्हणून माझा हक्क आहे. शिवाय मी स्वतः डॉक्टर आहे.'

नाइलाजाने ती त्याला खोलीत घेऊन गेली. त्यानं पाहिलं. मात्र त्याला कल्पना होती तरी धक्का बसला. ल्युकेमिक पेशींची संख्या अजून कमी झाली नव्हती. केमोथेरपी निष्फळ ठरली हे स्पष्ट झालं होतं.

त्यानं डॉ. काइत्समानना फोन लावला. फोन येईपर्यंत बाकीचा चार्ट पाहात राहिला. तापाचा आलेखसुद्धा काळजी करण्यासारखाच होता. कालपर्यंत शंभर असलेला आज एकदम एकशेचार ! कार्डिऑलॉजिस्टाचा अहवाल पाहिला. दुपारचा हृदयाचा झटका डॉनोरुबीसीनच्या जादा डोसामुळं आला असावा किंवा ल्युकेमिक पेशींनी आता हृदयात प्रवेश केल्यामुळं आला असावा, असा शेरा होता. तेवढ्यात फोन वाजला.

दोघेही सौजन्यपूर्ण भाषेत बोलण्याची वृथा धडपड करीत होते.

'हे पहा, तुम्ही स्वतः डॉक्टर आहात,' डॉ. काइत्समान म्हणाले, शक्यतो आम्ही नेहमीची प्रथा मोडत नाही; पण अनेकदा प्रतिसाद न मिळाल्यास चाकोरी सोडून उपचार करावे लागतात. आणि त्यात काही अडचणी येऊ नयेत म्हणून आम्हाला कोर्टाचा आसरा घ्यावा लागला.'

'पण मिचेलीला केमोथेरपीचा उपयोग होत नाहीये हे उघड आहे.' स्वतःवर ताबा ठेवण्याचा प्रयत्न करीत चार्लस म्हणाला.

'अजून नाही तसं म्हणता यायचं. अजूनही संधी आहे. शिवाय, आम्ही तेवढंच करू शकतो.'

'पण तुम्ही नुसते प्रयोग करताय.'

डॉ. काइत्समान काही बोलले नाहीत. चार्लसच्या म्हणण्यातही तथ्य होतंच नाही तरी.

'आणखी एक, बेन्झिनमुळं असला ल्युकेमिया होऊ शकतो असं तुम्हाला वाटतं का ?'

'अगदी शक्य आहे. मिचेलीला तसलाच ल्युकेमिया झाला आहे. तिचा कुठं संपर्क आला होता का ?'

'खूपच काळ. एका कारखान्यातून बेन्झिन वारंवार नदीत सोडलं जात असतं. मिचेलीचा ल्युकेमिया बेन्झिनमुळं झाला असेल असं तुम्ही म्हणू शकाल का ?'

'तसं काही करता येणार नाही मला. कारण तो परिस्थितिजन्य पुरावा आहे आणि असा ल्युकेमिया फक्त इतर प्राण्यांना, तोही प्रयोगशाळांतून झाल्याचं आढळलं आहे.'

'पण माणसांनाही होऊ शकतो असं तुम्हाला नि मला दोघांना वाटतं.'

'पण हे कोर्टात टिकणार नाही. मात्र शंकेला वाव आहे हे निःसंशय.'

'म्हणजे तुम्ही यात काही मदत करू शकणार नाही तर ?'

'माफ करा; पण हे मला शक्य नाही,' डॉ. काइत्समान म्हणाले, 'पण दुसरी गोष्ट करू शकतो. तुम्ही लवकरच मानसोपचारतज्ज्ञांची

गाठ घ्यावी हे बरं. तुम्हाला फार मोठा धक्का बसलाय.'

सणसणीत उत्तर द्यावं असं चार्लसला वाटलं; पण त्यानं फोन बंद केला. पुन्हा मिचेलीला भेटावं असं त्याला वाटलं. म्हणून तो वळला; पण नर्स आणि रक्षक त्याच्याकडेच पाहात होते !

लिफ्टकडे जाता–जाता तो दुसऱ्या दिवशीचा विचार करू लागला.

'पाहू. उद्या डॉ. इवॅनेजना भेटल्यावर ठरवता येईल.'

¤

एलन शेल्डनसुद्धा आज उशीरा आली. एक म्हणजे रात्री झोपायला उशीर झाला होता. डॉ. मॉरिसनच्याच आग्रहास्तव ती जेवायला गेली होती आणि दुसरं म्हणजे चार्लस आज काही प्रयोगशाळेत येण्याची शक्यता नव्हती.

चार्लसला इन्स्टिट्यूटनं फक्त चोवीस तासांचा अवधी निर्णयाकरता दिला असल्याचं सांगितलं होतं. नि तो काय करतोय हे तिनं आपल्याला सांगावं असंही तिला सुचवलं होतं.

आल्यावर तिनं प्रयोगशाळेचं कुलूप काढायला सुरुवात केली तेव्हा ती चकित झाली. चार्लस आधीच आला होता.

'मला वाटलं तू आज येणारच नाहीस,' चार्लस विनोदानं म्हणाला.

कोट काढीत एलन म्हणाली, 'तू इथं असशील असं वाटलं नाही.' तिचा स्वर काहीसा अपराधी होता.

'ओः, मी तर इथं रात्रभर काम करतोय.'

एलन त्याच्या जवळ आली. नवीन लॅबबुकाची कित्येक पानं त्यानं भरलेली तिला आढळली. तिनं चार्लसकडे पाहिलं तेव्हा ती चकित झाली. केस विसकटलेले, दाढी थोडी वाढलेली, नाक सुजलेलं.

'काय करतोयस ?' तिनं विचारलं.

हातातली नळी उचलून तो म्हणाला, 'चांगली बातमी आहे. इतर प्राण्यांच्या कर्करोगातील अँटीजिन वेगळं करण्याची आपली पद्धत माणसाच्या कर्करोगालाही लागू पडणार. मिचेलीच्या ल्युकेमिक पेशींवरून केलेला हैब्रिडोमा फारच छान काम करतोय.'

तिनं मान डोलवली; पण तिला चार्लसची एकूणच कीव आली.

'पण चार्लस, आपण हे काम करायचं नाहीये.'

'अजून तरी इथला प्रमुख मी आहे,' त्याचा स्वर वाजवीपेक्षा कठोर होता की काय असं वाटलं तिला. तिनं आपलं काम सुरू केलं; पण मधून मधून ती डोळ्यांच्या कोपऱ्यातून त्याच्याकडे पाहात होती. नऊ वाजल्यानंतर कोणत्या तरी निमित्तानं बाहेर पडून डॉ. मॉरिसनकडे जाऊन यायला हवं असं तिनं ठरवलं.

सकाळी त्याला कोर्टाची नोटीस मिळाली. तीन दिवसांची मुदत दिली होती. कागद वाचून त्यानं पाकीट बाजूला ठेवलं. 'वकील गाठायला हवा.'

घड्याळ पाहिल्यावर त्यानं शाफ्टबरीचे नगरप्रमुख श्री. जॉन रॅन्डॉल्फ यांना फोन केला.

'शाफ्ट्सबरी पोलीसविभागाबद्दल मला तक्रार द्यायचीय,' तो म्हणाला.

'कारखान्यात काल झालेल्या प्रसंगाबद्दल तर तुम्ही बोलत नाही ना ?'

'तर, त्याबद्दलच.'

'ते सगळं मला फ्रँकनं सांगितलं. नशिबवान आहात, फ्रँक आला वेळीच म्हणून बचावलात.'

'मलाही प्रथम तसंच वाटलं; पण नंतर जेव्हा त्यानं मला रीसायकल कंपनीत नेलं आणि तिथल्या लोकांकडून ठोसे मारवले तेव्हा माझं मत बदललं.'

'ते मात्र मला कळलं नाही; पण तुम्ही गैरकायदा तिकडे गेला होतात. ह्या भानगडीत तुम्ही का पडता ? तुम्ही डॉक्टर आहात ना ?'

एकदम चार्लसचा पारा चढला आणि चढत्या पट्टीतच त्यानं रीसायकल कंपनी पाण्यात बेन्झिन कसं फेकते नि समाजाच्या हितासाठी कारखाना बंद होणं कसं जरूर आहे हे सांगायला आरंभ केला.

'मला तसं दिसत नाही. कारण कित्येक लोक तिथं काम करताहेत आज. आपल्या नगराचा विकास त्या कारखान्यावर अवलंबून आहे.'

'तुमच्या विकासाच्या कल्पना, किती धुलाईयंत्रं विकली गेली


फोन : ४४३१५६

**पुणे म्युनिसिपल कॉर्पोरेशन सर्व्हन्टस्**
**को–ऑप. अर्बन बँक लि. पुणे ३०**

७६८, सदाशिव पेठ, फडतरे चौक. पुणे–३०
(स्थापना १९१४)

**ऑडिट वर्ग–अ** **सभासद संख्या–७१७६**

| | |
|---|---|
| वसूल भाग भांडवल | रु. ३४·५० |
| खेळते भाग भांडवल | रु. ३,३९·४० |
| ठेवी सर्व प्रकार | रु. २,३१·३८ |

**व्याजाचा दर**

सेव्हिंग खाते–द. सा. द. शे. ६ टक्के

| | |
|---|---|
| कायम ठेव खाते | १ वर्ष ८–५० |
| | २ वर्षे ९–५० |
| | ३ वर्षे १२–०० |

**आकर्षक योजना**

१. रिकरिंग ठेवीवर आकर्षक व्याज देण्यात येते.
२. शुभमंगल ठेव योजना–
१५ वर्षे बचत करून १६ वर्षांनंतर मिळणारी रक्कम रु. १२,७५१ (दरमहा रु. २५ भरल्यास)
– दरमहा रु. २५, १० वर्षांसाठी बचत करून ११ वर्षांनंतर मिळणारी रक्कम रु. ६१,०१.
३. दामदुप्पट व दीडपट योजना–सदर योजनेत शंभर अगर त्याचे पटीत रक्कम ठेवण्यात येते.

**सु. अ. चित्रे,** एच. डी. सी. — मॅनेजर
**स. कृ. देवधर** — प्रशासक

त्यावर ठरतात असं दिसतंय.'

'पण तोसुद्धा विकासाचाच भाग आहे.'

'आणि कोवळ्या मुलांना ल्युकेमिया, अप्लास्टिक अनेमिया-सारख्या भीषण रोगांना बळी पडावं लागतं. ती त्या विकासाची किंमत म्हणायची.'

'तुम्ही काय म्हणताय ते मला कळत नाही.'

'आणि तुम्हाला ते कळूनही घ्यायचं नाही.'

'तुम्ही माझ्यावर आरोप करताय का ?'

'शाब्बास ! हुशार आहात. मी तुमच्यावर आरोपच ठेवतोय. तुम्ही अत्यंत बेजबाबदार आहात. रीसायकल कंपनी नदीत विषारी द्रव्यं सोडतेय हे कळल्यावर संपूर्ण चौकशी होईपर्यंत ती बंद ठेवायला हवी. खरं तर !'

'तुम्हाला बोलायला सोपं आहे. तुम्ही डॉक्टर आहात. तुम्हाला पैशाची चिंता नाही. लोकांना नोकऱ्या हव्यातच. आता तुमच्या तक्रारीचं. तर, तुम्ही ह्या भानगडीतून बाजूला राहाल तर कल्याण होईल. इथल्या लोकांनी कसं रहावं आणि कसं जगावं हे आम्हाला तुमच्यासारख्या हार्वर्डवाल्यांकडून शिकायची जरुर नाही.'

रागानं काम होणार नाही हे लक्षात आलं तेव्हा त्यानं परिसर संरक्षक-मंडळाला फोन केला. अमेंडोलाबाईच फोनवर आल्या.

त्यानं कारखान्याचं वर्णन केलं. बाई म्हणाली फोटो आणलेत का त्यावर चार्लस म्हणाला, 'मी छायाचित्रं घेतली, तेवढ्यात त्यांनी माझा कॅमेरा मोडून टाकला; पण माझ्यापेक्षा तुम्हा लोकांना जास्त अधिकार आहेत. तुम्ही काही तरी करू शकता.


*With Best Compliments from*

## m/s. Bansilal Lakhichand Sancheti

**General Merchants & Commission Agents.**

Plot No. 498, Market Yard, Gultekdi
Pune 411 037

*Phones – 44 40 22*
*Res. – 21515*


'ठीक आहे मी प्रयत्न करते; पण खात्री देऊ शकत नाही.

फोन ठेवून तो जागेवर येऊन बसला. मिचेलीची ल्युकेमिक अँटीजेन काढून त्याचं सौम्य मिश्रण उंदरांना टोचायची तयारी तो करू लागला ल्युकेमिक पेशी ठेवलेली व्हायल घेऊन त्यानं पाहिजे तेवढं द्रव्य काढून घेतलं. आणि मिश्रण तयार केलं. व्हायल नंतर फ्रीजमध्ये टाकली.

मिश्रण तयार झाल्यावर पुढचं काम त्यानं एलनला सांगितलं. तो म्हणाला, 'मी जरा वकिलाला भेटून येतो. तोवर तू उंदरांना ह्याचो इंजेक्शनं देऊन ठेव !'

तो बाहेर गेल्यानंतर पूर्ण पाच मिनिटांनी तिनं तो गेल्याची खात्री करून घेतली नि मग तिनं मॉरिसनला फोन लावला. चार्लस अजूनही स्वतःचंच काम करीत असल्याचं तिनं त्याला कळवलं.

'हेच ते. आता चार्लस इथं राहात नाही. अगदी कहर झाला !' मॉरिसन रागानं उत्तरला.

¤

चार्लस सरकारी गॅरेजमध्ये गाडी लावून वकिलांच्या इमारतीमध्ये शिरला. बाहेर बऱ्याच वकिलांची नावं पाहिली. 'कुणाला बरं भेटावं ? फार मोठा वकील म्हणजे मोठी फी, आणि उत्साह कमी ! शेवटी त्यानं एक नवीन आणि तरुण वकील निवडला.

जज्जांनी त्याचं मत ऐकून न घेता कॅथरिनला पालकत्व द्यावं याचं वकिलाला मोठं आश्चर्य वाटलं. त्यात पुन्हा चार्लसचं रक्ताचं नातं नि कॅथरिन सावत्र ! प्रथम वकिलालाही मोठा उत्साह वाटला; पण ज्या वेळी मिचेलीचे औषधोपचार बंद करायची इच्छा चार्लसनं बोलून दाखवली त्या वेळी त्याचा उत्साह मंदावला. रीसायकल कंपनीतही चार्लसचं वर्णन अयोग्य झालं असं त्यानं म्हटलं. त्यामुळं त्यांचा खटका उडून चार्लस निघून आला.

बाहेर येऊन आता कुणाला गाठावं असा विचार करीत असताना एका वकिलानंच त्याला फोन केला. आपल्याला आज कामच मिळालं नसल्याचं त्यानं सांगितलं. चार्लसनं लगेच त्याचा पत्ता घेतला नि तो निघाला. इमारतीत एकाच खोलीत दोन-तीन निरनिराळे व्यवसाय चालू असलेले दिसले. त्यातच हे वकीलमहाशय होते, बेन टॉमस !

'हं बोला तुमचं काय म्हणणं आहे,' बेननं त्याला सुचवलं.

तात्पुरत्या पालकत्वाच्या प्रकरणाची माहिती चार्लसनं त्याला सांगितली. चार्लसची सर्व हकीकत ऐकून घेतल्यावर तो म्हणाला, 'तूर्त ह्यात काही करता येईल असं दिसत नाही; पण केस तयार करायला थोडा वेळ हवा.'

चार्लसनं रीसायकल कंपनीची हकीकत सांगितली.

'हं ते काम मी ताबडतोब सुरू करू शकेन,' बेन म्हणाला, 'पण फी द्यावी लागेल.'

'मी तीन हजार डॉलरच्या कर्जाकरता अर्ज केला आहे,' चार्लस म्हणाला.

'नाही नाही माझी फी इतकी नाही; पण पाचशे डॉलर ?'

चार्लसनं, कर्ज मिळताच फी पाठवून देण्याचं आश्वासन दिलं. आणि तो इन्स्टिटयूटमध्ये परतला. 'चला रीसायकल विरुद्ध काम तर सुरू झालं प्रत्यक्षात काय व्हायचं ते होईल.'

इन्स्टिटयूटपाशी आल्या त्वरित दार उघडलं जाण्याऐवजी स्वागतिकेनं आपलं काम सावकाश पूर्ण करून मगच दार उघडलं. चार्लस पुढे जाता जाताच तिनं फोन उचलला. तिचं वर्तन चार्लसला अशुभसूचक वाटलं.

प्रयोगशाळेत कुणीच नव्हतं. त्यानं एलनला हाक मारली. उत्तर न आल्यानं प्राण्यांच्या कोठीत त्यानं डोकावलं; पण तिथंही ती नव्हती त्यानं घड्याळ पाहिलं. तेव्हा वाटलं ती जेवायला गेली असणार. आपल्या टेबलापाशी गेल्यावर पाहिलं तर ल्युकेमिक अँटीजेनचं मिश्रण तसंच होतं.

पुन्हा त्यानं श्रीमती अॅमेंडोलाबाईला फोन करून कुठवर काम आलं याची चौकशी केली. "आपल्याला हे एकच काम नाही!" असं म्हणून तिनं त्याला चापलं. "आणि आता मीच तुम्हाला फोन करीन तुम्ही तसदी घेऊ नका!" असा दमही भरला.

तेव्हा परिसर-संरक्षक-मंडळाच्या प्रमुखालाच त्यानं फोन लावला; पण प्रमुख सध्या बैठकीसाठी वॉशिंग्टनला गेले होते आणि आठवडाभर तरी येणार नव्हते असं त्याला कळलं !

मग त्यानं न्यू हॅंपशायर आणि मॅसॅच्यूसेट्स राज्यांच्या सरकारी कचेरीत फोन केला. पण सचिवपातळीच्या पुढं त्याला वर कुठं प्रगती करता येईना. तेव्हा त्यानं मॅसाच्युसेट्समधल्या डेमोक्रॅटिक पक्षाच्या सेनेटरला फोन केला. त्याच्या सचिवानं, सदर सेनेटर प्रदूषणाविरुद्ध किती धडपड करीत असतात यावर प्रचारी थाटाचं भाषण ऐकवलं. चार्लस त्याला काही सांगण्याचा प्रयत्न करणार इतक्यात पीटर मॉरिसननं त्याच्या प्रयोगशाळेत प्रवेश केल्याचं त्याला समजलं नी त्यानं फोन ठेवून दिला.

दोघेही परस्परांना जोखीत राहिले. मॉरिसननं आज आपल्या पोषाखाकडे विशेष लक्ष पुरवलं होतं उलट चार्लस, कपडे रात्रभर काम केल्यानं चुरगळलेले, दाढी वाढलेली, केस विसकटलेले, अशा अवस्थेत.

मॉरिसनच्या चर्येवर विजयी हास्य होतं; पण चार्लसनं तोंड वळवून पाहिल्यावर त्याच्या चेहऱ्यावरही हास्य दिसल्यानं तो चकित झाला.

"तावडतोब संचालकांच्या कचेरीत तू यावंस !" मॉरिसन म्हणाला, "आणि हे पहा दाढी नाही केलीस तरी चालेल!"

हा शेवटचा टोला मुद्दाम डिवचण्याकरता होता हे लक्षात येऊन चार्लस मोठ्यानं हसला.

"चार्लस, तू मोठा कठिण गृहस्थ आहेस बाबा!" मॉरिसन निघून जाता जाता म्हणाला.

मन स्वस्थ करून चार्लस निघाला. वाटेवर पूर्वीच्या संचालकांची तैलचित्रं लागली. त्यांच्याशी बोलल्यासारखं करीत वाकुल्या दाखवीत तो मजेत पुढे गेला. संचालकांची सचिव इव्हान्स दिसल्याबर तिच्याशी हास्य करीत, तिनं त्याला ओरडून थांबण्याची सूचना केली, तिकडेही दुर्लक्ष करीत तो दारापाशी आला आणि टकटकही न करता तो दार उघडून आत शिरला.

इबॅनेज नि मॉरिसन काही कागदपत्र पहात होते. चार्लसला पाहताच ते विस्मित झाले.

"हं बोला," जरा चढ्या सुरात चार्लस म्हणाला.

इबॅनेजला प्रथम काही सुचेना. त्यानं मॉरिसनकडं पाहिलं. त्यानं खांदे उडवले.

"तू थकलेला दिसतोस !" इबॅनेज म्हणाला.

"तुम्हाला माझ्याबद्दल इतकी काळजी वाटते हे समजून बरं वाटलं!" चार्लसनं लगेच चिमटा काढला.

"डॉ. मार्टेल, तुम्ही आम्हाला दुसरा मार्गच ठेवला नाहीये," जुळवाजुळव करीत इबॅनेज म्हणाला.

"म्हणजे ?" जणू काही नवीनच विषय आहे अशा थाटात चार्लस म्हणाला.

"काल तुला दिलेल्या सूचनेप्रमाणं आणि संचालक मंडळाच्या निर्णयानुसार तुला वाइनबर्गर रिसर्च इन्स्टिटयूटमधून बडतर्फ करण्यात आलं आहे!"

प्रयत्नानं संताप आवरत चेहऱ्यावर काहीही न दाखवता– तो उत्तरला, "ऐकलं मी!" आणि तो जाण्यासाठी वळला.

"एक मिनिट, डॉ. मार्टेल, माझं झालं नाही अजून !" चार्लस पुन्हा त्याच्याकडे वळला.

"तुझ्या भल्यासाठी एक सांगू इच्छितो. तुला ज्या संस्थेनं संशोधनाकरता मदत केली तिचं तू काही देणं लागतोस. निदान अशी भावना तू बाळगली पाहिजेस! संशोधक म्हणून मर्जीनुसार काम करण्याची तुम्हा लोकांना मुभा असेलही; पण संस्थेचं काम, परतफेड म्हणून करणं हीही तुमची जबाबदारी आहे."

"शक्य आहे." इबॅनेजच्या मनात मॉरिसनइतका दुष्टावा नाही असं त्याला वाटलं.


## Shewani
## Blouse Piece House

611, Sadashiv Peth, Kunte chowk Cross lane
Laxmi Road, Pune – 411 030

*Matching Specialists*

**Seperate Department for Dress Material**
**Absolute Matching To The Last Shade**

**Phone No : 34973**

" उदाहरणार्थ, रीसायकल कंपनीविरुद्ध तू काही तक्रार केली आहेस असं कळतं."

चार्लसची उत्कंठा वाढली.

" तुला माहिती असेल– नसेल, पण आपली इन्स्टिटच्यूट आणि रीसायकल कंपनी, ब्रॉयर केमिकल्स ह्या एकाच कंपनीवर पैशाकरता अवलंबून आहेत. तुझी काही तक्रार असलीच तर तू ती जाहीररीत्या करण्याऐवजी अंतर्गतरीत्या करून मार्गी लावू शकला असतास."

" रीसायकल कंपनी ज्या नदीत बेंझिन सोडत असते ती माझ्या घराजवळून जाते. परिणामी माझ्या मुलीला असाध्य असा ल्युकेमिया झालाय!"

" हा आरोप सिद्ध करता येणार नाहीच; पण तो बेजबाबदार आहे!" डॉ. मॉरिसन म्हणाला.

चार्लस संतापानं त्याच्याकडे निघाला. पण लगेच थांबला.

" चार्लस, मी तुला पुन्हा विनंती करतो की जरा तरी जबाबदारीनं वाग आणि आपलं काम बाजूला ठेवून कॅन्सरानचं काम मार्गी लाव!" इबेनेज म्हणाला.

चार्लस पुन्हा हो म्हणतो की काय अशी भीती मॉरिसनला वाटली; पण तो काही बोलला नाही.

" अशक्य ! माझ्या मुलीची अवस्था पाहता, निदान तिच्याकरता तरी मला स्वतःचंच काम चालू ठेवणं अत्यावश्यक आहे !"

" मी तुम्हाला म्हटलं नव्हतं' अशा आविर्भावात आणि समाधानानं मॉरिसननं इबेनेजकडे पाहिलं.

" तुझ्या संशोधनातून मुलीला वाचवण्याच्या मार्गाचा शोध वेळीच लागेल असं तुला वाटतंय का?"

" बहुतेक !"

पुन्हा मॉरिसन चुळबुळ करू लागला.

' ठीक आहे; पण हा तुझा भ्रम आहे,' इबेनेज म्हणाला. ' पण आम्हाला आता दुसरा पर्याय नाही. तुला आम्ही दोन महिन्यांचा पगार देऊ. तुझा वैद्यकीय विमा तीस दिवसपर्यंत चालू ठेवू; पण तुला दोन दिवसात प्रयोगशाळा खाली करून जावं लागेल. आम्ही दुसरी नेमणूक केली आहे आणि कॅन्सरानचं काम नवीन माणूस करणार आहे.'

' जाण्यापूर्वी मी काही गोष्टींचा खुलासा करू इच्छितो.' चार्लस म्हणाला, ' कॅन्सर रीसर्च इन्स्टिटच्यूट आणि औषध कंपनी यांची मालकी एकाच मंडळाकडे असणं हा गुन्हा आहे. कॅन्सरान हे त्याचं झगझगीत उदाहरण आहे. ते इतकं विषारी आहे की, सर्व चाचण्या व्यवस्थित होईतो माणसांवर त्याचा प्रयोग करणं घातक आहे आणि त्याचा उपयोग होऊ नये म्हणून मी हे सर्व प्रसिद्धीस देणार आहे.'

' बस, बस,' इबेनेजचा स्फोट झाला. टेबलावर हात आपटीत तो म्हणाला, ' ताबडतोब इथून चालता हो.'

' चार्लस,' तो जाण्यापूर्वी मॉरिसन म्हणाला, ' मला वाटतं तू एखाद्या मानसोपचारतज्ज्ञाचा सल्ला घ्यावास.'

मॉरिसनला लहान पोरासारख्या वाकुल्या दाखवीत तो बाहेर पडला.

' बाप रे! याला झालंय तरी काय!' हा माणूस मोठाच धोके-


# सुबोध, सोपे कालनिर्णय पंचांग

कालनिर्णय पंचांग लहान मुलालाही सहज समजते.

तिथी, नक्षत्रे, योग, करण इत्यादि नावे संक्षिप्त न देता कालनिर्णय पंचांगात ती संपूर्ण दिलेली असतात.

हिंदुधर्मविषयक काही शंकांची उत्तरे कालनिर्णय पंचांगात प्रतिवर्षी दिली जातात. उदा.

(१) हिंदू धर्मात अस्पृश्यता आहे काय ?
(२) हिंदूंचे देव खूप आहेत.
(३) नवीन विज्ञानाला हिंदू धर्म अंतर्भूत करून घेत नाही. हिंदू धर्म हा रूढिप्रिय धर्म आहे. इत्यादि.

ह्या शंकांची उत्तरे आणि इतर उपयुक्त भरगच्च माहितीसाठी शके १९०५चे

**" कालनिर्णय पंचांग " आजच विकत घ्या.**

किंमत फक्त दीड रुपया.

**सुमंगल पब्लिशिंग कंपनी**

१७२, मुं. म. ग्रंथसंग्रहालय मार्ग, मुंबई ४०० ०१४.

बाज आहे.'

'वस्तुस्थिती प्रसिद्धीस देईन असं तो जे म्हणाला त्याचा अर्थ काय असावा ?' मॉरिसननं विचारलं.

'काय सांगणार ? पण त्यामुळं कॅन्सरानला आणि इन्स्टिट्यूटला मोठाच धोका आहे; पण तूर्त आपण त्याला काढलंय असं सांगू नये. मुलीच्या आजारपणानिमित्त त्याला दीर्घ मुदतीची रजा दिलीय इतकंच जाहीर करावं.'

'मलीचा उल्लेख करू नये. त्यामुळं वृत्तपत्रांना चांगलीच संधी मिळेल. मग तेच चार्लसला भेटतील.'

'तुझं बरोबर दिसतंय. त्याला रजा दिलीय इतकंच जाहीर करावं.'

'पण तो स्वतःच वृत्तपत्राकडे गेला तर ?' मॉरिसन म्हणाला.

'तसं वाटत नाही. कारण त्याला वृत्तपत्रं आवडत नाहीत; पण तो गेलाच तर त्याची मनःस्थिती ठीक नसल्याचं आपण सांगू. म्हणून तर त्याला रजा दिली असं म्हणता येईल,' डॉ. इबॅनेज चिंतेच्या सुरात म्हणाला.

'माझा एक मित्र मानसोपचारतज्ज्ञ आहे. त्याला मी चार्लस-विरुद्ध केस तयार करायला सांगतो.' मॉरिसन म्हणाला.

'मला वाटतं माझ्याऐवजी तूच ह्या खुर्चीत बसायला पाहिजे होतास.' इबॅनेजनं कौतुक केलं की, टिंगल केली हे मॉरिसनला कळेना !

¤

जिना संथपणं उतरता-उतरता चार्लस डोकं खाजवू लागला, 'कसलं हे जग आहे की, नीतिमत्तेपेक्षा धंदा मोठा वाटतो आणि तोही धोकेबाज औषधांचा. बारा वर्षांच्या मुलीला असाध्य ल्युकेमियाला बळी पाडणाऱ्या ह्या समाजरचनेवर काहीच उपाय नसावा ना ?'

प्रयोगशाळेत तो शिरताच एलन त्याला म्हणाली, 'मला फार वाईट वाटतं चार्लस.'

'कशाबद्दल ?'

'तुला बडतर्फ केल्याबद्दल.'

अंतर्गत बातमीपत्र किती वेगानं काम करतंय याचं त्याला नवल वाटलं. 'आपल्याला चोवीस तासांचा अवधी दिल्याची माहिती निदान जुनी होती; पण हे म्हणजे फारच झालं.'

'अग, हे अपेक्षितच नव्हतं का ? पण कॅन्सरानचं काम मी करू शकणार नाही हे कळायला मात्र मला फारच उशीर झाला.'

'पण...'

'पुष्कळच गोष्टी करायच्या आहेत. एक म्हणजे...'

तो एकदम थांबला. 'नको. हिला विश्वासात घ्यायला नको. काही खात्री नाही कुणाची आता. सगळेच आपल्या विरोधात आहेत, तर मग आपण एकट्यानंच हा लढा द्यायचा,' असं त्यानं ठरवलं.

'एक काय ?' तिला वाटलं चार्लस आपली मदत मागणार आणि मागितलीच तर आपण द्यायची असं तिनं ठरवलं.

'एक म्हणजे तू आता वर जा. मी त्यांच्याशी बोलू इच्छित नाही. आणि म्हणावं माझी लॅबबुकं मला परत द्या. ओलीस ठेवण्याचा उपयोग न झाल्यानं बहुधा ते ती परत करतील.'

ती चकित झाली. दाराकडे ती पोचली तोच पुन्हा चार्लस तिला म्हणाला, 'बरं पण सकाळी तुला सांगितलेलं काम कुठवर आलं ?'

'विशेष काही झालं नाही. तू इथून गेलास त्याच वेळी मला कळलं की, तुला बडतर्फ करणार आहेत. मग त्याचा काय उपयोग ? मी तुझी लॅबबुकं घेऊन येते. मात्र इथून पुढं तुझ्या कामात मी नाही. मी आता घरी जाणार आहे.'

एलनही व्यवस्थापनाशी संगनमत करून आहे अशी त्याची खात्री झाली. 'बरं झालं तिला आपण काही सांगितलं नाही.' तो आपल्या कामाला लागला.

एलन जाताच त्यानं दाराला आतून कुलूप घातलं. बरीच रसायनं मोठ्या प्रमाणात साठवलेली होती. ती सर्व त्यानं छोट्या-छोट्या बाटल्यांत काढून घेतली. बाटल्यांवर लेबलं चिकटवून नीटपणं डब्यात भरली. नंतर तो प्राणिविभागात गेला. तिथं जवळजवळ तासभर मोडला. नंतर टेबलाच्या खणातून पूर्वीची टिपणं शोधून काढली. म्हणजे इबॅनेजनं जर लॅबबुकं परत केलीच नाहीत तरी बिघडणार नाही.

फोन वाजला. बँकेच्या अधिकाऱ्यांनी त्याचं कर्ज मंजूर झाल्याचं कळवलं. आपण स्वतः येऊन पैसे घेऊन जाऊ असं त्यानं बँकेला कळवलं. आपल्याला बडतर्फ केल्याचं बँकेला कळलं तर कर्ज हातात पडेलच असं नाही असं त्याला वाटलं नाही.

नंतर त्यानं वेन टॉमसला फोन करून कर्ज मंजूर झाल्याचं कळवलं आणि दुपारी त्याचे पाचशे डॉलर समक्ष घेऊन येत असल्याचं सांगितलं.

'छान; पण तुमच्याकडून फी यायच्या आधीच मी रीसायकल कंपनीला नोटीस पाठवली आहे.'

त्यानं दाखवलेल्या उत्साहाबद्दल चार्लसनं त्याला धन्यवाद दिले.

चार्लसचं काम संपतंय तोच दरवाजा उघडण्याचा कुणीतरी प्रयत्न करीत असल्याचं त्याच्या लक्षात आलं. ते न जमल्यामुळं किल्ली चालवून एलन आत आली. तिच्या मागं एक तरुण मनुष्य उभा होता. तिच्या हातात अर्धी आणि त्याच्या हातात अर्धी लॅब-बुकं होती.

'दरवाज्याला कुलूप तू घातलंस ?' तिनं विचारलं. त्यानं नुसती मान डोलवली. दोघांनी पुस्तकं टेबलावर ठेवली.

'हे डॉ. मायकेल किटिंजर. आताच त्यांची माझी ओळख झाली. हे कॅन्सरानचं काम करणार आहेत नि मीच त्यांची मदतनीस आहे.

मायकेलनं हात पुढं केला. 'मी तुमच्याबद्दल बरंच ऐकलं होतं. भेटून फार आनंद वाटला.'

चार्लसने धन्यवाद इतकंच म्हटलं.

**तुला बडतर्फ करणार आहेत. मग त्याचा काय उपयोग ?**

'वा: वा: काय सुंदर प्रयोगशाळा आहे!' डॉ. मायकेल इकडे तिकडे पाहात म्हणाला. 'पीयर्सनचा अल्ट्रासेन्ट्रिफ्यूज, अरे, आणि डिक्सनचा इलेक्ट्रॉन मायक्रोस्कोप, अरे! तुम्ही ही असली सुंदर. प्रयोगशाळा सोडली तरी कशी ?'

'मला त्यासाठी कुणी तरी मदत केली!' एलनकडे नजर टाकीत तो म्हणाला.

एलनने त्याची नजर चुकवली.

मी जरा प्रयोगशाळेत हिंडून पाहिलं तर तुमची काही हरकत नाही ना ?' मायकेल उत्साहानं म्हणाला.

'हरकत जरूर आहे.!'

'चार्लस!' एलन मधे पडली. 'डॉ. किंटिजर तर मित्रत्वाच्या नात्याने वागताहेत ना ? डॉ. मॉरिसननीच त्यांना खाली पाठवलंय.'

'मला कशाची पर्वा नाही. अजून दोन दिवस तरी ही प्रयोगशाळा माझी आहे नि मला आता प्रयोगशाळेत कुणीही नकोय. सगळे बाहेर जा पाहू सगळे.' चार्लस कर्कश आवाजात ओरडला.

एलनने किंटिजरला खूण केली आणि दोघंही झपाट्यानं बाहेर पडली.

'आपण एलन आणि डॉ. किंटिजरवर रागवायला नको होतं.' असं त्याला वाटलं; पण आता मात्र आपण नक्कीच एकटे आहोत याबद्दल त्याची खात्री झाली. आताच्या आपल्या रागवागावीमुळं आपली दोन दिवसांची मुदत कमी होते की काय इतकीच भीती होती. त्यामुळं आपला डाव लवकर शक्यतो आज रात्रीच अंमलात आणला पाहिजे असं त्यानं ठरवलं.

मग त्याचं मन शांत झालं त्यानं आपल्याला पाहिजे असलेली उपकरणं, रसायनं एकाच खोक्यात भरून घेतली नि तो बाहेर पडला.

इन्स्टिटयूटच्या दरवाज्याशी आल्यावर त्याने कु. अँड्र्यूजला हाय केलं. आपण लवकरच परत येत आहोत असंही तिला त्यानं सांगितलं. म्हणजे इव्हॅनेजला बातमी गेलीच तर फार वेळ आपण बाहेर आहोत असं त्याला वाटणार नाही.

बँकेत गेल्यावर तिथल्या बाईनं त्याच्याकडे संशयानं पाहिलं. चार्लसच्या लक्षात येताच तो हसत म्हणाला, 'अहो मी आहे शास्त्रज्ञ कपड्याकडे बघायचं म्हणजे...' त्याने मुद्दामच वाक्य अर्धवट सोडलं शिवाय त्याने आपलं लायसन्स नि ओळखपत्र ह्यावरील फोटो दाखविल्यामुळं तिचा नाइलाज झाला.

पैसे घेऊन तो बाजारात आला आणि आपल्या बंदुकीसाठी त्याने शंभर गोळ्या मागितल्या. दुकानदाराने सहजपणं विचारलं, 'कशाकरता हव्यात ?'

'पाखरं, हो. फार त्रास देतात.'

पैसे देऊन तो बाहेर पडला आणि मॅसाच्युसेट्स जनरल हॉस्पिटलमध्ये आला. तिथं त्याने अनेक रसायनं, इंजेक्शनच्या पिचकाऱ्या सुया, प्लॅस्टिकच्या नळ्या असं प्रचंड साहित्य घेतलं.

तेथून तो वेन टॉमसकडे गेला आणि त्याच्या हातात त्याने कोऱ्या करकरीत पाच नोटा ठेवल्या.

'अरे यार!' तो मजेत म्हणाला, 'आता कसं मस्त काम जमवतो की बस! रीमायकल कंपनीवर उद्याच स्थगितीची नोटीस लागेल.'

नंतर भाड्याच्या गाड्या पुरवणाऱ्या दुकानात जाऊन त्यानं एक प्रचंड अशी वॅगनगाडी भाड्यानं घेतली नि वाइनबुर्गर इन्स्टिटयूटपासून थोडीशी दूर लावली. आपल्या गाडीतलं रसायनादी साहित्य व बंदुकीच्या गोळ्या वगैरे सर्व त्यानं त्या वॅगनमध्ये ठेवलं आणि तो इन्स्टिटयूटमध्ये आला.

त्यानं घड्याळाकडे पाहिलं, 'लवकरच अंधार पडेल. तोवर थांबायला हवं.

¤


## पारेख इलेक्ट्रॉनिक्स

**१६-सी, डॉ. आंबेडकर रोड, पुणे-१**

**फोन : २३६८१**

**नवीन आलेल्या गझलांच्या कॅसेटस्**

(१) गुलाम अली (२) मेहंदी हसन
(३) जगजितसिंग चित्रासिंग (४) अनुप जालोटा
(५) पंकज उदास.

**कथा-कथनाच्या प्री-रेकॉर्डेड कॅसेटस्**

(१) पु. ल. देशपांडे (२) व. पु. काळे
(३) व्यंकटेश माडगुळकर (४) द. मा. मिरासदार
(५) शंकर पाटील

**शास्त्रीय संगीत**

(१) बिस्मिल्ला खाँ–सनई (२) रविशंकर–सतार
(१) शिवकुमार शर्मा–संतुर
(२) अमजदअलीखाँ–सरोद
■ प्रभा अत्रे ■ परवीन सुलताना व इतर

## त्रिमूर्ति सहकारी बँक लिमिटेड

**१९०९, सदाशिव पेठ, बाजीराव रोड,**
**नातू बाग, पुणे ४११ ०३०**

**फोन : ४४१३२६**

**वैशिष्टये–**

(१) रात्री आठ वाजेपर्यंत चालू असणारी पुण्यातील एकमेव सहकारी बँक.
(२) बुधवारी साप्ताहिक सुट्टी असल्याने इतर सुट्टीचे दिवशी बँकेची सेवा उपलब्ध.
(३) ठेवी १ कोट ४० लाखाचे घरात.
(४) शेअर कॅपिटल ८ लाखांचे घरात.
(५) सभासद ४५०० चे वर.
(६) तुरंत सेवा व सौजन्यपूर्ण वागणूक ही तर आमची वैशिष्टये.

**म. भ. कुलकर्णी** जनरल मॅनेजर
**निळुभाऊ लिमये** व्हा. चेअरमन
**का. गं सोनार** चेअरमन

## बारा

कॅथरिन मिचेलीच्या उशाशी बसून होती. 'चार्लस अजून कसा नाही आला ?' स्वत:शीच ती बोलली. चार्लसला फोन करायचा विचार तिच्या मनात अनेकदा आला; पण दर वेळी तिनं तो सोडून दिला. गिनाचा तर उपयोग होण्यापेक्षा उपद्रवच जास्त. हा प्रसंग म्हणजे कॅथरिनला उपदेश करण्याची तिला आयती संधीच. 'बिजवराशी नि इतकी मुलं असलेल्याशी लग्न म्हणजे असेच हाल व्हायचे.' असलं काहीबाही ती एरवीसुद्धा बोलत राह्यची.

मिचेली एकदम कण्हली.

'काय झालं ?' तटकन् उठून कॅथरिन म्हणाली.

तेवढ्यात तिचं अंग एकदम पिळवटल्यासारखं झालं आणि असह्य वेदनेनं ती ओरडली.

कॅथरिन धावतच खोलीबाहेर आली आणि तिनं नर्सला बोलावलं. तिनं डॉ काइत्समानना निरोप दिला.

मिचेलीच्या कॉटपाशी येऊन कॅथरिन पुन्हा उभी राहिली. आपण पालकत्वाचा अर्ज करून फार मोठी चूक केलीय असं तिला वाटू लागलं. पण आता काही उपयोग नव्हता. चार्लस आलेला नाही, आपण काहीही मदत करू शकत नाही अशा अगतिक अवस्थेत ती सापडली.

डॉ. काइत्समान जवळच असावेत. कारण निरोप मिळताच ते आले. त्यांनी पाहिलं मॉनिटर ठीक होता. म्हणजे हृदय नियमित होतं. तिचं पोट दाबून पाहिल्यावर नर्सशी ते काही तरी हळू आवाजात बोलले नि ती बाहेर पळाली.

'आतड्यात गॅसचं प्रमाण वाढलंय. एक इंजेक्शन देतो. त्यानं एकदम बरं वाटेल !' ते कॅथरिनला म्हणाले.

कॅथरिन थकून खुर्चीत बसली होती. तिचा विदीर्ण चेहरा बघून ते म्हणाले, 'जरा माझ्याबरोबर बाहेर येता ?' मिचेलीला झोप लागली आहे असं पाहून ती बाहेर आली.

'कॅथरिन, मला तुमची काळजी वाटते. तुमच्यावर फारच ताण आहे !' कॅथरिन काही बोलली नाही. त्यांनी पुढे विचारलं, 'चार्लस आले होते ?'

तिनं नुसताच सुस्कारा सोडला.

'तुम्हाला वाईट वाटणं साहाजिक आहे; पण तुम्ही केलंयत ते बरोबरच आहे !'

त्यावरही ती काही बोलली नाही.

'दुर्दैवानं अजून भीती संपलेली नाही नि मिचेलीची प्रगतीही समाधानकारक नाही. आमच्या औषधांचा काहीही परिणाम दिसत नाही. ल्युकेमिका पेशींची संख्या अजून हटली नाही. तिचा ल्युकेमिया जबरदस्त दिसतोय. आयुष्यात मी इतका कडक ल्युकेमिया पाहिला नाही; पण मी आशा सोडलेली नाही. आता आम्ही दुसरं एक औषध वापरून पाहणार आहोत. त्याचा चांगला परिणाम झाल्याचा अनुभव आहे. दरम्यान एक विचारायचंय की, उद्या तुमची दोन्ही मुलं इथं येऊ शकतील का ? बहुधा अस्थिमज्जा-रोपण करावं लागेल !'

'येतील !'

'छान ! अरेच्चा ! तुम्हाला बरंच लागलंय की !'

'चार्लसनं मुद्दाम नाही केलेलं हे .'

'चार्लसनं मला काल फोन केला होता.' डॉ. काइत्समान म्हणाले.

'खरं सांगता ? कुठून ?'

'इथूनच. हॉस्पिटलमधूनच.'

'काय म्हणत होता तो ?'

'बेंझिनमुळं ल्युकेमिया होतो असं मी म्हणायला तयार आहे का असं विचारीत होतो; पण तसा पुरावा अजून मिळत नाही. शेवटी मी त्याला मानसोपचारतज्ज्ञाला भेटण्याचा सल्ला दिला.'

'मग तो काय म्हणाला ?'

'त्यानं काहीच प्रतिसाद दिला नाही. त्याच्यावरचा ताण पाहून मला त्याचं कसं होईल याची काळजी वाटते. भिऊ नका तुम्ही; पण अशा वेळी माणसं बेफाम होण्याची शक्यता असते. तुम्ही शक्यतो लवकर त्याला मानसोपचारतज्ज्ञाकडे न्यावं हे बरं '

मिचेलीच्या खोलीकडे येता येता तिला फोन दिसला. फोन करावा की नाही असा विचार करीत असता शेवटी तिनं फोन केलाच.

इन्स्टिटच्यूटच्या फोनऑपरेटरनं तिला सांगितलं, 'प्रयोगशाळेत फोन कुणी उचलत नाही; पण चार्लसची सहाय्यक कु. एलन शेल्डन ग्रंथालयात आहेत. त्यांच्याशी बोलायचं असेल तर जोडून देतो.'

'म्हणजे तो प्रयोगशाळेत नाही ?' एलननं विचारलं.

'फोन कुणी घेत नाही', असं ऑपरेटर म्हणाला.

'तोच दुर्लक्ष करीत असेल. अलीकडे तो विचित्रच वागतोय.

With Best Compliments from

NATIONAL PAPER MART

867 (New) Budhwar Peth,
Pune 411 002

मलाच त्याच्याकडे जायला भीती वाटते. तुम्हाला कळलं ना त्याला बडतर्फ केलंय ते ?'

'मला काही कल्पना नाही.' तिला धक्का बसला. 'काय झालं?

'ती एक फार मोठी कथाच आहे; पण माझ्यापेक्षा चार्लसकडूनच तुम्हाला कळलेलं बरं.'

'त्याच्यावर फार जबरदस्त ताण आहे.'

'मला कल्पना आहे,' एलन म्हणाली.

'पण तुमची भेट झाली तर मला फोन करायला सांगाल का ?'

एलननं कबूल केलं; पण आपली भेट होण्याची शक्यता नाही, असंही तिनं सुचवलं.

मग तिनं घरी फोन केला. तो कुणीच घेतला नाही. 'कुठं गेला असेल चार्लस ?' तिची चिंता वाढत चालली.

मिचेलीच्या खोलीत येता येता ती विचार करू लागली. 'का बडतर्फ केलं असेल ?' तिनंही इन्स्टिटयूटमध्ये पूर्वी काम केलं होतं आणि तो केवढ्या मोठ्या दर्जाचा शास्त्रज्ञ आहे याची तिला माहिती होती. 'नर्वस ब्रेकडाउन झाल्यामुळं तर नसेल ना ? डॉ. काइत्स-मानचं बरोबर वाटतंय.'

'ती खोलीत शिरल्यावर मिचेलीनं विचारलं, 'डॅडी कुठायत ?'

त्यांना बरं नाही ना म्हणून ते घरी थांबलेत.' काहीही न सुचून तिनं उत्तर दिलं.

'पण काल रात्री मला तर म्हणाले की मी उद्या येईन !' ती म्हणाली.




'जमलं तर येतीलच की ?'

मिचेलीच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले. 'आता मी मेले तर बरं !'

'नाही, नाही. मिचेली असा विचारसुद्धा करू नकोस !' कॅथरिननं घाबरून म्हटलं.

¤

हळूहळू इन्स्टिटयूटमधून सर्वजण जाऊ लागले. साडेसहा वाजता इवॅनेजही बाहेर पडला. तरीही काळजी घ्यायची म्हणून चार्लस सातनंतरही गाडीत बसून राहिला. वॅगनगाडी त्यानं इमारतीच्या मागच्या बाजूला आणली. तिथून त्यानं रक्षकाला हाक मारली.

'कोण ?' त्यानं विचारलं.

'मी डॉ. मार्टेल. मला काही साहित्य न्यायचंय.'

थोड्या वेळानं दार करकरलं आणि चेस्टर विली नावाचा रक्षक प्रमुख बाहेर आला. चार्लस अनेकदा उशीरापर्यंत काम करीत बसे हे त्याला माहीत होतं आणि त्यामुळं रात्रपाळीच्या बऱ्याच रक्षकांशी त्याची जानपछान होती.

'रात्रीचंही काम करणार का ?'

'काय करणार, आता सध्या MIT बरोबर एकत्रित काम चालू आहे. त्याचसाठी काही साहित्य न्यायचंय. आणि मला दुसऱ्यावर विसंबलेलं आवडत नाही,'

'तुमचं बरोबर आहे साहेब.'

त्यानं सुटकेचा निःश्वास टाकला. 'आपल्याला काढल्याचं त्याला अजून माहिती नाही हे बरं झालं.'

तो प्रयोगशाळेत आला. आपण गेल्यानंतर कुणी काही गडबड केलेली नाही हे पाहून त्याला समाधान वाटलं. बरोबर आणलेल्या खोक्यात त्यानं एका बाजुला ठेवलेली उपकरणं, रसायनं भरली आणि रक्षकांच्याच मदतीनं खाली आणली. शेवटी त्यानं मिचेलीच्या ल्युकेमिक पेशींची बाटली नीटपणं बर्फात गुंडाळून घेतली आणि काळजीपूर्वक खाली आणली. चेस्टर आणि बाकीचे रक्षक ह्यांनी सर्व साहित्य वॅगनमध्ये व्यवस्थित भरलं.

चार्लस पुन्हा वर आला. त्याने चांगली दाढी केली. आणि कपडे केस व्यवस्थित करून एप्रन घेऊन तो खाली आला.

शेवटपर्यंत त्याचं हृदय धडधडत होतं. बिचाऱ्यांना कल्पना नाही आपण काय करतोय ते, त्याला रक्षकांबद्दल कीव वाटली. गाडीत बसून त्यानं त्यांचे आभार मानले नि तो निघाला.

गाडी घेऊन तो बालरुग्णालयाशी आला नि गाडी थोडीशी दूर लावून तो पुढं आला. आपला गरम कोट गाडीतच ठेवून त्यानं एप्रन अंगावर घातला.

आत शिरताच त्यानं तिथल्या लिपिकाला क्ष–किरण विभाग कुठं आहे असं विचारलं. त्यानं दुसऱ्या मजल्यावर असल्याचं सांगताच त्याला धन्यवाद देऊन तो वर आला. वाटेत भेटलेल्या रक्षकाला त्यानं हसून प्रतिसाद दिला.

क्ष–किरण विभागात जवळजवळ कुणीच नव्हतं. तो थेट आत गेला आणि त्यानं क्ष–किरण चित्रासाठी भरण्याचा फॉर्म मागितला. तिथल्याच टेबलापाशी बसून त्यानं फॉर्म भरला, 'मिचेली मार्टेल, वय १२, निदान ल्युकेमिया, क्ष–किरण–चित्र आवश्यक, अवयव पोट.'

रेडिऑलॉजिस्टांची यादी समोरच होती. त्यातलंच एक नाव वाचून त्यानं त्या नावानं सही केली.

शजारच्या खोलीतील ढकलायचा एक स्ट्रेचर बाहेर काढला. त्याच्यावर उशा पांघरूण त्यानं अशा रीतीनं मांडली की वाटावं कुणी पेशंटच आहे. ढकलगाडी घेऊन तो लिफ्टपाशी आला आणि ढकलगाडी आत आणून सहा नंबरचं बटन दाबून वर आला.

पुन्हा त्याचं हृदय धडधडू लागलं. आतापर्यंत सगळं ठीक झालं; पण कुठं काही गडबड होऊन कुणाला संशय आला तर! कारण आतापर्यंतचं काम सोपं होतं. आताच खरी परीक्षेची वेळ होती.

सगळीकडे शुकशुकाट होता. पेशंट म्हणजे लहान मुलंच असल्यानं सगळ्यांना झोपवलं होतं. तुरळक काही पालक बोलत होते. चार्लसनं ढकलगाडी नर्सेच्या खोलीवरून आणताना आवाज कमी व्हावा म्हणून सावकाश नेली; पण आवाज मुळीच कमी झाला नाही. डोळ्यांच्या कोपऱ्यातून त्यान पाहिलं. तर एकच नर्स होती. आणि तिनं आवाजा कडे लक्षही दिलं नाही.

पण तेवढ्यात ती उठली आणि म्हणाली, 'मी मदत करू का?'

'नको आताच मी क्ष–किरण–विभागातून आलो.' शांत राहण्याचा प्रयत्न करीत तो म्हणाला.

'पण क्ष–किरण-चित्राचं ठरलेलं नाही.

'पण हे काम तातडीचं होतं.

'आमच्या पुस्तकात तर कुठं नोंद नाही दिसत.'

'हा काय फॉर्म भरलाय.'

तिनं फॉर्म वाचला नि मान हलवली. 'पण आम्हालाही कळवायला हवं होतं त्यांनी.'

'नक्कीच; पण नेहमी असंच चालतं.'

'ठीक आहे उद्या सकाळी मी दिवसपाळीच्या लोकांना विचारीन.

'बरोबर.'

नर्स खोलीत परतली.

चार्लस मात्र घामाघूम झाला होता. तो वेगानं निघाला. नर्सनं डॉक्टरांना किंवा क्ष–किरण–विभागाला फोन केला नाही म्हणजे झालं.

तो मिचेलीच्या खोलीपाशी आला. दार किलकिलं करून त्यानं पाहिलं तर मिचेलीच्या कॉटपाशी कॅथरिन बसलेली होती. पटकन त्यानं दार लावलं नि ढकलगाडी जरा लांब उभी करून तो स्वस्थ राहिला. 'कॅथरिननं आपल्याला पाहिलं की नाही हे त्याला कळेना.

आता ह्या वेळी कॅथरिन इथं असेल अशी कल्पना मात्र त्याला आली नाही. आता तिला कशी बाहेर काढायची याचा विचार तो करू लागला.

बराच वेळ झाला तरी कॅथरिन बाहेर यायची चिन्हं दिसेनात. मग तो शस्त्रक्रिया विभागाजवळील खोलीत आला. तियल्या कपाटातील एक मास्क आणि टोपी तोंडाला आणि डोक्याला बांधली. तिथून तो टोकाशी असलेल्या फोनपाशी गेला आणि नर्सेसच्या खोलीत त्यानं फोन केला. फोनवर आलेल्या नर्सला त्यानं कॅथरिनला तातडीनं बोलवायला सांगितलं. तिनं थांबायला सांगताच त्यानं फोन खाली ठेवला नि तो वाट पहात थांबला. नर्सनं कॅथरिनला दिलेला निरोप मिळून ती बाहेर आलेली त्यानं पाहिलं. चार्लस धावतच मिचेलीच्या खोलीपाशी आला आणि त्यानं ढकलगाडी खोलीत नेली.

ढकलगाडी मिचेलीच्या कॉटपाशी आणून लावली आणि त्यानं मिचेलीला हाक मारली.

'मिचेली!'

तिनं हळूच डोळे उघडले. 'अग राणी, मी आलोय, बघ तरी!' त्यानं तिला हलवलं. वेळ फार थोडा होता.

'तुम्ही येणार मला माहिती होतं,' तिनं त्याच्या गळ्यात हात टाकीत म्हटलं.

'आता ऐक. हे लोक तुझी चांगली काळजी घेताहेत. तरीसुद्धा तुला बरं वाटत नाहीये. मी तुला आता नेणार आहे; पण डॉक्टरांना हे आवडायचं नाही. तर तू येणार का?'

'कॅथरिन म्हणाली की तुम्हाला बरं नाही?'

'तू जवळ असलीस की माझं ठीक असतं; पण आता गप्पा मारायला वेळ नाही. येणार का?'

तिला हवंच होतं! 'तुमच्याबरोबर मला घेऊन चला!'

चार्लसनं मग शिरेतली इंजेक्शनं काढून टाकली.

मॉनिटर काढला नि तिला हलकेच ढकलगाडीवर चढवलं.

कपाटातून तिचे कपडे काढून तिच्या पांघरुणाखाली लपवले. तिच्याही डोक्यावर एक फडकं बांधलं आणि गाडी खोलीच्या बाहेर काढली!

आता नर्सेसच्या खोलीवरून जाणं म्हणजे कठिण परीक्षा होती. कॅथरिननं पाहिलं तर सगळंच संपलं!

¤

नर्सनं खांद्याला हात लावला त्या वेळी कॅथरिन खुर्चीत गाढ झोपली होती. तिला तातडीचा टेलिफोन आल्याचं नर्सनं सांगताच ती धडपडत उठली आणि डोळे चोळत नर्सेसच्या खोलीशी आली; पण ती खोलीत आली तर कुणीच नव्हतं. त्यामुळं कोणता फोन उचलायचा हे तिला कळेना. प्रत्येक फोन उचलून तिने 'हॅलो' म्हटलं; पण उत्तर नाही. शेवटी तिनं हॉस्पिटल ऑपरेटरला विचारलं, 'कुणाचा फोन होता?'

ऑपरेटरला काहीच माहिती नव्हतं. तो म्हणाला, 'कुणी तरी श्रीमती मार्टेल पाहिजेत, तातडीने बोलवा, असं सांगितलं.'

शेवटी ती बाहेर आली. तेव्हा समोरून एप्रन घातलेली तोंडावर नि डोक्यावर पांढरी फडकी बांधलेली एक आकृती झपाट्यानं पेशंटला घेऊन येताना दिसली. तातडीच्या शस्त्रक्रियेसाठी लहान मुलाला नेत असावेत अशा कल्पनेनं तिला त्या 'बिचाऱ्या' पोराची कीव आली!

पुन्हा ती नर्सेसच्या खोलीत आली तर तिला निरोप देणारी नर्स भेटली. तिनं म्हटलं, 'फोनवर कुणीच बोललं नाही!'

'विलक्षण! कारण बोलणाऱ्यानं अगदी घाई केली होती!'

**आता नर्सेसच्या खोलीवरून जाणं म्हणजे कठिण परीक्षा होती.**

'पुरुष की स्त्री ?'
'पुरुष.'
'चार्लस असेल का ? स्थानिक होता की दूरचा !'
'ते नाही सांगता येणार !'
'मी इथून फोन करू का ?'
'तशी आम्ही सहसा परवानगी देत नाही; पण तुम्ही करा !'
मग तिनं घरी फोन लावला आणि गिनाला विचारलं.
ती म्हणाली, "तुला खायला काय करू ?'
'मला भूक नाही.'
'तरी पण खाल्लं पाहिजे.'
'चार्लसचा फोन आला होता ?'
'छे !' विचित्र आवाज करीत गिना म्हणाली.
'चक कसा आहे ?'
'तो इथंच आहे नि बरा आहे.'
'तू कधी घरी येणार ?' चकनं विचारलं.
'मिचेली आता झोपलीय. तिला बरं वाटलं की मी येईन !'

कुणाचा फोन हे काही उमगेना. बहुधा चार्लसचा असावा. तिला चुटपुट लागली. ती खोलीत परत आली आत फारसा उजेड नव्हता. तिनं दार घट्ट लावलं आणि ती खुर्चीत बसली. तिचं लक्ष कॉटकडे गेलं नि ती उडालीच !

मिचेलीचं अंथरुण रिकामं ! तिला वाटलं मिचेली कॉटच्या पलीकडे पडली असावी. म्हणून ती धावत पलीकडे आला; पण तिथं मिचेली नव्हती. तिनं झटकन दिवा लावला. तेव्हा तिला कळलं की मिचेली खोलीत नाहीच !

धावतच ती बाहेर आली नि ओरडू लागली, "धावा, धावा, मिचेली खोलीत नाही !"

नर्सेसच्या खोलीत बसलेल्या एकीनं कॅथरिनचा आवाज ओळखला. "मार्टलबाईचा आवाज !" ती म्हणाली आणि धावत बाहेर आली.

'अहो, मला फोन आला तेव्हा मिचेली शांत झोपली होती आणि आता ती अंथरुणात नाही !'

'पण ती इतकी अशक्त झाली होती की स्वतःहून जाणं शक्यच नाही !' नर्स म्हणाली. तिला वाटलं कॅथरिन खोटं बोलतेय म्हणून ती पुन्हा मिचेलीच्या खोलीत आली नि तिनं बाथरूमचं दार उघडून पाहिलं. मिचेली तिथंही नव्हती !

नर्सनं ताबडतोब रक्षक-विभागाला कळवलं आणि बारा वर्षांच्या मुलीला कुणी पळवतं की काय तिकडे लक्ष ठेवायला सांगितलं.

'मार्टल, क्ष–किरण–चित्र काढण्यासाठी नेलेल्या मुलाचं नाव काय ?' एका नर्सनं विचारलं,

कॅथरिनला प्रश्नाचा अर्थच कळेना.

नर्सनं क्ष–किरण–विभागाला फोन केला. "तुम्ही आता जे तातडीचं क्ष–किरण–चित्र घेत आहात त्या पेशंटचं नाव काय ?

'आम्ही आता कोणताही पेशंट बोलावलेला नाही !' तंत्रज्ञानं उत्तर दिलं, "पण जॉर्ज नावाच्या एका पेशंटला आत्ताच थिएटर–मध्ये नेलं आहे. त्याचं असेल," असं म्हणून त्यानं फोन ठेवला.

चार्लसनं मिचेलीची गाडी ढकलत परीक्षाविभागात आणली. दारं बंद करून त्यानं झटपट कामाला सुरुवात केली.

नंतर त्यानं तिच्या कपाळाला बँडेज बांधलं.

तुला अपघात झालाय असं वाटलं पाहिजे ना म्हणून.' बांधून झाल्यावर त्यानं दुरून पाहिलं. आणि तो म्हणाला, 'वा: झकास जमलंय बरं का ! आता तू अपघात झालेल्या मोटारसायकलवाल्याप्रमाणं दिसतेस.' मिचेलीला पुन्हा हसू फुटलं.

तिचं वजन खूपच असावं अशा थाटात त्याने तिला उचललं नि तो बाहेर आला. झोपलेल्या मुलांच्या आया आता गप्पा मारीत होत्या. त्यांच्या गराड्यातून जाताना कुणाच्या लक्षात आलं नाही. भेटलेल्या एक नर्सला त्यानं हसून 'धन्यवाद !' म्हटलं. तिनंही हसून प्रतिसाद दिला.

'आता मुख्य दरवाज्यातून निसटलो की झालं.' तिथं आल्यावर तो मुद्दाम थांबला. रक्षकाने विचारलं 'बेबीला आता कसं काय वाटतंय !' चार्लसनं, 'आता खूपच बरी आहे ती.' असं उत्तर दिलं आणि तो सटकला.

मग मात्र तो जवळजवळ धावतच वॅगनपाशी आला तिला त्यानं स्वतःजवळच्या बैठकीवरच झोपवलं नि गाडी काढली.

¤


*With Best Compliments From*

**KIRLOSKAR PNEUMATIC CO. LTD. PUNE 411 013**

Leading manufacturers of a wide range of Air and Gas Compressors, Pneumatic Tools, Air Conditioning and Refrigeration and Hydraulic Transmission.

PHONE : 70133/70341 GRAM : SANJAY, TELEX : 0145-246, : 0145-306

## तेरा

काय करावं हे कॅथरिनला कळेना. आपण मिचेलीला सोडून न जाता खोलीतच फोन मागवायला हवा होता, असं तिला वाटू लागलं. तिला एकदम मिचेलीचं वाक्य आठवलं, 'मी मेले तर बरं होईल !' आणि त्या वाक्यानं तिचा पिच्छाच पुरवला. मिचेली स्वतःचं काही बरं-वाईट करू शकणार नाही असंही वाटत होतं; पण खात्रीही वाटत नव्हती.

नर्सेसच्या खोलीपाशी येऊन तिनं विचारलं, 'काही कळलं का हो ?'

'अजून नाही. मी सगळ्या रक्षकांना सूचना दिल्या आहेत; पण मला नक्की आठवतं, क्ष–किरण–चित्राच्या फॉर्मवर मार्टल हेच नाव होतं. मी त्या विभागाला फोन केलाच आहे.'

'आता अर्धा तास झाला की, पुन्हा फोन करता का ? मला भीती वाटते.'

त्रासिक चेहऱ्यानं तिनं सांगितलं की तो तंत्रज्ञ थिएटरमध्ये गेलाय नि आता परत तोच फोन करणार आहे.

भीतीनं आणि रागानं ती गळाठून गेली. किती बेपर्वा आहेत हॉस्पिटलचे लोक ! पण राग दाखवायचीही सोय नव्हती. उलट, 'धन्यवाद' असं म्हणून ती बाहेर आली.

खोलीत जाऊन ती पुन्हा बाहेर आली आणि ओरडली, 'माझ्या मुलीचे कपडेही दिसत नाहीत !'

नर्सनं सांगितलं, 'आमचं काम संपवून मी येतेच.'

कॅथरिन रागानं मागं फिरली. या लोकांना प्रसंगही कळत नाही; पण कपडे नाहीत याचा अर्थ मिचेली हॉस्पिटलमधून बाहेर गेलीय. फोन चार्लसचाच असला पाहिजे आणि आपल्याला खोलीच्या बाहेर काढण्याचाच त्याचा उद्देश असला पाहिजे. अरे देवा! म्हणजे मगाचा तो ढकलगाडी नेणारा माणूस चार्लस ? आणि ढकलगाडीवर ? मिचेली ? बरोबर उंची, जाडी. चार्लसच ! नक्कीच !'

ती पुन्हा नर्सेसच्या खोलीकडे धावली. मिचेलीला चार्लसनंच पळवलंय, याबद्दल तिची खात्री झाली.

◻

'हं, आता पुन्हा एकदा पाहू,' बोस्टनचा पोलीस अधिकारी विल्यम कर्नी म्हणाला, 'नर्सनं ज्या वेळी तुम्हाला उठवलं तेव्हा तुम्ही इथं झोपला होता.'

'होय हो,' अशा गतीनं चौकशी व्हायला लागली तर बघायलाच नको. 'काय घडलं ते मी तुम्हाला दहा वेळा सांगितलंय. माझी मुलगी कुठं गेली याचा शोध तुम्ही करणार आहात की नाही ?'

हॉस्पिटलचे सेवक, काही अधिकारी, पोलीस यांची गर्दी झाली होती मिचेलीच्या खोलीत

'खोलीच्या बाहेर तुम्ही किती वेळ होतात ?'

'मी तुम्हाला सांगितलंय. पाच किंवा दहा मिनिटं. मला नक्की सांगता येणार नाही.'

दुसरा पोलीस अधिकारी म्हणाला, 'हा मूल पळवण्याचाच प्रकार आहे. प्रश्नच नाही!' पण त्याला पीनल कोडाचा नंबर आठवेना! तो डोकं खाजवू लागला.

'तुम्ही पण काही करू शकणार नाही का ?' हॉस्पिटल अधिकाऱ्याकडे वळून ती म्हणाली.

'आमच्या परीनं आम्ही शोध घेतोच आहोत की आणि पोलिस आलेच आहेत.'

'पण उशीर झाला तर तिला धोका आहे हो !'

'ढकलगाडीवरून मुलाला नेताना तुम्ही पाहिलं ?' पुन्हा पोलीस अधिकाऱ्यानं विचारलं.

'होय. होय. होय !' कॅथरिन ओरडली.

तास-दीड तास ह्या पद्धतीनं सगळ्या माणसांची चौकशी चालली होती.

तेवढ्यात डॉ. काइत्समान आले. त्यामुळं तिला बरं वाटलं. पुन्हा एकदा त्यांना सर्व हकीकत ऐकवण्यात आली.

'हे भयंकर आहे. मला वाटतं डॉ. चार्लस मार्टलना नर्व्हस ब्रेकडाउनसारखं काहीएक झालं असावं.' ते म्हणाले.

'औषधोपचाराशिवाय किती दिवस गेले तर चालतील ?' कॅथरिननं विचारलं.

'काही दिवस किंवा काही आठवडे, बस! पण खरं म्हणजे आज आम्ही नवीन औषध देऊन पाहणार होतो. अजूनही संधी गेली नव्हती.'


For Industrial Electric

◻ OVENS ◻ FURNACES ◻ DEGREASING TANKS

**CLEAN ENERGY SYSTEMS**

24 Gultekdi Industrial Estate, Poona 37

'आता हा रिपोर्ट पुरा करतो आणि डिटेक्टिव सोडतोच सगळीकडे ! पोलीस-प्रमुख म्हणाला.

¤

कॅथरिननं डोळे उघडले तेव्हा तिला आसपास सर्व परिचित दृश्य दिसलं; पण तिच्या प्रथम काही ध्यानात येईना. हळूहळू तिच्या लक्षात कालपासूनचे प्रसंग येऊ लागले आणि रात्री आपण गिनाच्या घरी परत आलो हे आठवलं. तिनं घड्याळ पाहिलं 'नऊ!' ती चटकन उठली आणि धावतच स्वयंपाकघरात आली. 'चार्लस आला होता ?' तिनं गिनाला विचारलं.

'नाही; पण तुझा नाश्ता तयार आहे.'

'आणखी कुणाचा फोन ? हॉस्पिटलचा ? पोलिसांचा ?'

'कुण्णाचा नाही. बघ आज मी काय केलंय ते.'

'मला भूक नाही.'

'थोडी बिस्किटं तरी खा.'

'चकला उठवते.'

'तो केव्हाच उठून, खाऊन शाळेत गेलाय.'

इतके दिवस- चकला उठवून शाळेला पाठवायचं म्हणजे रोजचं दिव्य असे; पण आज तो आपणहून गेला होता !

विचाराच्या नादात तिनं एकदम कॉफीचा घोट घेतला नि तिचं तोंड भाजलं. म्हणून तिनं कप एकदम दूर केला. त्यामुळं हात भाजला नि तिच्या हातातून कप सुटून खाली पडला आणि त्याच वेळी एकदम तिचा बांध फुटून अश्रू वाहू लागले.

थोड्या वेळानं तिनं स्वतःला सावरलं. उठून ती म्हणाली, 'मी शाफ्ट्सबरीला जाऊन येते. चार्लसचा फोन आलाच तर मी तिथं असलेलं बरं.'

'अग, तिथं कुणी फोन घेतला नाही तर तो इथं करील.'

तेवढ्यात् फोन वाजलाच. गिनानं फोन घेतला नि थोड्या वेळानं तिला म्हटलं, तुझाच फोन आहे. पॅट्रिक ओ सुलिवॅन नावाचा कुणी डिटेक्टिव आहे म्हणे.' चार्लस किंवा मिचेलीचा काही पत्ता लागला नसल्याचं त्यानं सांगितलं. नि शक्य असल्यास इन्स्टिटयूटमध्ये येऊन भेटावं असं तिला सुचवलं. वाइनबर्गर इन्स्टिटयूटमध्ये एक नवीनच प्रकार घडला असल्याचंही त्यानं सांगितलं.

पॅट्रिकला भेटून आपण न्यू हॅम्पशायरला जात असल्याचं तिनं गिनाला सांगितलं. 'मी जेवायला वेळेवर येईन !' जाता जाता ती म्हणाली.

इन्स्टिटयूटमध्ये येऊन तिनं गाडी लावली आणि इमारतीचा दरवाजा उघडल्यावर तडक ती चार्लसच्या प्रयोगशाळेकडे निघाली. प्रयोगशाळेची वाताहत झाली होती. एलन पोलिसांच्या माणसांना काही माहिती देत होती. डॉ. इबॅनेज आणि डॉ. मॉरिसन चार्लसच्या टेबलाजवळ उभे राहून बोलत होते. त्यांच्याजवळ उभ्या असलेल्या एका माणसाचं कॅथरिनकडे लक्ष जाताच तो पुढं आला.

'आपण श्रीमती मार्टेल काय ? मी डिटेक्टिव्ह पॅट्रिक ओ सुलिव्हॅन. तुम्ही आलात याबद्दल धन्यवाद!'

एलन पोलिसांना काही उपकरणं तिथं नसल्याबद्दल सांगत होती आणि डॉ. मॉरिसनही रागारागानं उपकरणांबद्दलच बोलत होता.

'काय झालंय ?' तिनं पॅट्रिकला विचारलं.

'तुमच्या पतींना इथून काढून टाकल्यावर त्यांनी इथली बहुतेक सर्व उपकरणं पळवली असावीत.'

'शक्य नाही !' कॅथरिन म्हणाली.

'पण पुरावा निर्विवाद आहे. त्याला इथल्याच रक्षकांनी न समजून मदत केली ना सामान हलवायला.'

'पण का ?'

'तेच तर मी तुम्हाला विचारतो आहे.'

'मला तर काहीच कल्पना नाही.'

'मार्टेलबाई, त्यानं स्वतःच्याच मुलीला पळवून नेलं ही बाब तिककीशी गंभीर नाही; पण उपकरणं पळवणं हा गंभीर गुन्हा आहे. त्याच्यावर वॉरंट काढलं जाणार आहे आणि त्यांना अटकही होईल.'

परिस्थिती दिवसेंदिवस अधिकच बिघडत होती. आता तर तो फरारी झाला आहे. 'काय बोलावं ते मला सुचत नाही.'

'आम्हाला तुमच्याबद्दल सहानुभूती वाटते, श्रीमती मार्टेल.' इबॅनेज मागून पुढं येऊन म्हणाला.

'काय दुर्दैव आहे पहा. खरं म्हणजे तो एक नामांकित संशोधक आहे.' मॉरिसननं दुजोरा दिला.

'डॉ. मार्टेलना नेमकं कशाकरता बडतर्फ केलं होतं ?' पॅट्रिकनं प्रश्न टाकला. आपल्याला विचारावयाचा आहे; पण धीर होत नाही असा प्रश्न त्यानं विचारल्यामुळं कॅथरिनला बरं वाटलं.

'मुख्य म्हणजे त्याचं वागणं अलीकडे फारच विसंगत होऊ लागलं होतं.' इबॅनेजनं म्हटलं, 'शिवाय तो एकलकोंडा होता. कुणाबरोबर सहकार्य करायला त्याची तयारी नसे.'

*With Best Compliments From :*

**AROFINES**

*FACTORY* : S-42, MIDC Bhosari
Pune-411 016

*Phone* : 82681

'त्याच्या संशोधनाचा विषय कोणता?'

'सामान्य लोकांना समजावून सांगणं कठीण आहे.' मॉरिसनन सुरुवात केली. 'त्याच्या मते कॅन्सरवर प्रतिकारशक्ती निर्माण करून मुकाबला करण्याची आवश्यकता होती; पण दहा वर्षांत त्याच्या हाती काही विशेष लागलं नाही.'

'ही उपकरणं डॉ. मार्टलनी का नेली असावीत असं वाटतं?'

'मला जरा सुद्धा कल्पना नाही,' इव्हेनेज उत्तरला.

'आपलं संशोधन चालू ठेवण्यासाठी म्हणून?'

'अशक्य! कारण संशोधनाला विशिष्ट प्रकारच्या उंदरांची गरज असते. आणि ते काही त्यानं नेलेले नाहीत. नि तो फरारी असल्यानं त्याला बाजारातही मिळायचे नाहीत.

'मला तुम्ही उंदरांच्या सगळ्या व्यापारी संस्थांची यादी देऊ शकाल काय?'

'तुम्हाला फार त्रास झाला नाही?' इव्हेनेजनं कॅथरिनकडे वळून म्हटलं.

'काय सांगू?'

'आम्ही काय मदत करू शकतो ते सांगा,' मॉरिसन.

तेवढ्यात पॅट्रिक परत आला. 'त्यांची गाडी सापडली. पलीकडेच लावलेली होती.' तो म्हणाला.

¤

गिनाकडे जाण्यापेक्षा स्वतःच्याच घरी जावं असं तिनं ठरवलं. एक तर चार्लसचा फोन आलाच तर आपण घरी असलेलं बरं. आणि चार्लसबद्दलची गिनाची टीकाटिप्पणी ऐकायला नको. गाडी घराच्या आवारात लावून ती उतरली. आपण नाही तर काय दशा झाली असेल! मिचेलीच्या खेळघराचं दार उघडं होतं. नि वाऱ्याबरोबर हालून आपटत होतं.

दारातून आत शिरली आणि स्वयंपाकघरात आली. आणि एकदम किंचाळली. तिच्या उजव्या बाजूकडून एक आकृती हाललेली दिसली. ती धावत दुसऱ्या भिंतीशी गेली. भीतीनं तिची बोबडी वळली. आणि तिनं डोळे बंद करून घेतले. जरा वेळानं तिनं धीर करून डोळे उघडले. आणि ती चकित झाली!

'चार्लस?' तो सगळ्या खिडक्यांतून पाहात धावत होता. हातात बंदूक. ती काही बोलणार इतक्यात चार्लसनं येऊन तिचं बकोट धरलं नि तिला घेऊन तो स्वयंपाकघरातून बाहेरच्या खोलीत आला नि तिला सोडून पुन्हा सगळ्या खिडक्या पाहात धावत सुटला.

ती भीतीनं अर्धमेली झाली होती. त्याने तिला विचारलं, 'तू एकटीच आहेस?'

'हो.' जास्ती काही न बोलता ती म्हणाली.

'मग बरं झालं.' त्याला धाप लागली होती.

'तू काय करतोयस इथं?'

'का? हे माझं घर आहे.'

'मला काही कळत नाहीये. मला वाटलं तू मिचेलीला घेऊन पळालास; पण मग तुला ते इथं तर सहज शोधून काढतील.'

तिच्या जिवात जीव आला. ती इकडे तिकडे पाहू लागली. तेव्हा तिला सगळीकडे वाइनबर्गमधली उपकरणं लावलेली दिसली. टोकाला हॉस्पिटलसारखी कॉट होती. नि त्यावर मिचेली झोपली होती.'

'मिचेली!' कॅथरिन धावतच तिच्याजवळ गेली. चार्लसकडे वळून तिने विचारलं, 'चार्लस तू इथं काय करतोयस?'

'सांगतो, मिचेलीच्या शिरेतलं इंजेक्शन त्याने सारखं केलं. मग त्याने कॅथरिनचा हात धरून तिला स्वयंपाकघरात नेलं.

'मी काय सांगतो ते नीट समजून घे. इथं मला शांतपणं विचार करायची संधी मिळाली. हॉस्पिटलमध्ये तुझी काय अवस्था झाली असेल, मला कल्पना आहे; पण डॉक्टरलोक आपल्या मताप्रमाणं पेशंटांना आणि त्यांच्या नातेवाइकांना वागायला कसं भाग पाडतात हे इतरांपेक्षा मला जास्त माहिती आहे. त्यामुळं पालकत्वाच्या प्रकरणात मी तुला दोषी धरीत नाही. निदान तू आपणहून ह्या भानडीत पडली नसणार याची मला खात्री आहे. मी जे काही केलंय ते मिचेलीच्या हिताचंच आहे. आणि तू केलंस तेही तिच्या हितासाठीच केलं होतंस.'

एकदम जाऊन चार्लसच्या गळ्यात पडावं असं तिला वाटलं. किती व्यवस्थित बोलतोय हा! पण ती थांबली अजून कित्येक गोष्टींचा उलगडा व्हायचाय.

'प्रथमतः मलाही वाटलं तिला नेहमीच्या औषधांचा उपयोग होईल; पण एक वेळ अशी आली की त्यांचा तिला काही उपयोग होत नाही याबद्दल माझी खात्री झाली.'

चार्लसच्या प्रांजलपणाबद्दल तिला विश्वास आला; पण शहाणपणाबद्दल अजून तिला खात्री वाटेना.

'पण औषधाशिवाय दुसरा मार्ग नाही असं सगळे डॉक्टर, काइत्समानसुद्धा, सांगत होते ना?

'त्यांना तसं खरंच वाटत असेलही.'


With Best Compliments From

**KISHOR THAKKAR**

**PROMOTERS & BUILDERS**

Office : Swapna Nagari, Karve Road,
Poona 411 004.

Phone : Office 31322 • Res. 51815

'म्हणजे. ते खरं नाही ?'

'पहा ना, दुप्पट डोस देऊनही तिच्या रक्तातल्या ल्युकेमिक पेशी कमी होत नव्हत्या; पण त्याच वेळी तिच्या निरोगी पेशी मात्र या औषधांमुळं नष्ट होत होत्या. मुख्य म्हणजे तिची प्रतिकारशक्ती कमी होत होती '

कॅथरिनला सगळ्याचा उलगडा झाला नाही; पण त्याचं बोलणं डोकं बिघडलेल्या माणसासारखं नव्हतं हे तिला पटलं.

'आणि म्हणून मला वाटतं, तिची प्रतिकारशक्ती वाढवली पाहिजे.'

'म्हणजे तुझ्याजवळ दुसरी उपचारपद्धती आहे ?'

'असं मला वाटतंय '

'पण सगळे डॉक्टर तर केमोथेरपीचीच शिफारस करतात.'

'बरोबर. सर्जनचा जसा सर्जरीवर असतो तसाच विश्वास त्यांचा आपल्या केमोथेरपीवर असतो. कॅथरिन, गेली नऊ वर्षं मी कॅन्सर-वरील संशोधनाचाच विचार करतोय आणि मिचेलीच्या बाबतीत मी नक्की काही तरी करू शकेन.'

'म्हणजे तू तिला बरी करू शकशील ?'

'अगदी निश्चयानं.'

'प्रयोगशाळेतले प्राणी तू बरे केले आहेस का ?'

'नाही; पण त्या वेळी मी फार हळू काम करीत होतो कारण केवळ संशोधन हाच उद्देश होता.'

'पण आता तुझ्याकडे प्राणीसुद्धा नाहीत.' तिला पॅट्रिकचं वाक्य आठवलं.

'पण एक मोठा प्राणी आहे ना. मी स्वतः !'

कॅथरिन डोळे विस्फारून त्याच्याकडे पाहू लागली. तिला पुन्हा त्याच्या मनःस्थितीबद्दल शंका वाटू लागली. 'पुन्हा काही तरी बिघडलं काय ?'

'तुला विचित्र वाटलं असेल; पण तसं वाटायचं कारण नाही. पूर्वीसुद्धा अनेक डॉक्टरांनी स्वतःवर प्रयोग केले आहेत. ऐक. माझ्या संशोधनाची प्रगती आता इतकी झाली आहे की, मी स्वतःला आता कर्कपेशी टोचून घेईन. मग एक प्रोटीन वेगळा करीन. ह्याला अँटीजेन म्हण. ह्या एका पेशीच्या पृष्ठभागावर असेल आणि त्यामुळं तो नेहमीच्या पेशीहून निराळा ओळखू येईल. हा मुख्य टप्पा आहे आणि मग ह्या प्रोटीनच्या विरुद्ध प्रतिकार करण्याची शक्ती जिवात निर्माण करायची की, त्याचं शरीर स्वतःतल्या कर्कपेशींवर हल्ला करू शकेल. इतर रोगांमध्ये नेहमीच हे असं होतं. खरं म्हणजे कर्करोग असतोच; पण शरीर त्याची दखल घेत असतं. ही प्रतिकार-शक्ती ज्या वेळी कमी पडते त्या वेळी कर्करोग वाढीस लागतो. तुला समजलं का हे सगळं ?'

कॅथरिननं मान हलवली.

कर्कग्रस्त प्राण्यांना ज्या वेळी मी हे वेगळं केलेलं प्रोटीन दिलं तेव्हा अपेक्षेप्रमाणं यश आलं नाही कारण एक अज्ञात असा अडथळा-घटक असल्याचं दिसून आलं. मिचेली आजारी झाली तेव्हा मी संशोधनाच्या ह्या टप्प्यापर्यंत आलो होतो. मग माझ्या मनात कल्पना आली नि हा वेगळा केलेला अँटीजिन निरोगी प्राण्यांना मी टोचला. मात्र त्यांच्यात प्रतिकारशक्ती निर्माण होते का ते पाहायला मला सवड मिळाली; पण निरोगी प्राणी अँटीजिन वेगळा म्हणून ओळखून त्याच्या विरुद्ध प्रतिकारक अँटीबॉडीज निर्माण करू शकतील असं वाटलं.'

कॅथरिनला आता गरगरू लागलं; पण तिनं मान डोलवली.

चार्लस उठला. 'कॅथरिन, माझा दृष्टिकोन समजून घे नि माझ्या-वर विश्वास ठेव. मला तुझी मदत हवी आहे.'

आता तिचा संयम सुटला. काही झालं तरी त्यांचं प्रेमाचं नातं होतं. त्याला मदत करणं तिचं कामच होतं.

'डिफ्थेरियाविरुद्ध लस करण्याकरता घोड्यांचा उपयोग केला जात असे हे माहिती आहे ना तुला ?'

'होय.'

'मग मी आता तेच केलं आहे. मिचेलीच्या ल्युकेमिक पेशीचा अँटीजेन मी वेगळा करून मला स्वतःला टोचून घेतला आहे.'

'म्हणजे मिचेलीच्या ल्युकेमिक पेशीविरुद्ध तुझ्यात प्रतिकार-शक्ती निर्माण झालीय ?' तिनं चकित होऊन म्हटलं. आता तिला उलगडा होऊ लागला.

'शाबास !' तो आनंदानं उसळला. 'तुला कळलं !'

'मग तुझ्यातल्या अँटीबॉडीज तू तिला टोचणार का ?'

'नाही. अशा रीतीनं टोचल्या तर तिचं शरीर त्या स्वीकारणार नाहीत; पण आधुनिक तंत्राप्रमाणं व्यवस्था करून ते स्वीकारले




जातील असे मार्ग उपलब्ध आहेत. पुढं तिचीच प्रतिकारशक्ती त्यांच्यामुळं जागृत होऊन तिच्या रक्तातील ल्युकेमिक पेशी नष्ट केल्या जातील.'

'त्यामुळं ती बरी होईल?'

'त्यामुळं ती बरी होईल!'

कॅथरिनला चार्लसचं म्हणणं नीटसं कळलं नाही; पण ज्याचं डोकं ठिकाणावर नाही असा माणूस इतका सुसंगत विचार करू शकेल का? असं सिला वाटलं. त्याचं म्हणणं तिला पूर्णपणं पटलं.

'पण किती दिवस लागतील बरे व्हायला?' कॅथरिननं विचारलं.

'माझ्या कल्पनेला यश येईल की नाही हेसुद्धा सांगता येणार नाही; पण माझ्या शरीरानं अपेक्षेप्रमाणं प्रतिसाद दिला असल्याचं समजून आलं आहे. म्हणून तर मी इथं बंदोबस्तात राहिलो आहे आणि मिचेलीला पुन्हा कुणी हॉस्पिटलमध्ये नेऊ पाहील तर मी प्राणपणानं लढेन.'

कॅथरिननं सर्व खिडक्यांमधून केलेली मोर्चेबंदी निरखली. ती म्हणाली, 'बोस्टनचे पोलीस तुझ्या शोधात आहेत. त्यांना वाटतंय तू मेक्सिकोला गेलायस.'

'त्यात काही अर्थ नाही. कारण मी इथं आहे हे स्थानिक पोलिसांना माहितीच आहे. तू बाहेर पाहिलंस?'

'पाहिलं. सर्व मोडतोड झालीय.'

'काल रीसायकल कंपनीचे पाच–सहा लोक इथं आले होते; पण मी पोलिसांना सांगून त्यांचा बंदोबस्त केला.'

"पण ते का आले होते?"

"मी वकिली नोटीस पाठवून रीसायकल कंपनीवर स्थगितीचा आदेश मिळवलाय!"

इतके दिवस चार्लसनं खरोखरच एकट्यानं लढा दिला हे तिच्या लक्षात आलं. ती धावत जाऊन त्याच्या बाहूत शिरली.

"माझ्यावर विश्वास ठेव! माझ्यावर प्रेम आहे ना तुझं?" चार्लसनं भरल्या स्वरात विचारलं.

"असं का विचारतोस? माझ्यापुढं खरा प्रश्न होता मिचेलीचा!"

"मग मुळीच काळजी करू नकोस!"

कॅथरिन त्याच्यापासून थोडीशी दूर झाली नि त्याच्याकडे पाहात म्हणाली, "प्रत्येकाला वाटतं की तुझा मानसिक तोलच ढळला आहे. मिचेलीकडे लक्ष देण्याऐवजी तू रीसायकल कंपनीत जो धुमाकूळ घातलास त्यामुळं तर खात्रीच झाली.

"रीसायकल हे निमित्त. मिचेलीकरता मी काही करू शकत नाही हे मला दिसत होतं. कारण इलिझाबेथचा मृत्यू मी विसरू शकत नाही. म्हणून तर मी इथं येऊन राहिलो आहे."

कॅथरिनची आता त्याच्याबद्दल खात्री पटली नि तिला हलकं वाटलं.

"बरं आता कसं आहे तिचं?"

"फार काही चांगलं नाही." त्याचे डोळे पाणावलेले तिला दिसले.

"आता, तू इथं थांबणं धोक्याचं आहे. तुझी मला मदत हवी आहे; पण तू इथं थांबण्यामुळं अडचणीच जास्त येतील. तेव्हा मुलांना घेऊन तू गिनाकडेच राहा!"

"मी इथंच राहणार आहे. मुलं आपलं पाहून घेतील!"

"अग पण...!"

"पण– बीण काही नाही! मी इथंच आता. आणि मी इथं राहू नये असं तुझं मत असलंच तर मला उचलूनच बाहेर टाकावं लागेल! समजलास?"

"बरं बरं राहा बाई! मग आता कामाला लागू या. मिचेलीच्या अँटिजेनचा डोस द्यायची वेळ झाली आहे. तेव्हा मी तुला सांगतो त्याप्रमाणं इंजेक्शन दे."

कॅथरिनला वाटू लागलं की आता आपण केलेला पालकत्वाचा अर्ज रद्द करायला हवा. कारण चार्लसला पकडण्याकरता पोलिसांकडे तो एक मुद्दा होताच. चोरीचा आळ वेगळाच!

आपण आता घरी आहोत आणि इथं राहणार आहोत हे तिनं गिनाला फोन करून कळवलं. चार्लसही इथंच आहे हे सांगावंसं तिला वाटलं; पण गिनाला इतका पोच नाही तेव्हा न सांगणं बरं असा निश्चय तिनं केला.

तिनं कोठीची खोली, फ्रीज वगैरेची पाहणी केली तेव्हा भरपूर अन्नसामग्री आहे असं तिला दिसून आलं. 'चला. ती एक काळजी मिटली!'

बाहेरच्या खोलीत ती आली तेव्हा चार्लस इंजेक्शनची तयारी करीत असल्याचं तिला दिसलं.

"आता हे मी आपल्या हाताच्या शिरेत देणार आहे. तुला जमेल का मला द्यायला?"

कॅथरिन भीतीनं गळाठली. "प्रयत्न करते." तो कसंबसं म्हणाली. "पण अँटिजेन घेण्याचा दुसरा मार्ग नाही का? गोळ्या वगैरे?"

चार्लसनं मान हलवली. "मी प्रयत्न केला; पण पोटातल्या आम्लानं ते जळून जातं."

मग त्यानं तिला समजावून सांगितलं. एपिनेफ्रिनची दुसरी एक सुई पण त्यानं तयार ठेवली होती. तो म्हणाला, "मला जर याची अ‍ॅलर्जी येऊन श्वास कोंडला, अंगावर पुरळ उठलं तर ही दुसरी सुई तू मला दे. क्षणभरही थांबू नकोस!" त्यानं हाताला पट्टा बांधला.

कॅथरिनचे पाय लटपटू लागले; पण चार्लस निर्धास्त होता. "हं आता ते प्लॅस्टिकचं आवरण काढून टाक आणि ही माझी शीर फुगली आहे त्यात सुई खुपस नि हळुहळू इंजेक्शन दाब!" उजव्या हातानं त्यानं स्पिरिटचा बोळा लावून घेतला आणि बोळा हातात तसाच ठेवला.

कॅथरिननं कसंबसं इंजक्शन पुरं केलं. "आता सुई काढून घे!" त्यानं स्पिरिटचा बोळा दाबत म्हटलं. "आणि दुसऱ्या सुईचं लक्षात ठेव. तू काम फार छान केलंस. पहिल्याच वेळीसुद्धा इतकी सफाई आली होती!"

तेवढ्यात त्याचा चेहरा लाल झाला. त्यानं कॅथरिनला खूण केली, "एपिनेफ्रिन दे चटकन!"

तयार ठेवलेली दुसरी सुई घेऊन कॅथरिननं त्याच्या दंडात खुपसली. तो अस्वस्थ झाला होता. काय करावं हे तिला सुचेना. पलीकडे मिचेली झोपलेली. बाहेर कुणाला कळवायची सोय नाही.

(क्रमशः)

## देणगी

पृष्ठ १६ वरून

हे कळल्यावर नाही म्हटलं तरी निराशाच झाली. दोन दिवसांनी तर दोन दिवसांनी...

...घरून निघताना बायकोनं हटकलंच कुठं निघालात म्हणून! कधी अक्कल येणार बयेला? एवढं वय वाढलं, सुना–नातवंडं झाली तरी पोच म्हणून नाही! बाहेर जाणाऱ्या माणसाला विचारू नये हे वाड-वडिलांपासून चालत आलेलं शहाणपण हिला माहीतच नाही काय? तेवढा अपशकून करायला बरं कळतं...

साहेबांचा बंगला त्यांच्या रुबाबाला साजेसाच होता. प्रशस्त आवार, विस्तृत इमारत, बागेत हिरवळ, बागेभोवती डेरेदार वृक्ष आणि ठिकठिकाणी रंगीबेरंगी फुलं. दूर कोपऱ्यात एक माळी एकाग्रतेनं काम करीत होता. हिरवळीच्या मध्यभागी थुईथुई उडणारं कारंजं. हिरवा रंग पाहून डोळे निवले...

एका खोलीत त्यांना कुणी तरी आणून बसवलं. आतल्या गार वातावरणानं ते अधिकच सुखावले. खोलीचं निरीक्षण करायला लागले. दारा–खिडक्यांवरचे निळ्या रंगाचे झुळझुळीत पडदे वाऱ्याबरोबर हलले की घुंगरं वाजत होती. कोपऱ्या-कोपऱ्यात ठेवलेल्या फुलदाण्या. एका कुंडीतल्या छोट्या झाडाला तर नारिंगं लटकलेली दिसत होती. हे खरं झाड आहे का प्लॅस्टिकचं? तुळतुळीत पॉलिश केलेल्या त्या टेबलावरची ती फोटोफ्रेम. लांबून कुणाचा फोटो आहे तो कळेना. ते जवळ जाऊन बघायला लागले. चकचकीत नक्षीच्या ट्रेमधून सरबताचा ग्लास आला. त्यातले बर्फाचे खडे लांबूनही दिसले. बशीत बटाट्याच्या काचऱ्या आणि कसला तरी लाडू–

केळकरांचं मन समाधानानं काठोकाठ भरून आलं. बाईदेखील अशाच अगत्यशील गृहिणी होत्या. त्यांच्या घरी केशर लावलेलं सरबत मिळे. हा नोकर का पाहतोय आपल्याकडं टक लावून? सरबत घ्यायला सुरुवात करावी का कमी येई तो थांबावं? नोकरानं जणू त्यांच्या मनातले विचार ओळखले. '...बाईसाहेबांना यायला थोडा वेळ आहे. आपण घ्यायला लागा!...'

थंडगार घोट पोटात गेल्यावर त्यांना फारच बरं वाटलं. लाडूमधला बेदाणा आपल्याकडे बघून हसतोय असा भास त्यांना झाला. बंगल्यातला हा थाटमाट पाहून देणगीचा किती मोठा आकडा घालावा याचा ते विचार करायला लागले.

'हं बोला, काय काम आहे?' अंगावर कोसळलेला हा प्रश्न ऐकून ते एकदम दचकले.

अरे! ही कमी? ती परकर–पोलक्यातली, एक शेपटा घातलेली पोर काळाच्या उदरात गडप झाली काय? कापलेले केस, बिनबाह्यांचं पोलकं, रंगवलेले ओठ, झिरझिरीत पातळ. अगदीच अनोळखी. मुख्य म्हणजे चेहऱ्यावरचा तो उग्र कठोर भाव. बाईंची ही कन्या? कसं शक्य आहे? त्यांचं ते तेजस्वी, आदरणीय रूप कुणीकडं आणि...

'बोला चटकन, लौकर उरकलं तर बरं.


दरमहा रु. १००/– प्रमाणे १२५ महिने भरा
व
एकदम रु. २५,०००/– मिळवा!

पंचगंगा बँकेचीच

★

**" धनसागर योजना "**

- तत्पर व विनम्र सेवा
- ठेवीच्या विविध योजना
- सर्वसामान्यांच्या जिव्हाळ्याची

**श्री पंचगंगा नागरी सहकारी बँक लि.**
**कोल्हापूर.**
४ बी, महाद्वार पथ, कोल्हापूर

शरदराव अष्टेकर — उपाध्यक्ष
श्रीपादराव देशपांडे — अध्यक्ष



सुवर्णमहोत्सवी वर्ष सन १९८२–८३

आम्हीही १२% ते २२% व्याज देतो.
समृद्धीचा महामार्ग आमच्या दारातून जातो
आमचे दार आपणा सर्वांसाठी खुले आहे!
समृद्धीसाठी

**श्री महालक्ष्मी को-ऑपरेटिव्ह बँक लि.,**
**कोल्हापूर.**

प्रधान कार्यालय–' श्री भवन ', १६७ बी, कोल्हापूर.
फोन–२३८३७ अध्यक्ष कचेरी–२७१६४
निवास–२६५९७

एम. एस. कुलकर्णी — इन. मॅनेजर
वि. ना. सांगलीकर — उपाध्यक्ष
द. रा. उमराणीकर — अध्यक्ष

मला दुसरीकडं जायचंय...'

केळकरांनी मग धीर करून स्मारकाची कल्पना सांगितली– पावतीपुस्तक सरसावून बसले. आशेनं बघायला लागले. 'स्मारक?

'हं.' तुच्छतेचा एक उद्गार त्यांचं हृदय आरपार कापीत गेला.

... त्याग? सेवा?? कुणी कुणासाठी केली...ज्या देशासाठी आमच्या आईनं त्याग केला त्या देशाकडं जा...

केळरत आश्चर्यानं स्तंभित झाले. त्यांचे शब्द लाडूच्या लगद्याबरोबर घशात अडकले.

... आई म्हणून तिनं कोणती कर्तव्यं पार पाडली–सांगता का मला...देशाच्या स्वातंत्र्याच्या उलाढाली तिनं केल्या. मी आणि पमी, विजय, शंतनू सगळे लहान होतो. आम्हाला आईच्या कुशीची गरज होती. तिच्या मांडीची गरज होती. तेव्हा ती कुठं होती? ... तुरुंगात ... त्या तुरुंगाकडे जा देणगी मागायला!

'बाईसाहेब, असं नका बोलू. आपल्या मातोश्रींचं नाव देशाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिलं जाईल! आपण त्यांच्या कन्या. आपण स्मारकाला पाठिंबा दिलात तर...'

'...तिचं स्मारक आमच्या हृदयात आहे. खोल...अगदी खोल...कधी प्रेमानं तिनं आम्हाला जेवू घातलं? तुम्हा कार्यकर्त्यांना ती येता–जाता जेवायला ठेवून घेत होती. आम्ही मुलं जेवलो का नाही हे तिला माहीतही नसायचं! पमीला ड्रॉइंगमध्ये बक्षीस मिळालं. आई कुठं होती? भाषणांच्या दौऱ्यावर!' विजय तापानं फणफणलेला...आई कुठं...तर कुठल्या आश्रमाच्या उद्घाटनाला...शंतनू ..आणि मी तर सर्वांत मोठी–धाकट्या भावंडांची कामं सदा माझ्या गळ्यात..कधी कौतुकानं माझ्या पाठीवरून हात फिरवला तिनं...कधी शाबासकी दिली? बाकी तुमच्यासारख्या तिच्या भाटांना हे सारं सांगून काय उपयोग? आमचं बाळपण पुन: थोडंच यायचंय परतून...'

'...त्यांच्या कार्याचा व्याप केवढा... कार्य केवढं महान, कुटुंबाच्या चौकटीत त्यांचं प्रेम अडकून राहिलं नाही. ते विशाल झालं. त्या सर्वांच्या आई बनल्या!'

'... मला नका सांगू ते विशालतेचं पुराण......'

'... आपण शिकल्या-सवरलेल्या आहात. लहानपणीचं लहानपण राहिलं असं समजा. ..ते वैफल्याचे प्रसंग आता मागं राहू द्या... आपल्या मातोश्रींसारखं मोठं मन आपण करा...व्यक्तीपेक्षा समष्टी मोठी असते हे आपण ओळखा!...'

'...काय ओळखायचं ते आम्ही तेव्हाच ओळखलं होतं. बाहेर मोठेपणा मिळायला लागला, उदोउदो व्हायला लागला की, घराच्या भिंती नकोशा होतात. भोवती जनसमुदाय जमायला लागला की, मुलांची अडगळ व्हायला लागते...माहिती आहे?'

त्यांच्या ओरडून बोलण्यावर केळकर वाचा गेल्यासारखे झाले ... त्यांना ठसका लागला...

'...मला समाजसेवेत मुळीच इंटरेस्ट नाही...आणि आईचं स्मारक व्हावं अशी मुळीच इच्छा नाही! तिच्या जीवनापासून कुणी स्फूर्ती घेईल अन् असंच मुलाबाळांना आपल्या हयातीतच पोरकं करून सोडील!...' अंगावर शहारे आल्यासारखं करीत त्या उठल्या–'बरंय्..आपण गेलात तरी चालेल!'

केळकरांच्या पायात गोळे आले. त्यांना उठवेना...देणगीची आशा केव्हाच विलयाला गेली; पण चकचकीत नाण्याची दुसरी बाजू त्यांना पेलवेना. ते तसेच बसून राहिले! ○


*With Best Compliments From :*

M/s. Modern Bakery

458, Nana Peth,

PUNE 411002

*Phone – 44204 21535*

FAMOUS
FOR
BAKERY PRODUCTS

*With Best Compliments from*

Caps & Components

**Manufacturers**

**of**

**Lamp Components**

1491, Sadashiv Peth,

Pune 411 030

# दि राहुरी सहकारी साखर कारखाना लि. श्रीशिवाजीनगर, ता. राहुरी जि. अहमदनगर

( महाराष्ट्र राज्य )

तार– "श्रीशुगर"
राहुरी फॅक्टरी.

दूरध्वनी क्रमांक ३०३ श्रीरामपूर
९५ राहुरी
४९ श्रीशिवाजीनगर

**आपले दीनदयाळ जयप्रकाश स्वयंनियोजन वासंतिक विशेष अंकास आमच्या हार्दिक शुभेच्छा**

आमच्या कारखान्याने सन १९८१–८२ च्या रौप्यमहोत्सवी गळित हंगामात मा. संचालक मंडळाच्या सूत्रबद्ध व अचूक निर्णयामुळे तसेच सभासद आणि कामगारांच्या भरीव सहकार्यामुळे गेल्या चोवीस हंगामांपेक्षा विक्रमी उत्पादन करून राष्ट्रीय संपत्तीमध्ये मोलाची भर टाकण्याचा कसोशीने प्रयत्न केलेला आहे. कारखाना परिसरातील अल्पभू–धारक व दुर्बल घटकांचा आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक विकास व्हावा म्हणून विविध योजना व आनुषंगिक उत्पादने कार्यान्वित करण्याचा विद्यमान संचालक मंडळ अविरत प्रयत्न करीत आहे. ग्रामीण जीवनात आमूलाग्र बदल घडविणारा भारतातील सहकारी क्षेत्रातील एक आदर्श व प्रमुख सहकारी कारखाना आपल्या सन १९८२–८३ च्या गळित हंगामाची दिनांक १०।१०।१९८२ पासून यशस्वीरीत्या सुरुवात करून दिनांक १४।४।१९८३ अखेर ७,४१,११६/– मे. टन गळित केलेले आहे.

**आमची वैशिष्टये**

- ☐ पांढरीशुभ्र दाणेदार साखरनिर्मिती
- ☐ लहान, लहान शेतकऱ्यांना वरदायिनी ठरणाऱ्या उपसा जलसिंचन योजनाद्वारे पाणीपुरवठा.
- ☐ दुग्धोत्पादनाकरिता संकरित गोपैदास केन्द्र
- ☐ सन १९८१–८२ चे विक्रमी गळित ९,०४,५३० मे. टन.
- ☐ उत्तम प्रतीचे इंडस्ट्रियल अल्कोहोल उत्पादन
- ☐ इंधन बचतीकरिता गोबरगॅस योजना.
- ☐ विहिरींना मुबलक पाणी उपलब्ध व्हावे म्हणून बोअरिंग व ब्लॉस्टिंग योजना.
- ☐ कागदनिर्मिती प्रकल्प.
- ☐ सन १९८१–८२ चे विक्रमी साखरउत्पादन ९,६७,६३५ पोती.
- ☐ सन १९८२–८३ चे उद्दिष्ट– ९,००,००० मे. टन.

**विद्यमान संचालक मंडळ**

| | |
|---|---|
| मा. सर्जेराव नानाजी गाडे पाटील, | चेअरमन. |
| मा. दामोधर भगवंत पाटील | संचालक |
| मा. दादासाहेब नानाजी इंगळे पाटील | " |
| मा. जिजाबा रभाजी करपे पाटील | " |
| मा. जनार्दन दगडुजी खुरद पाटील | " |
| मा. लक्ष्मणराव बळवंतराव पाटील | " |
| मा. बाबुराव बापुजी तनपुरे | " |
| मा. काशिनाथ लक्ष्मणराव पवार पाटील | " |
| मा. भिकाजी बळवंतराव ढोकणे पाटील | " |
| मा. जगन्नाथ शिवराम राजुळे पाटील ( ब वर्ग सोसायटी प्रतिनिधी) | " |
| मा. डिस्ट्रिक्ट डेप्युटी रजिस्ट्रार सहकारी संस्था, (अ. नगर) (प्रतिनिधी साखर संचालक महाराष्ट्र राज्य, पुणे. ) | " |
| मा. पुंजाजी रभाजी शिरसाठ पाटील ( कामगार प्रतिनिधी ) | " |
| मा. कारभारी काशिनाथ पाटील, | व्हा. चेअरमन |
| मा. भास्करराव कुंडलिकराव कोळसे पाटील | संचालक |
| मा. कारभारी दामोधर भगत पाटील | संचालक |
| मा. भागवत मोहनीराज धुमाळ पाटील | " |
| मा. बाळकृष्ण बापुराव घसाळ पाटील | " |
| मा. लक्ष्मणराव शंकरराव तांबे पाटील | " |
| मा. भास्करराव लक्ष्मणराव भुजाडी पाटील | " |
| मा. गेणुजी नारायणराव आढाव पाटील | " |
| मा. भानुदास रामचंद्र आडसुरे पाटील | " |
| मा. रावसाहेब कोंडाजी साबळे पाटील ( जिल्हा मध्यवर्ती सह. बँकेचे प्रतिनिधी ) | " |
| मा. यशवंतराव सखाराम जाधव पाटील ( मागासवर्गीय प्रतिनिधी ) | " |
| मा. राजधर म्हातारबा भगत ( स्वीकृत तज्ज्ञ) | " |
| मा. चिंतामण माधवराव धुमाळ पाटील ( कामगार प्रतिनिधी ) | " |

**मा. एम्. एस्. जगधने–कार्यकारी संचालक.**
( बी. एस्सी. ए. एन. एस. आय. )

हार्दिक शुभचिंतन !

# श्री सुवर्ण सहकारी बँक लि.,

मुख्य कचेरी :
**७५९/५१, डेक्कन जिमखाना, फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणे ४११ ००४**

दूरध्वनी –
५४५२९, ५८१५४

- जोगेश्वरी शाखा : ३१ बुधवार पेठ, रेणुसे बिल्डिग, पुणे ४११ ००२. दूरध्वनी : ४४६५१९
- टिळक रोड [illegible] : २०३५/२ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०. दूरध्वनी : ४४२६४८
- श्रीपूर शाखा : ता. माळशिरस, जि. सोलापूर. दूरध्वनी : ५७

| | | |
|---|---|---|
| **मुकुंद जोशी** | **विलास एकबोटे** | **ज्ञानेश्वर आगाशे** |
| व्यवस्थापक | उपाध्यक्ष | अध्यक्ष |